महाराष्ट्राचे शिल्पकार : १



# संत गाडगे महाराज
## काल आणि कर्तृत्व

प्रा. सत्यवान मेश्राम

383

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## लेखकाचा परिचय

| | | |
|---|---|---|
| पूर्णनाव | : | श्री.सत्यवान शंकर मेश्राम |
| जन्मगांव | : | कनेरी (दगडी) |
| पत्ता | : | ता. साकोली, जि. भंडारा |
| जन्म | : | ४ नोव्हे १९५५ |
| शिक्षण | : | एम.ए. (मराठी) एम फिल. |
| व्यवसाय | : | प्राध्यापक<br>सी.पी.ॲन्ड बेरार महाविद्यालय,<br>तुळशीबाग, महाल, नागपूर |

**सामाजिक कार्य**

- अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विदर्भ प्रांत
- सहसचिव व कार्यालय मंत्री (१९७५-१९८५)
- माजी सिनेट सदस्य- नागपूर विद्यापीठ, नागपूर
- कोषाध्यक्ष - नागपूर विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
- उपाध्यक्ष- सामाजिक समरसता मंच, नागपूर
- उपाध्यक्ष - नागपूर विद्यापीठ शिक्षण मंच

'महाराष्ट्राचे शिल्पकार' - १

# संत गाडगे महाराज

# (काल आणि कर्तृत्व)

❑

❑

❑

प्रा. सत्यवान मेश्राम

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

आवृत्ती पहिली : जानेवारी १९९८

© महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

प्रकाशक :
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ,
मुंबई ४०० ००१

मुद्रक :
ओ.के. कॉम्प्युटर, 'यशोगंध' रामदासपेठ, नागपूर-१०
☎ : ५४८८८३, ५२५१२४

किंमत : रु.१६/-

# निवेदन

## महाराष्ट्राचे शिल्पकार या योजनेतील हे एक पुस्तक

समाजाला जागे करायचे. त्याला कार्यप्रवण करायचे. हे संतांचे कार्य मोलाचे. संत गाडगेबाबांनी ते केले. आपल्या कष्टमय व्यक्तीगत जीवनातून ते बरेचसे शिकले. "माणूस" कसा आहे? तो माणूस उरला नाही. पण पुन्हा तो "माणूस झाला पाहिजे". या तीन स्तरावर विचार करून संत गाडगेबाबांनी प्रत्यक्ष कृती केली.

गावोगावी शाळा काढल्या. धर्मशाळा उभारल्या, त्याचबरोबर "किर्तोडे" (कीर्तने) केले. त्यातून सामान्य जनतेला आत्मोद्धाराचा मार्ग दाखवणे साधले. संत गाडगेबाबांची शिकवण शब्दबद्ध केलेली नाही. ते स्वतः अशिक्षित होते. म्हणजे लिहिणे वाचने त्यांना येत नव्हते, एवढेच! आत्मज्ञान, समाजहिताची तळमळ आणि व्यवहाराची नीतीपूरक घडण करण्याची मेधा, प्रतिभा आणि कौशल्य त्यांचेजवळ होते.

अशा या संताचे हे चरित्र प्रकाशित करताना महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाला आनंद होत आहे. लेखकाने हे चरित्र तयार करतांना अमाप श्रम घेतले. मुद्रक श्री. अनंत कामठीकर ह्यांनी हे लिखित टंकमुद्रित करून सुबकपणे सिद्ध केले ह्या दोघांचेही आभार. मंडळाचे सचिव, श्री वडे ह्यांनी हे पुस्तक त्वरीत प्रकाशित व्हावे म्हणून खूप श्रम घेतले त्यांचेही आभार.

रसिक ह्या पुस्तकाचे स्वागत करतील ही आशा.

**दिनांक :- १२.२.९८**

**(मधुकर आष्टीकर)**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# मनोगत

महाराष्ट्राचे समाजवादी समाजसुधारक संत श्री. गाडगेबाबा यांचे व्यक्तिमत्व व कार्याविषयी मला विद्यार्थी दशेपासूनच कुतुहल राहिले आहे. पुढे मराठी वाङ्मयाचा अभ्यासक म्हणून त्यांच्याविषयीचे अनेकांनी लिहिलेले साहित्य मी वाचून काढले. निरक्षर असूनही आचार व विचारात थोडीही विसंगती जाणवली नाही. सुदैवाने अध्यापनाची संधी मिळाल्यावर संदर्भ म्हणून अध्यापनात गाडगेबाबा असतच.

त्यामुळे महाराष्ट्र राज्य साहितय व संस्कृती मंडळाने 'गाडगेबाबा : काल आणि कर्तृत्व' या पुस्तकाचे दायित्व माझ्याकडे सोपविले तेव्हा मला अतिशय आनंद झाला. म.रा. साहित्य संस्कृती मंडळाचे तत्कालिन अध्यक्ष कै. विद्याधर गोखले यांनी अत्यंत विश्वासाने माझ्यावर ही जबाबदारी सोपविली. त्यांच्या आकस्मिक निधनाने सगळ्यांनाच धक्का बसला. परंतु त्यांच्या बहुतेक योजना विद्यमान अध्यक्ष मा. डॉ. मधुकरराव आष्टीकर यांनी उचलून धरल्यामुळे या कामाला काही खंडानंतर पुन्हा गती आली.

अर्थात लेखनाचे कार्य वाटेल तितके सोपे नव्हते, हे माझ्या लक्षात आले. गो.नी. दांडेकर, कै. प्रबोधनकार ठाकरे, आचार्य अत्रे, प्राचार्य रा.तु. भगत इत्यादींनी गाडगेबाबांविषयी विपुल लेखन केले आहे. त्या साधन सामग्रीचा उपयोगही करावयाच होता, तसेच माझ्या आकलनाची बाजू मांडावयाची होती, आणि ग्रंथ लेखनासाठी म.रा. साहित्य व संस्कृती मंडळाने घालून दिलेल्या मार्गदर्शन तत्वाच्या कक्षेत राहून लेखन करावयाचे तसेच मंडळाचे एक सदस्य श्री.ना. धो.महानोर यांच्या योजनेचे उद्दिष्ट साध्य करावयाचे होते, अशा अनेक मर्यादाचे पालन करीत माझ्या परीने हे कार्य केलेले आहे. माझ्या समाधानात आपणही समाधानी व्हाल हीच सदिच्छा!

म.रा. साहित्य संस्कृती मंडळाचे सन्माननीय सदस्य आणि माझ्या महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. वि.स. जोग यांनी वेळोवेळी मला मार्गदर्शन करून लेखनासंबंधी सतत पाठपुरावा केला. लेखनकार्य

सुरू असतांना एक दोन अशा अडचणी आल्या की आता हे कार्य होणे नाही अशावेळी डॉ. वि.स. जोग व माझी सहधर्मचारिणी नागपूर विद्यापीठ सिनेट सदस्या सौ.रोहिणी मेश्राम या दोघांनीही मला सावरून घेतले याबद्दल मी त्यांचा कायम ऋणी आहे.

गाडगेबाबांच्या कर्मभूमीचा दौरा करून, आल्यावर मला गोनिदाचे लेखन जास्त उपयुक्त वाटले. वरूड (जि. अमरावती) येथील गाडगेबाबाच्या नवसमाजाचे श्री. इंगळे, ब्रह्मपुरीचे प्रा. के. के. मेश्राम माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. म. पांडे. माझे मित्र प्रा. रमेश हिमंते, डॉ. रत्नाकर धामणकर व सौ. संध्या जाधव या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे.

म.रा. साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. मधुकरराव आष्टीकर, सचिव श्री. चंद्रकांत वडे सर्व सदस्य आणि ओ.के. कॉम्पुटरचे श्री. अनंत कामठीकर या सर्वांचे मी हार्दिक आभार मानतो.

नागपूर

आपला

**प्रा. सत्यवान मेश्राम**

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | नमस्कार माझा तया डेबूजीला | १-१ |
| २. | बालपण | २-७ |
| ३. | भजनाचा छंद | ८-१० |
| ४. | विवाह | ११-१६ |
| ५. | सावकाराशी संघर्ष | १७-२३ |
| ६. | मुलीचे बारसे | २४-२६ |
| ७. | संसाराकडे दुर्लक्ष | २७-२८ |
| ८. | अंतर वाढत गेले | २९-३० |
| ९. | गृहत्याग | ३१-३५ |
| १०. | भ्रमंती | ३६-४४ |
| ११. | कीर्तनाचा प्रारंभ | ४५-५० |
| १२. | ऋणमोचनाचा उद्धार | ५१-५४ |
| १३. | सहभोजन | ५५-५६ |
| १४. | पूर्णानदीवरील घाट | ५७-५९ |
| १५. | नातलग | ६०-६७ |
| १६. | पंढरपूर यात्रा व धर्मशाळा | ६८-७४ |
| १७. | नाचू कीर्तनाचे रंगी | ७५-८४ |
| १८. | गोरक्षणाची मोहिम | ८५-८९ |
| १९. | धर्मशाळा | ९०-९८ |
| २०. | अंधश्रद्धा निर्मूलन | ९९-१०० |
| २१. | स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठा | १०१-१०१ |
| २२. | जयाचे मनी लालसा शिक्षणाची | १०२-१०३ |
| २३. | एकाच देवाची औलाद | १०४-१०५ |
| २४. | बाबांचा रोकडा धर्म | १०६-१०९ |
| २५. | लोकसंग्रह व पत्रव्यवहार | ११०-११३ |
| २६. | समकालीन सन्मान्यांच्या सहवासात | ११४-१२६ |
| २७. | समारोप | १२७-१३१ |

# एक

# नमस्कार माझा तया डेबूजीला

"गोपाला ऽ गोपाला ऽ देवकीनंदन गोपाला" उभ्या महाराष्ट्राला हा महामंत्र देणारे डेबूजी झिंगराजी जाणोरकर म्हणजेच महाराष्ट्राचे लाडके सुपुत्र संत गाडगे महाराज होत.

श्री. गाडगेबाबा, म्हणजे विदर्भाच्या मातीला ललामभूत ठरलेला एक अनमोल हिरा! मानवतेचा उद्‌गाता! दलितांचा कैवारी! दीनदुबळ्यांचा त्राता! स्वच्छतेचा पुजारी!

गाडगेबाबांनी अक्षरांची ओळख कधी केली नाही. अनुभव हेच त्यांचे शिक्षण. जीवनाभूती आणि श्रवणभक्तीतून बहुश्रुत झालेला हा निरक्षर विद्वान!

भ्रमंतीने गाडगेबाबांना शक्ती दिली, संसारातील बऱ्यावाईटांची ओळख करण्याची बुद्धी दिली. जनजीवन पारखण्याची संधी मिळाली, म्हणूनच शिवाशिव पाळणाऱ्या समाजाला त्यांनी समरसतेचा मंत्र दिला.

अंधश्रद्धा, रुढीपरंपरा यावर हल्ला करताना त्यांची वाणी अधिक तिखट बनली. भक्तीचे क्रूर व दुष्ट प्रकार पाहून हळहळणारे गाडगेबाबा भूतदयावादी संत होते.

बाबांनी झाडूचे तंत्र या देशात रुजविले. श्रमप्रतिष्ठा वाढविणारा हा कर्मयोगी महामानव होता; खराटा धर्माचा बादशहा होता. लोकसंग्रहासाठी गाडगेबाबांनी कीर्तनाचे माध्यम निवडले. 'देवकीनंदन गोपाला' चा गजर केला.

**वैदर्भ देशात ऋणमोचनाशी।**
**तुकाराम अवतार रजकाच्या वंशी।**
**करी गाडगे, काठी, चिंध्या तनुला।**
**नमस्कार माझा तया डेबूजीला ।।**

●●●

# दोन

## बालपण

विदर्भातील अमरावती जिल्हातील दर्यापूर तालुक्यात शेंडगाव नावाचे लहानसे खेडे भुलेश्वरी नदीच्या तीरावर वसलेले आहे. शेंडगावला नागोजी परीटाचे वास्तव्य होते. नागोजी श्रीमंत व सभ्य गृहस्थ असून त्यास राणोजी, कराजी व जानोजी अशी तीन मुले होती. राणोजींचा एकुलता एक मुलगा म्हणजे झिंगराजी होय. वडिलोपार्जित जमिनीवर झिंगराजी चैनसुखात जीवन जगत होता.

सामाजिक दृष्टीने परीट समाज अत्यंत मागासलेला, निरक्षर, व देवभोळा होता. अनेक देवदेवतांची पूजाअर्चा या समाजात नित्यनेमाने होत असे. कुलदेवतांना खुष करण्यासाठी कोंबडी, बकऱ्याचा नैवेद्य दाखविला जाई. सोबतच चरणामृत म्हणून दारुचा उपयोग होत असे. नातलग व जातभाईंना मटनाचे जेवण दिले तर कुलदेवता प्रसन्न होते ही त्यांची रुढ समजूत होती. समाजबाह्य करण्याच्या भीतीने या प्रकाराला कोणी विरोध करीत नसत. आर्थिक स्थितीचा विचार न करता हे सर्व करावेच लागे.

झिंगराजीच्या जीवनात हीच गोष्ट घातक ठरली. सामाजिक सुस्थितीमुळे गणगोत, जातभाई व मित्रमंडळीची घरी सतत उठबस असे. हळूहळू तो दारुबाज झाला. दारुच्या व्यसनामुळे घरादाराची, बायकोपोरांची आबाळ झाली. श्रीमंती चे दिवस लवकरच पालटले, तसे नातलगही दूर झाले.

झिंगराजीचा विवाह दापुरे गांवच्या हंबीरराव कोळसेकरांची मुलगी सखुबाई सोबत झाला. या दाम्पत्याच्या पोटी २३ फेब्रुवारी, १८७६ रोजी महाशिवरात्रीच्या पर्वावर डेबुजीचा जन्म झाला. सखुबाईला आधी झालेली मुले वाचली नाहीत. मरिआईचा कोप समजून तिने नवससायास केले. मरणाच्या भीतीमुळे मुलांची नावे अप्रचलित ठेवण्याची विदर्भात प्रथा असल्याने त्यांनी मुलाचे नाव ठेवले डेबू!

अशा परिस्थितीत जन्मलेला डेबू म्हणजेच मनुष्यमात्रांच्या सेवेतच देव पाहणारा निष्काम कर्मयोगी श्री. संत गाडगेबाबा होय. अशाप्रकारे २३ फेब्रुवारी, १८७६ रोजी महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायाच्या मुकुटात नियतीने एका महामानवाची भर घातली.

विदर्भात परिटांना वठ्ठी किंवा धोबी म्हणण्याचा प्रघात आहे. लोकांचे कपडे धुवून उदरनिर्वाह करणे हा परिटांचा पिढीजात व्यवसाय आहे. चैनीचे जीवन जगणाऱ्या झिंगराजीनी हा धंदाही इमानाने केलेला नव्हता. तसाही खेडयापाडयात हा व्यवसाय मंदीतच असतो. पण पिढीजात धंदा असल्याने झिंगराजी व सखुबाई कसेबसे तग धरून होते. अशा आर्थिक विपन्नावस्थेत लहान डेबुजीची आबाळ होत गेली.

झिंगराजीवर चारही बाजूंनी संकटांनी आक्रमण केले. दारु पिऊन शरीर खंगत गेले. खोकल्याने शरीरात कायमचे घर केले. त्यांना कर्जबाजारी होत असलेले पाहून सगेसोयरे दूर पळाले. जमीन सावकाराच्या घशात गेली. खायला अन्न नाही. राहायला घर नाही. रावाचा रंक होणाऱ्या वेदनांचा झिंगराजींनी दारुण अनुभव घेतला. सर्वनाश झाल्यावर त्यांचे डोळे उघडले. पश्चताप झाला. या संकटातून सावरण्याचा त्यांनी प्रयत्न केला. शेवटी नाईलाजाने शेंडगाव सोडून मावसभावाकडे कोतेगावला आश्रयाला जाऊन राहिले.

झिंगराजीचे दिवस कोतेगावलाही पालटले नाहीत. थोडीफार सखुबाई व डेबजीची सोय तेवढी झाली.

झिंगराजीस मृत्यू जवळ दिसू लागला. मरताना ते डेबूला म्हणाले, "जलमभर मरिमाय अन् मातामायला कोंबडे, बकरे कापले. वखताले कोनी उभे राह्यले नाइ, जवळ पैसा होता तोवरी सगेसोयरे खुप होते, दारु प्यायला सगळे होते, आता मुखी गंगाजल घालायला कुत्रा देखिल नाही." वडिलांचे हे शेवटचे शब्द डेबूजीच्या भावी जीवनाला आकार देणारे मूलमंत्र ठरले.

नवरा खाटेवर खिळला असताना सखुबाई नेटाने संसार करु लागली. मुलगा डेबू आणि पती हे तिचे सर्वस्व होते. झिंगराजींना, ती जगण्याचा

धीर देत असे. पण त्यांनी मनाला लावून घेतलेले होते. मरणासन्न अवस्थेत त्यांनी सखुबाईला तळमळून म्हटले", तुला अन् डेबूला म्या दुःखात लोटलं, आता एक गोष्ट ध्यानात ठेव. डेबू मोठा व्हईल, तो कुठं राहील, काय करील मले माहित नाही. मातर एक कर त्याले या देवीदेवतांचे नादी लागू देऊ नको. आन् दारूकडे वळू देऊ नको."असे निर्वाणीचे बोलून झिंगराजीनी त्या मायलेकरांना अनाथ व बेघर अवस्थेत सोडून जड अंतःकरणाने जगाचा निरोप घेतला.

सखुबाईचे माहेर श्रीमंत होते. वडिलाकडे साठ पासष्ट एकर कसदार जमीन होती.आई वडिलांची सखुवर भरपूर माया होती. निष्ठेने ती नवऱ्यासवे सर्व दुर्दशा भोगत राहिली. मानी स्वभावामुळे बापभावापुढे तिने हात पसरला नाही. नवऱ्यास सर्वस्व मानून पतीसेवा करीत राहिली. पण नियतीने झिंगराजीना उचलले. त्यांच्या अकाली मृत्युनंतर लहानग्या डेबुजीला घेऊन सखुबाई माहेरी दापुऱ्यास आली. डेबू तेव्हा सहासात वर्षाचा होता. दापुऱ्यात वृद्ध आजा - आजी होती. पूर्ण कारभार चंद्रभान मामा पहात असत. अनाथ झालेल्या मायलेकरास मामाच्या घरी आश्रय लाभला.

काही दिवस सुखसमाधानाने गेले. पण हळूहळू कौत्तिका मामीच्या स्वभावात बदल घडू लागला. मोठी विधवा नणंद व तिच्या मुलाला पोसण्याची जबाबदारी जन्मभर आपल्यावर आली हे त्या बाईला कळून चुकले. सखुबाई शहाणी होती. बसून खायचे नाही हे तिने ठरविले.

सखुबाई शोक विसरून कामाला लागली. तिने पहाटेच उठावे, दळणाचे टोपले घेऊन जात्यावर बसावे. पायलीचे दळण दररोज करावेच लागे शेणपाणी व दाणाचारा करण्यासाठी गडी असला तरी घराचे सारवण तिला करावे लागे. घरची सर्व कामे लवकर आटपून डेबूचेही करायचे यात सखुबाईने स्वतःला झोकून दिले.

झिंगराजीच्या वाईट दिवसात सखूबाईने संसार उभा केला होता. मोलमजुरीचीं सर्व कामे ती करायची. परीट समाजाचे धुण्याचे शास्त्र तिने अवगत केले. शेतातील मळणी, कापणी, निंदण, सर्व ढोरागत ती

करायची. माहेरी भावाच्या घरी उभा जन्म काढायचा असल्याने पायात भिंगरी पडल्यागत दिवसभर ती कामात जुंपलेली असायची. नणंद भावजयीत थोडं दुःखलं खुपलं तरी त्याचा बाऊ न करता आलेल्या दिवसाला ती धिटाईने सामोरे जाई. डेबूसाठी तिला सारे सहन करावे लागे. चंद्रभान व कौत्तिका डेबूला कधी प्रेमाने गोंजारीत तर कधी रागावत. त्यांनाही बळीराम नावाचा एक मुलगा होता. बळीरामला सांभाळण्याचा संपूर्ण भार डेबूवर असे. बळीराम व डेबू यांना एखादी वस्तू देताना मामी नेहमी दुजाभाव करीत असे. मामाचाही रोष कधी ओढवून घ्यावा लागे.

सखुबाई दळताना सुंदर ओव्या म्हणायची. अंथरुण सोडून डेबूने आईच्या मांडीवर डोके टेकावे व ते सर्व ग्रहण करावे. त्या त्याला सहज पाठ होत. एखादा हट्ट डेबूने धरला तर सखुबाई त्यास समजावून सांगे. अनाथ असणाऱ्या डेबूवर सर्व संस्कार करण्याची जबाबदारी फक्त सखुबाईवर होती. या माऊलीने ती समर्थपणे उचलली. तिच्या प्रत्येक कामात डेबू मागोमाग असायचा. काम करता करताच ती डेबूला म्हणायची, 'काम करत रहावे, फुकट खाऊ घालावं लागते असे म्हणण्याची पाळी कोनावर येऊ देऊ नको.'

डेबूला मोठा करण्यात व शहाणपण शिकविण्यात सखुबाईने आपले मातृत्वाचे पूर्ण कसब पणास लावले. शिवाजीच्या यशात जसा जिजाऊचा वाटा तसा डेबूच्या कार्यात सखुबाईचा ठसा उमटलेला दिसतो.

आता डेबूजीचे वय शाळेत जावयाचे होते. त्याच्या बरोबरीची मुलं शाळेत जाऊ लागली. शिक्षणाचे नाव घेतले तर मामी रागावली असती कदाचित मामालाही आवडले नसते. आजा-आजीही काही बोलले नाही. बिचारी सखुबाई मूग गिळून गप्प बसली. डेबूने आईचे मन ओळखले. जेवताना मामीने उणेदुणे केले की रात्री मायेच्या कुशीत शिरून तो सगळे सांगत असे. सखुबाई त्याची समजूत काढी. वेळीच परिस्थिती ओळखून डेबूने स्वतःला कामाला बांधून घ्यायचे ठरवले. घेतलेला निर्णय योग्य नसला तरी नाईलाज होता.

दुसरे दिवसापासून डेबू मामाची गुरं राखायला जाऊ लागला. गुराखी जीवनात प्रवेश करताना डेबूला काय वाटले असेल? शिक्षण प्रसाराचे कार्य सातत्याने करून लोकांच्या मनातील अज्ञान मळ दूर करणाऱ्या गाडगेबाबांना स्वतः मात्र निरक्षरच राहावे वाटले असेल काय? काळापुढे कोणाचे चालत नसते हेच खरे. डेबूने गुराखी व्हावे  हा काळाचा महिमा होता.

डेबूसोबत त्याचे गुराखी मित्र असत. त्यात गोवारी, महार, राजपूत, गोसावी अशा अनेक जातीच्या गुराखी सवंगड्याचा समावेश होता. सर्वांची गुरे नदीकाठी एकत्र झाली की चरण्यासाठी हिरव्या कुरणावर सोडली जात. इकडे यांच्या उनाडक्या सुरु होत. कधी झाडाखाली बसावे, झाडावर चढून खेळावे, नदीत डुबावे, मनसोक्त मारपीट करावी, काठी चालवावी, विविध खेळ करावे, दुपारची न्याहारी करावी. सायंकाळ होताच गुरे घराकडे वळवावी हा त्यांचा नित्यक्रम होता.

गुरामागे अनवाणी फिरताना पायात काटे रुतत. खोरून काढावे, लंगडावे व पुन्हा गुरामागे जावे. डेबूला वहाणा कधी मिळाल्या नाहीत. गुरामागील स्वच्छंद जीवनाने सुख दुःखाचा विसर पडत गेला.

दापुऱ्याला गावाशेजारी एक महादेवाची पिंड होती. पिंडीवर कचरा तण वाढलेला होता. चिंचेच्या झाडाच्या आडोशाला असल्याने गावकऱ्यांचे दुर्लक्ष झाले होते. तिकडे कोणीही फिरकत नसत. या महादेवाच्या पिंडीनेच डेबूच्या जीवनाला एक विलक्षण कलाटणी दिली.

झिंगराजीच्या वागण्याने सखुबाईचा कल देवधर्माकडे वळलेला होता. तोच वसा डेबूमध्ये उतरला. डेबूने सवंगड्याच्या मदतीने पिंडीवरील गवतकचरा बाजूला केला. सभोवतालची जागा व परिसर स्वच्छ केला. शेणामातीचे शिंपण घातले. आंघोळ करून ओंजळीत पाणी घेऊन ओलेत्यानी पिंडीला अभिषेक करीत. अठरा पगड जातीचे सवंगडी एकत्र येऊन देवाचे भजन करीत. नाना जातीची मुले होती, उच-निच भेदाभेद विसरून फक्त आपली 'गुराखी' जात पाळत. शिवाशिव ही सामाजिक संकल्पना त्यांना कधी शिवली नाही. दुपारी सगळे एका पंक्तीला बसत. एकमेकाचे गाठोडे सोडून भाकरी खात. आपण जगावेगळे वागत आहोत असे कोणासही वाटत नसे. यासाठी

सायंकाळी घरी बोलणी खावी लागली तरी त्याची कोणी पर्वा केली नाही. शिवाशिव पाळू नये हा पाठ पूर्णामायच्या साक्षीने महादेवाच्या पिंडीसमोर कळत नकळत या गुराख्यांनी डेबूच्या सान्निध्यात गिरवला. वर्णव्यवस्थेच्या चौकटीवर गाडगेबाबांनी केलेली सामाजिक समरसतेची ही पाया भरणी होती.

गुराखी जीवनात डेबूजी अनेक कामात पारंगत झाला. नदीच्या पात्रात गुरांची शेपटी धरून जाता जाता पट्टीचा पोहणारा झाला. त्याच्या बेधडक वृत्तीमुळे एकदोनदा बुडण्याचा प्रसंगही उद्भवला. गाईगुरांच्या स्वच्छतेबरोबर त्यांच्या खाण्यापिण्याची अधिक काळजी घेतल्यामुळे ती नजरेत भरू लागली. यामुळे मामा-मामी डेबूवर खूष झाली.

डेबूजीची अंगकाठी मजबूत व दणकट होती. तो वयाच्या मानाने थोराड दिसे. अंगात चपळाई मात्र भरपूर होती. गुरांना मेरेला लावले की यांचे खेळ सुरु होत. गोट्या, विटीदांडू, आट्यापाट्या, कवड्या इ. खेळात तो प्रवीण झाला. अंगरखा काढून कुस्तीसाठी मैदानात उतरला की पाहता पाहता पुढच्याला लोळविण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी होते.

मामाकडे नाही म्हणायला उणेदुणे होत असे. डेबूजी गुरे घेऊन बाहेर पडला की सुटायचा. पण त्याला आईची काळजी वाटे. सखुबाई कमालीची सहनशील होती. ती बिचारी स्वतःपेक्षा मुलाकडे अधिक लक्ष देई. दिवसभर घडणाऱ्या घटनांची देवाणघेवाण मायलेक रात्री झोपतांना करीत. बरे असले तर हसणे खिदळणे चाले नाहीतर अश्रूंना वाट मोकळी करून दिली जाई.

●●●

# तीन

## भजनाचा छंद

डेबूजीला भजनाचा छंद या वयात लागला. त्याचा स्वर उत्तम होता. तुकारामाचे दोन चार अभंग त्याला पाठ होते. उत्तम चालीवर खड्या आवाजात तो गात असे. हळूहळू त्याची गावभर वाहवा होऊ लागली. दर शनिवारी किंवा एकादशीच्या दिवशी गावकरी भजन करण्यास एकत्र जमले की हटकून डेबूला निरोप जाई. तो इतरांना भजन सांगत असे. त्याचे श्रवण व मनन चांगले असल्याने भजन ऐकता ऐकताच तो गाऊ लागे. ऐकलेले पटकन लक्षात राहात असे. या श्रवणभक्तीचा पुढील आयुष्यात मोठा फायदा झाला. भजन म्हणण्यात तो वाकबगार झाला. जवळपासच्या गावी भजन मंडळीबरोबर डेबूजी जाऊ लागला. त्याच्याशिवाय भजनाचा फड रंगत नसे. भजनकऱ्याबरोबर वरचेवर बाहेर जावे लागले की घरची कामें अडत. मामी रागावे. आईला बोलणी खावी लागत. डेबूचे भजनप्रेम घरी कोणासही आवडत नसे, पण याचा यत्किंचित परिणाम त्याच्यावर झाला नाही. भजनाचा डेबूला छंद जडला. भजन माध्यमातून तुकारामाच्या अभंगाची ओळख पटली. ही साथ जीवनभर टिकून राहिली.

डेबू बारा,तेरा वर्षाचा झाला. गुरे राखणे, शेतावर जाणे, काबाडकष्ट करणे, भजन करणे आदि तो नित्यनेमाने करी.

एकदा चंद्रभान मामा सखुबाईला म्हणाला,'डेबूजी जलमभर ढोरच वळीत राहाणार आहे काय?' सखुबाईला नवल वाटले.

"मंग काय करील तो?"

"वावरात आऊतं हाक्याले चला म्हणावं आमासंग" सखुबाई सुखावली. मामानी स्वतःच म्हटल्यामुळे डेबूलाही बरे वाटले. तो मामाबरोबर कामं शिकायला शेतात जाऊ लागला. नवीन काम शिकताना त्याला हुरूप वाटे. आजवर गाईगुरांशी परिचित असलेला डेबू शेतीच्या कामात रमून गेला.

मामाने त्याला नांगर चालविणे शिकविले. त्याचे सर्व कसब अवगत झाल्यावर पाठोपाठ कुळपणी, वखरणी तो शिकू लागला. एकामागून एकेक

पायरी चढत डेबू शेतीची पूर्ण कामे करू लागला. पावसाळा सुरू झाला की पेरणीकडे अधिक लक्ष द्यावे लागे. कपाशी, ज्वारी, हरभरा, गहू आणि इतरही आंतरपिकं कशी घ्यावी हे तो मामाकडून शिकला. डेबूजी शेतीवर अधिक वेळ राबत असे. अंगकाठी बरी होती. उत्साह दांडगा होता. कामाची जिद्द होती. तो सर्व कामे करु लागला. काळ्या आईच्या पोटातील शास्त्र अवगत होऊन तो पटाईत होताच मामा निश्चिंत झाला. शेतीच्या कामाची पूर्ण जबाबदारी डेबूवर आली. त्याने त्यात कुचराई केली नाही. शेतीची मस्त मशागत केली. पाऊस उत्तम झाला की, पिकं अधिक येत. शेती चांगली पिकू लागल्याने घरातली बरकत वाढली. मामाकडील सर्व मंडळी डेबूवर खुष झाली.

विदर्भात तेव्हा शिक्षणाचा फार प्रसार झालेला नव्हता पण शाळा होत्या. दापुऱ्यालाही शाळा होती. डेबूजीला 'शाळेत जा' असे कोणी म्हटलेच नाही. आईला समजत नव्हते. मामानी शेतीकाम शिकविले पण शाळेचे नाव काढले नाही.

ज्या वयात चार-दोन मुलांसोबत वर्गात बसून मास्तरचा मार खायचा त्यावेळी तो गुराखी मित्रांबरोबर कुस्तीचे फड लावत असे, नदीत डुंबत असे. रेतीत काठीने रेघोटया ओढत असे. गुराख्याची काठी हीच त्याची पेन्सील होती. काळ्या आईच्या पाटीवर नांगराची लेखणी करून तो रेघोट्या ओढत राहिला. पुस्तकांचे ओझे पाठीवर वाहाण्याऐवजी खांद्यावर नांगर वखर घेऊन जाऊ लागला.

दिवसभर बैलांच्या पाठीमागे औत चालवताना डेबूजी तुकारामाचे अभंग गुणगुणत असे. त्यामुळे तो उत्तम भजनकरी झाला पंचक्रोशीत भजन मंडळीसोबत तो जाऊ लागला. कोतेगावला गेला की झिंगराजीचा मुलगा व शेंडगावला गेला की जानोजी व राणोजीचा नातू म्हणून लोक कुतुहलाने न्याहाळीत. अनाथ समजून काही लोकं दयाही दाखवायचा प्रयत्न करीत, पण डेबूजी नकार देत असे.

दापुऱ्याजवळ सांगवी नावाचे गाव असून त्याच्या शिवेला लागून चंद्रभानजीचे एक शेत होते. तिथे कापसाची राखण करायला जावे लागे.

एकदा चांदण्यारात्री डेबू एकदोन मित्रांना घेऊन गेला. ते सर्व कडुलिंबाच्या झाडावर चढून बसले. शेतावर चौफेर नजर घालू लागले. मध्यरात्रीच्या सुमारास सांगवीच्या बाजूने वीस पंचवीस जणांचे टोळके आले. शेतातील बोंडे कापूस वेचू लागले. डेबू लालीलाल झाला. चोरांना हाकारु लागला. एकट्याचा निभाव त्यांच्यापुढे लागणार नाही म्हणून मित्रांनी डेबूस गप्प बसविले. डोळ्यादेखत कापूस चोरला जात होता. तरीही तो हतबल होता. सर्व शांत झाल्यावर तिघेही घरी पोहोचले. कापूस डोळ्यादेखत चोरला गेला याचे फार वाईट वाटले. चोरी सारख्या वाईट प्रवृत्तीला विरोध करताना डेबूलाच बोलणी खावी लागली होती. कारण माल चोरला गेला तरी चालेल पण डेबूचे बरेवाईट झाले असते तर! मामा चिडला तर सखुबाईने समजावून सांगितले. प्रतिकार करण्याची हिंमत कोणातच नव्हती. रागाने लालबुंद झालेला डेबू कसाबसा झोपी गेला. पहाटे लवकर उठून आपल्या मनातल्या व्यथांना त्याने चिंचेखालच्या महादेवाजवळ मोकळी वाट करून दिली. भजनाचा छंद असा जोपासला जात असतानाच महादेवाच्या पिंडीनेही डेबूला आधार दिला.

●●●

# चार

# विवाह

डेबू आता वयात आला. त्यावेळेस विदर्भात बाल विवाहाची प्रथा होती. त्यामुळे डेबूचे लग्नाचे वय कधीच झालेले होते. सखुबाईला त्याच्या लग्नाची काळजी होती. तिच्या मनात असले तरी ओठावर आणण्याची हिंमत होत नव्हती. डेबू सोळा सतरा वर्षाचा झाला. मूळ शरीर कष्टाने सुदृढ व पिळदार झाले होते. ज्वानीची चकाकी चेहऱ्यावर झळकत होती. मिसरुड फुटले होते. तसा डेबूजी वय, रुप, कष्ट कशातही कमी नव्हता. पण त्याच्याजवळ स्वतःचे म्हणून काय होते? तो खपत असलेले शेत मामाचे, राहाते घर मामाचे, सर्वकाही मामाचे होते. स्वतःचे म्हणून काहीही नसताना लग्नाचा विचार कसा करावा. पैका अडका नव्हता. जमीनीचा तुकडा नव्हता. वडिलांची सर्व संपत्ती दारु, आजारपण व कर्जात गेली होती. आईसुद्धा मामाकडेच खपत होती.

एकदा धीर एकवटून सखुबाईने चंद्रभानजीकडे डेबूच्या लग्नाचा विषय काढला तेव्हा, "माझा शब्द आपल्या जमातीत कोन खाली पडू देते काय? नावच काह्याले घेता? माले आदुगरच कां बा नाही सांगितलं? या वख्तापर्यंत तर डेबूजीला एखादं पोरंगही झाल्त असतं!! आता बातच तर मुलगी दारात आणून उभी करतो, मुलगी, मुलगी कोन्या झाडाचा पाला?" असे म्हणून चंद्रभानजीने डेबूच्या लग्नाची तयारी चालवली. सखुबाईचा जीव भांड्यात पडला.

चंद्रभानमामा खूप ठिकाणी फिरला. डेबूला आपली मुलगी देण्यास कोणी तयार झाले नाही. त्यांनी खूप खटपट केली. एखाद्या स्थळावरून परतताना चंद्रभानजीचा पडलेला, दमलेला चेहरा पाहुनच सखुबाई काय ते समजत असे. "आपला मुलगा कुंवाराच राहील काय?" ही चिंता तिला ग्रासत होती. डेबूजी मात्र निश्चिंत होता. कुठलेही कार्य जेंव्हा व्हायचे तेंव्हाच होते यावर त्याचा विश्वास होता.

सखुबाईचे आईवडिल म्हातारे होते. त्यांनाही नातवाची व मुलीची काळजी होती. त्यांच्यापाशी डेबूच्या लग्नाची गोष्ट सखुबाईने काढली तेव्हा तिचे वडील हंबीरराव म्हणाले, "मंग हे घरदार कोनाचं होय? गात्याचा गळा अन् राबत्याचा मळा! इतला डेबू खपते, वावरात जाते, कष्ट करते, हे काह्याचं लक्षन होय? थो काय कोना ऐऱ्यागैऱ्याच्या घरी खपून राहिला काय? खपेल तो खाईल."

हंबीररावाचे हे तत्वज्ञान लोकांना रुजले नाही. डेबूचे लग्न हा चर्चेचा विषय झाला. अमरावती जिल्ह्यात वठ्ठी जमात तशी विरळच. एखादी मुलगी पसंत केली की, नंतर कळवू असा शब्द घेऊन चंद्रभानजी निघत. नंतरचा सांगावा मात्र येत नसे.

शेवटी कमालपूरचे धनाजी खल्लारकर आपली मुलगी डेबूस द्यायला तयार झाले. धनाजी गरीब माणूस, थोडीशी शेती होती. लोकांचे कपडे धुण्याच्या वडिलोपार्जित धंद्यावर गुजराण करी. डेबूजीला धनाजीने पाहिले होते. मुलगा व्यवहारी व सज्जन आहे हे त्यांच्या लक्षात होते. त्यांना कुंताबाई नावाची आठ वर्षांची मुलगी होती. बायकोचा विरोध असल्याने धनाजी तिला म्हणाला, "अवो, घरादाराले काय करतं? कितीकही घरदार असलं, अन् नवरा नबळा असला तर घरदार काय चाटावं लागतं? थे काई नाई म्या जवाई पाह्यला, भला उमदा आहे. त्याच्या भरवश्यावर मले माही मुलगी द्यायची. असन नशिबात तर घरदार उभं राह्यले कोनता वेळ लागतं म्हनावं?"

धनाजीच्या बायकोने या लग्नाला संमती देताच कमालपूरच्या कुंताबाईशी डेबूजीचा विवाह पार पडला. सर्वांना आनंद झाला. चंद्रभानजीनी मोकळ्या मनाने भाच्याच्या लग्नाचा खर्च केला. गावजेवण झाले. सगेसोयरे पांगले. डेबूजीचे गृहस्थाश्रमी जीवन सुरु झाले.

डेबूजीच्या लग्नप्रसंगी सखुबाईला नवऱ्याची तीव्र आठवण झाली. एक डोळा रडत होता तर एक उत्साही होता. मुलगा उजवल्याचा आनंद तिला लपवता आला नाही.

पण डेबूजीच्या लग्नाचे कर्ज उभे राहिले. ते फेडण्यासाठी घरचे दोन गोऱ्हे विकण्याचे ठरले, मामा व हंबीरराव यासाठी तयार होते.

एक दिवस डेबू शेतावर जायला तयार झाला तेव्हा हंबीरराव म्हणाला, "बाबू गोऱ्हे विकून सावकाराचे कर्ज फेडू या कां?"

"मंग म्हातारा बैल थकला, त्याच्याजागी औताले काय जुंपाल?" डेबूजी म्हणाला.

"मंग थो थकला बैल तरी कसायाला विकून टाका" खायला काळ, अन् धरतीला भार!

क्षणभर हंबीररावाकडे पाहात डेबूजी म्हणाला, "मलेच बाजारात उभं करा! मी तरी खायला काळच आहो!"

डेबूच्या युक्तिवादापुढे हंबीरराव बोलला नाही. मामाही हताश झाला.

शेवटी डेबूनेच म्हटले आपण अधिक मेहनत करू. कर्जाची काळजी करु नका. आणि शेतावर अधिक राबता सुरु झाला.

डेबूजीच्या लग्नानंतर चंद्रभानजीच्या मुलाचे बळीरामाचे लग्न झाले. त्यापाठोपाठ त्यांच्या दोन्ही मुलींची लग्ने आटोपली. अशाप्रकारे चार वर्षात लागोपाठ चार लग्नांनी कर्जाचा डोंगर उभा राहिला. चंद्रभानजीने कोणत्याच लग्नात कुचराई केली नाही, हात आखडता घेतला नाही. प्रत्येक लग्नात तिडके सावकाराकडून कर्ज काढले.

पिकं आली. सावकारच्या कर्जात गेली. तशातच १८९६ व १८९९ साली विदर्भात पीक आलेच नाही. खाणारांची संख्या वाढली. नातवंडानी घर भरु लागले.

डेबूजीचे शेतात कष्ट सुरु होते. बळीरामही मदत करु लागला. मुलं राबतात, शेतं पिकवतात हे पाहून चंद्रभानजींचे कामाकडे दुर्लक्ष झाले. घराचा संपूर्ण भार डेबूजीवर येऊन पडला.

चंद्रभानजीचे जुने घर जीर्ण झाल्याने विटामातीचे नवीन घर उभे करायचे ठरविले. त्यासाठी पुन्हा कर्ज!

चंद्रभानजी निरक्षर माणूस. तो सावंगी दुर्गडयाच्या तिडके सावकाराकडून कर्ज घेत असे. त्याने हिशेब कधी पहिलाच नाही. त्याला तो कळलाही नसता. कर्ज काढणे एवढेच त्याला माहित. व्याजावर व्याज वाढत गेले. कर्जाची परतफेड करणे कठीण झाले.

एकदा तिडके सावकारांचे बोलावण्यावरून चंद्रभानजी दुर्गडयाला गेले. सावकाराने हसून त्यांचा सत्कार केला. सोबत पंक्तीला बसवून घेतले. सावकार मोठ्या गोड वाणीचा होता. इकडच्या तिकडच्या, शेतापाण्याच्या गप्पा झाल्या. हळूच तो चंद्रभानजींना म्हणाला, 'आपण घेतलेल्या कर्जाचा हिशेब सांगू काय?"

चंद्रभानजी घाबरले. त्यांना सावकाराच्या कर्जाची कल्पना होती, पण इतके दिवस चकार शब्द न बोलणारा सावकार आज अस कां वागतो याची जाणीव होताच ते अस्वस्थ झाले.

दिवाणजी वहिखाते घेऊन आला. आजपर्यंत चंद्रभानजीकडून काही आलेच नाही. याचा त्याने पाढा वाचला व रक्कम सांगितली. व्याजासकट जवळपास सतराशे रुपयाचे कर्ज होते. एक दोन आकडे सावकाराने जाणून बुजून लिहिले नव्हते. माणुसकीपुढे पैशाला किंमत नसली तरी चंद्रभानजीने त्याची आठवण करून दिली. शे-दोनशे रुपये कमी होईलसे वाटले. पण सावकार धूर्त व चाणाक्ष होता. शेवटी कर्जाचा आकडा सोळाशे पंचेवीस रुपयावर येऊन थांबला.

सोळाशे पंचेवीस! चंद्रभानजींना घेरी आली. सावकार म्हणाला, 'मी तुम्हाला आताच परतफेड करा असे म्हणणार नाही पण माणसाचा काय भरवसा तुझ्यामांगं तुझ्या मुलानं कर्जाला नकार दिला तर?"

सावकारापुढे चंद्रभानजी बोलला नाही. जमिनीचे गहाणपत्र तयार करण्याचे ठरले. दुसरे दिवशी दोघेही मूर्तिजापूरला गेले आणि सोळाशे पंचेवीस रुपयासाठी डेबूजी मशागत करीत असलेली दापुऱ्याची संपूर्ण छप्पन्न एकर जमीन तीन वर्षाच्या कराराने गहाणफेड म्हणून रीतसर कागदपत्र तयार करूनच परतले.

ही वार्ता घरी कळू न देण्याची मामांनी दक्षता घेतली असली तरी सर्वांना माहित झाले. आजपर्यंत तिडके सावकाराने याच मार्गाने गोड बोलून कितीतरी भोळयाभाबड्या शेतकऱ्यांच्या जमीनी हडपल्या होत्या. लोक आपआपसात कुजबुजू लागले की, 'मगरीने माणिक गिळले!'

तसे पाहता चंद्रभानजी व तिडके सावकाराची घनिष्ठ मैत्री होती. पण पैशापुढे मैत्री कवडीमोलाची असते हेच खरे.

डेबूजीला हे समजल्यावर मामांशी त्याचे भांडण झाले. बळीराम, मामी, हंबीरराव, आजी व सखुबाई सर्वच चंद्रभानवर तुटून पडले.

चंद्रभान सावकारापुढे नमला. घरच्यापुढेही हात टेकून म्हणाला, "पाह्यरे बाबू, म्या तर लेहून देल्ल! आता करा तुमाले काय करता यीन थे."

डेबूने मामाला धीर दिला. आजा-आजीला व मामीला समजावून सांगितले. चूक माणसाच्या हातूनच होते. ती आता निस्तारली पाहिजे. जे व्हायचे ते झाले आहे. सावकाराने आपला घात केला असला तरी आपली जमीन सोडवून घेतलीच पाहिजे. त्यासाठी 'दोन चार वर्ष जास्त कष्ट करू. दोन घास कमी खाऊ, पण कर्ज फेडू, चिंता नको," डेबूजीने सर्वांना धीर दिला.

घरातील सर्व मंडळी नव्या उमेदीने कामाला लागली. शेतात अधिक खपू लागली. खर्चात काटकसर सुरु झाली. सणवार, गोडधोड कोंबडीबकरे बंद झाले.

भाच्याचे धीराचे शब्द ऐकून चंद्रभानजीला बरे वाटले. पण घराची दैना पाहूनच तो खंगला. या सर्व परिस्थितीला स्वतःला जबाबदार धरु लागला.कर्जामुळे अंतरंगाला झालेली जखम खूप जिव्हारी झोंबली. ती बरी होऊ शकली नाही. तो मनाने खचला. चेहऱ्यावर अवकळा आली. अंगात बारीक ताप राहू लागला. तो अंथरुणालाच खिळला.

सावकार व आम्ही पाहून घेऊ असे डेबूजी मामाला सांगे पण त्यास खूप कामे पडतात हे तो पाही. उपाशी तापाशी पोरं शेतात खपतात हे चंद्रभानजीना बघवेना.

'आपल्यामुळे हा प्रसंग ओढवून, घराचे मातेरे झाले' असे चंद्रभानजीना वाटत राहीले. प्रकृतीने तो क्षीण होत गेला. अन्नपाणी सुटले. आणि एक दिवस त्याने जगाचा निरोप घेतला.

सावकाराच्या कर्जापोटी, जाचापोटी मामाचा बळी गेला ही गोष्ट डेबूजीला अतिशय लागून राहिली.

आणि, अन्यायाच्या प्रतिकारार्थ एक संघर्षमय जीवनाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

●●●

# पाच

# सावकाराशी संघर्ष

मामाच्या निधनानंतर डेबूजीने सर्वांना सांभाळण्याची जबाबदारी नेटाने पार पाडली. सर्वांना घेऊन तो शेतीची कामे करु लागला.बळीरामची बायको घरकाम सांभाळू लागली. म्हातारा हंबीरराव शेतीची राखण करी. घरगड्यांची सुट्टी करण्यात आली. डेबूजीने कठोरतेने घरखर्चाला आवर घातला. पैसा अडका जमवून सावकाराचे कर्ज फेडून मामाचे शेत बळीरामच्या हवाली करणे हा एकच ध्यास त्याला लागला.

सुगीचे दिवस आले की डेबूजीचे हिशेब सुरु होत. होणाऱ्या ज्वारीपैकी किती घरी ठेवायची, किती विकायची, किती सावकाराला द्यायची याचे हिशेब होत. कापूस व इतरही पिकांचे आराखडे होत. किमान खर्च बाजूला सारून बाकी सावकाराच्या घरी जाई.

मरतेसमयी मामाला दिलेला शब्द पाळण्यासाठी तो धडपडू लागला. वडिलांचे लाडकोड त्याने पाहिले नव्हते, अनुभवले नव्हते. पितृप्रेमाला पोरका झालेला डेबूजी जो काही आहे तो फक्त मामामुळे, हे विसरणे शक्य नव्हते. म्हणूनच मामाच्या अकाली मृत्युची सल अधिक बोचरी होती.

अशाच एका हंगामात खळे तयार झाले. पिकांची मळणी झाली. कापूस, ज्वारी, तूर घेऊन डेबूजी सावकाराचे घरी गेला. सावकाराच्या माणसांनी ते धान्य कोठीत पोचते केले.

सर्व सोपस्कार आटोपल्यावर डेबूजी सावकाराला म्हणाला, "हे इतलं पावलं, अशी पावती देजा!"

सावकार आश्चर्याने पाहू लागला. सर्वांना नवल वाटले. सावकाराला आजपर्यंत कोणी पावती मागितली नव्हती, आणि पावती देणे ही तिडके सावकाराची पद्धत नव्हती. सर्व व्यवहार विश्वासावर चालत असे. सावकाराने कर्ज फिटले म्हटले की देणे बंद करावे, नाहीतर देत राहावे हेच लोकांना माहित होते.

"पावती कशाची रे बोआ?" तिडके सावकार म्हणाला.

"हा इतला माल पावला याची."

"आमच्यावर तुझा विश्वास नाही काय?"

"ईश्वासाचा सवालच कोठी उभा राह्यते? माल घेतला पावती दिली."

सावकार उमगला. डेबूजीच्या व्यावहारिक ज्ञानापुढे सावकाराने नमते घेतले. तो दिवाणजीला म्हणाला,

"याचा माल जमा करा. अन् याले पावती देजा. आता नको, सवडीनं द्या."

सावकाराने प्रसंग टाळून नेला. पण डेबूजीचा पवित्रा सावकाराच्या नजरेतून सुटला नाही. तो सतर्क झाला.

सावकाराच्या ध्यानात आले की हा डेबूजी भारी वस्ताद आहे. भोळाभाबडा चंद्रभान नव्हे.

प्रत्येक वेळी डेबूजीने माल पोचता करावा. पावती मागवी आणि सावकाराने पुढच्या खेपेला देतो म्हणावे, असे एकदोनदा झाले. सावकाराचा इरादा नेक नसल्याचे डेबूजीच्या लक्षात आले.

एकदा सावकाराचे नोकर डेबूजीच्या खळयावर हजर झाले. आता पावती दिल्याशिवाय मालाला हात लावू देणार नाही असे डेबूजीने त्यांना निक्षून बजावले. तो निरक्षर असला तरी सावकाराला दिलेल्या मालाचे आकडे ओठावर होते. तेवढी पावती आणल्याशिवाय माल मिळणार नसल्याने नोकर वापस गेले. डेबूजीने माल दिला नाही. सावकाराचे बोलावणे आल्यावर तो गेला व म्हणाला, "आता आपले काहीही देणे राहिले नाही. पूर्ण रक्कम फिटली."

सावकार स्वस्थ बसला नव्हता. डेबूजीला नमविण्याचा एक रामबाण उपाय त्याला सापडला. पूर्णाकाठावरचे पंचेवीस एकराचे शेत मामाने सावकाराकडून विकत घेतले होते. सात, आठ वर्षापासून त्याची मालकी यांचेकडेच होती. जमिनीचे सर्व पैसे सावकाराला पोचते झाले होते. पण पूर्ण

व्यवहार मात्र विश्वासावर पार पडला होता. जमिनीचा पट्टा व कागद तयार केला नव्हता अर्थात कायदेशीर मालक अजूनही सावकारच होता.

चंद्रभान कोळसकराची ही जमीन ताब्यात घेण्याचे सावकाराने ठरविले. कोर्टात अर्ज करून रीतसर जमिनीचा ताबा घेणारे पत्र मिळविले. कोर्टामार्फत जप्तीचे वारंटपत्र पाठवून कब्जा घेण्याची तारीख ठरविली. डेबूजीला सर्व मामला लक्षात आला. तो त्वेषाने तडफडू लागला. सावकार बेईमान असला तरी तो या थराला जाईल असे डेबूजीला वाटले नव्हते.

डेबूजीने सावकाराशी हमरीतुमरी केली नसती तर ही वेळ आली नसती असे गांवकरी बोलू लागले. घरची मंडळीही डेबूलाच दोष देऊ लागली. चुक करणाऱ्या सावकाराला कोणी न बोलता आपल्यालाच मात्र बोलणी खावी लागते याचा डेबूजीला संताप आला.

कोर्टकचेरीच्या नावाने खेडयातील मंडळी घाबरत असतात. त्यातही सावकाराला समजावून सांगण्याची हिंमत कोणातच नव्हती. खऱ्याचे खोटे होतांना गावकरी पाहत बसले, पण बोलले नाही.

दापुऱ्यात सोनाजी राऊत नावाचे सदगृहस्थ होते. समाजात त्यांना मानसन्मान होता. हंबीररावांनी त्यांचा सल्ला घेतला. रितसर नोंदणी न केल्याने वावर सावकाराला द्यावे लागेल असे त्याने सांगितले. विश्वासघात आणि सुड याचे प्रत्यंतर सावकाराच्या रुपाने पहायला मिळत होते. सत्याचा विजय होतो का? याचे उत्तर सांपडेना!

डेबूस समजावीत सोनाजी म्हणाला, "अरे बाबू, तो तिडके सावकार आहे, अच्छे अच्छे जाट रजपूत तर त्याले टरकून असतात! तुहं वावर जाणार!"

डेबूजी लालबूंद होऊन म्हणाला, "कसे त्याचे औतं येतात, तेच पाह्यतो मी"

मामला वेगळा होता, तहसिलदार, मामलेदार व पोलिसपाटील सर्व सावकाराच्या तंत्राने चालत होते. अशा सावकाराच्या विरुद्ध उभे राहणे कठीण होते.

शिवाय डेबूजी ज्या शेतासाठी भांडत होता ते शेत त्याचे स्वतःचे होते काय? कायद्याप्रमाणे मामाचेतरी होते काय? पण ज्याचेकडे आपण वाढलो, मोठे झालो, त्या पालनकर्त्या मामाला देवाघरी जाताना दिलेला शब्द पाळणे डेबूजीचे कर्तव्य होते. ज्या सवकाराच्या जाचापायी मामा वारला तोच सावकार आज पूर्ण घराची राखरांगोळी करायला निघाला होता.

बेईमानाने केलेल्या दांडगाईच्या विरोधात संघर्ष करण्याचा डेबूजीने पक्का निर्णय घेतला.

घरची मंडळी कायद्याप्रमाणे तिडके सावकाराला शेत देऊन टाकावे या मताची होती. विनाकारण झगडा भांडण त्यांना नको होते. फक्त डेबूच तेवढा विरोधात होता.

कब्जा घेण्याचा दिवस जवळ येऊ लागला तसतसे घरातले वातावरण तापू लागले. घरच्यांची हाराकिरी डेबूस अजिबात पसंत नव्हती. कधी नव्हे तो डेबू घरच्यांच्या विरोधात बोलू लागला.

डेबूला मामांची आठवण झाली. आज मामा असते तर! हा अन्याय मुकाटयाने सहन करण्याची पाळी आलीच नसती.

त्याचे मन उदास झाले. तो खिन्न मनाने पडून राहिला. झोप येईना. डेबूजी घराचे बाहेर पडला. उद्विग्न मनःस्थितीतच तो रात्रभर महादेवापाशी पडून होता. पहाटे नदीवर स्नान करूनच घरी परतला.

एकदाचा कब्जा घेण्याचा दिवस उजाडला. सावकार पूर्ण तयारीनिशी सज्ज होता. त्याचेसोबत चार पाच गडी माणसं होती, सोबत सरकारी कागद होता.

डेबूच्या मनात कालवाकालव असली तरी वरवरून तो शांत भासत होता. तो सकाळी लवकरच वखर घेऊन शेतावर हजर झाला. त्याला शेताकडे जाताना पाहून लोक म्हणाले, 'आज विपरित घडल्याशिवाय राहणार नाही.!'

उन्हाळा संपत आला होता. पावसाची सर मध्येच हजेरी देऊन जाई. डेबूच्या मनातली घालमेल उन-पावसारखीच होती. त्याचे डोळे सावकाराचा रस्ता धुंडत होती. बळीराम व हंबीररावही शेतावर पोहचले, त्यांनी पुन्हा

एकदा शेवटचे डेबूस समजावून सांगितले. सखुबाईला तर दुःखाने रडूही फुटेना. कुंताबाईचाही कंठ दाटलेला होता. डेबू कोणाचेच ऐकेना. तो आज इरेला पेटलेला होता.

मात्र तो शांतपणे वखर चालवित रस्ताही न्याहाळत होता. सूर्यदेव सावकाश वर सरकत होता. दूरवरून सावकार आपल्या माणसांना घेऊन येताना दिसला. स्वत : तिडके सावकार घोडयावर असून, मागे बघणाऱ्यांचा लवाजमा होता. सोबत चार दोन औतकरी आणि हातात लाठया घेतलेले पहेलवान होते. त्यात हनुमंता नावाचा एक दांडगा माणूस होता. वृत्तीने बेधडक असल्याने तो शेतात शिरला व डेबूला म्हणाला,

'ओ डेबू! अबे वो वट्ठी!"

क्षणभर थांबून डेबूजीनेही त्यास हांकारले, "हनुमंता तू येताना घरच्या लक्ष्मीले पुसून आला काय?"

"तू तुझा विचार कर" हनुमंता म्हणाला.

"मी तर माह्या घरचं कुंकू पुसून आलो आहे." डेबूचा आवाज चढला.

हनुमंता वरमला. डेबूचे बोलणे त्याला उमगले होते. त्याचा हात पुढे सरसावला नाही. डेबूने वखर चालविणे सुरू केले. घरची सर्व मंडळी धाय मोकलून रडत होती. म्हातारा हंबीरराव सावकाराच्या पाया पडत होता. तर बळीराम लाचार होऊन डेबूला समजावित होता.

हनुमंताचे माघारी फिरणे सावकाराने पाहिले. त्याने परत दोघांना खुण केली ते दोघेही तगडे लाठीबाज होते. त्यांनी दोन्ही बाजूनी धरून डेबूजीस जखडून ठेवले.

औतकऱ्यांना सावकार म्हणाला, "अरे पाह्यता काय? चालवा वखर. काय करतो तो डेब्या वट्ठी? मी आहे, पाहून घेईन!"

सोबत आणलेल्या माणसांना तो असाच आदेश देत राहिला. पण सर्वांना डेबूजीच्या ताकतीची कल्पना होती. एकटा डेबूजी दोन चार जणांना भारी होता. त्यांना सावकाराचा आदेशही मोडवत नव्हता आणि डेबूजीची

भीतीही वाटत होती. सावकाराचा पक्ष असत्याचा आहे हे गावकऱ्यांना माहित असले तरी पैसा आणि दांडगाईपुढे बोलण्याची कोणाची हिंमत नव्हती. सगळा जमाव काय घडते ते पाहू लागला.

डेबूजी सावधपणे काय करायचे ते ठरवत होता. दोघांनी जखडून ठेवल्यावर तिसरा मारायला धावणार एवढयात डेबूने हिसका देऊन एकाला खाली पाडले, दुसऱ्याला लाथ मारली, हे पाहून तिसरा तसाच पळून गेला.

आता मात्र डेबुजी रागाने लालबुंद झाला. मागचा पुढचा विचार न करता त्याने पराणी उचलली व सावकाराच्या दिशेने धावत सुटला.

त्याचा त्वेष पाहून सावकार घाबरला. त्याने लगेच घोडा वळविला पण तेवढ्यात डेबूजी तिथे पोचला होता. हातातील काठीचा एक जबरदस्त वार घोड्याच्या पुठ्ठ्यावर बसला. घोडा उधळला व सावकारासहित गावाच्या दिशेने पसार झाला.

सावकार चाणाक्ष असल्याने जीव मुठीत घेऊन पळाला. सावकार गेल्यावर त्याचे भाडोत्री तिथे थांबले नाही. त्यांना उद्देशून डेबूजी म्हणाला, "बाबारे, माह्यावालं भांडान् तुमच्यासी नाही, पण या वादात तुमी कायलें पडता, वापस जा."

सावकारासोबतची सर्व मंडळी वापस गेली. फुकटचे भांडन विकत घेतले म्हणून घरच्यांनी मात्र डेबूजीवर रोष प्रकट केला.

डेबूजी माघारी वळला. कोणाच्याही बोलण्याकडे लक्ष न देता शांत चित्ताने वखरण करू लागला.

सत्याची असत्यावर मिळविलेल्या विजयाची ही नांदी होती.

दुपारच्या वेळी नदीवर आंघोळ केली. बैलांनाही न्हाऊ घातलं, आणि महादेवाचे दर्शन घेऊन डेबूजी घरी परतला.

"वठ्ठयाच्या डेबूने तिडके सावकाराला पळवून लावले." ही बातमी वाऱ्यासारखी गांवात व पंचक्रोशीत पोहचली होती.

डेबूला घराकडे जाताना पाहून लोकांच्या नजरेत कुतुहल जाणवत होते. काहींना त्याचा अभिमान वाटला.

"आता पोलिस डेबूला अटक करून घेऊन जाणार" असे प्रत्येकालाच वाटत होते.

पण तसे काही झाले नाही. तिडके सावकार धूर्त व मुत्सुद्दी होता. त्याने शांत चित्ताने विचार केला, आणि 'समझोता' करण्याचे ठरविले.

सोनाजी राऊतला बोलावणे गेले. मध्यस्थ म्हणून तो सावकार व हंबीररावालाही भेटला.

डेबूजी घरी नसताना बळीरामलाही विश्वासात घेतले गेले.

सोनाजी म्हणाला, "सावकार मोठ्या दिलाचा माणूस आहे. त्याने कृपावंत होऊन पंधरा एकर जमीन परत करायची ठरविली आहे" आणि "आता काही येणे नाही" अशी पावतीही देणार असल्याचे सोनाजीनी सांगितले.

सावकाराचा हा धूर्त सौदा हंबीरराव व बळीरामला पटला, त्यात घरच्या सगळ्यांनी होकार भरला.

व्यवहाराचा कागद तयार झाला. सगळ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

खोट्याचे नाटे करणाऱ्या सावकाराच्या घशात बाकी सर्व जमीन गेली. पंधरा एकरावर बळीराम समाधानी झाला. सत्तेचा सत्त्यावर विजय झाला होता.

हा सर्व व्यवहार डेबूजीच्या मागेच उरकला होता. तो चिडला, सर्वांना उणेदुणे बोलला. पण मामला संपला होता.

मामाला दिलेला शब्द डेबूजीला पाळता आला नव्हता. त्याचे मन उदास झाले. विरक्तीने भरून आले.

रात्रभर तो हताशपणे महादेवापाशी पडून राहिला.

●●●

# सहा

# मुलीचे बारसे

म्हातारा हंबीरराव खंगत चालला. म्हातारीनेही अंथरूण पकडले. बळीराम शेतावर खपत होता. सखुबाई व मामी संसाराचा गाडा पुढे रेटू लागली. जमीन परत मिळाल्याने खाण्यापिण्याची सोय झाली होती.

डेबूजीला दोन मुली होत्या. मोठी आलोका, दुसरी कलावती. तिसरा मुलगा झाला त्याचे नांव मुदगल ठेवले. बळीरामलाही मुलंबाळं होती. सर्वांचा संसार परत सुखाने सुरु झाला.

डेबूचे मात्र घरात, संसारात मन रमेना. शेताकडेही तो फारसा जात नसे. भजनाकडे त्याचा कल झुकू लागला.

चार दोन लोकांत उठबस वाढली. भाविकपणामुळे त्याला बाहेर मान सन्मान भेटू लागला. डेबूचे म्हणणे डावलून चालणार नाही हे लोकांच्या ध्यानात आले.

पण घरी मात्र डेबूजीला वारंवार विरोधाला तोंड द्यावे लागले.

प्रसंग मुलीच्या बारशाचा होता. मूल जन्मले की मटन व दारु पिऊन आनंद मानणे हा परीट समाजाचा रिवाज होता. या सामाजिक रुढीविरुद्ध बोलण्याची कोणाची हिंमत नव्हती.

"घरी कोंबडे बकरे कापून प्रसंग साजरा करावयाचा नाही' हा निर्णय डेबूजीने सांगितला.

'जनरीत सोडू नये, प्रथेप्रमाणे वागावे' असे सर्वांचे मत होते.

"आपल्या घरी बकरेगिकरे काप्याचे नाई, दारुचा एक थेंबही या घरात आन्याचा नाई." डेबूजी ठणकावून बोलला.

गुंता वाढतच होता. समाजात नाचक्की होईल असे हंबीररावला वाटले. नातू इरेला पेटला होता, त्याचे समाजशास्त्र जातभाईना कळत नव्हते.

"अरे मंग रीत ?" हंबीरराव म्हणाला

वाईट रीती बदलल्या पाहिजेत असे त्यांनी सुचविले

"हे तुहं झालं. सोयरे अन् जातवाले काय म्हनतीन."

"त्याहीले बकऱ्याच्या जागी लाडू घाला."

डेबूजीने आपल्या मनासारखे केले. लाडूचा स्वयंपाक केला. सोयरे-धायरे नाराज झाले. हे असे परटाघरी घडले नव्हते. ते वाद घालू लागले. भांडणाला तोंड फुटले.

"मले झालेला आनंद गोडाघोडानं साजरा कराचा." डेबू आपल्या निर्णयावर ठाम होता.

"आनं मंग दारु?"

"दारु पेवून कोनाचं बरं झालं थे सांगान का?"

"आता पावतर पेत आले थे?"

"कोनी गोष्ट आतापर्यंत चुकत आली, तर ते सुधरली पायजे. त्याले शाहणपना म्हणतत. बारशाच्या दिशी दारु पेऊन बेभान होणं ह्या कोन्ता शहानपना होय म्हनाव?"

जातभाई, नातलग अडून बसले. डेबूजीनी त्याना नानाप्रकारे समजावून पाहिले, पण उपयोग झाला नाही. घरच्या मंडळीनाही डेबूजीचे वागणे पसंत पडले नाही.

डेबूजीमात्र खंबीरपणे म्हणाला, "लाडू केले आहेत, मी बकरा कापणार नाही. ज्याला जेवायचे असेल त्याने जेवावे, नसेल त्याने रस्ता धरावा."

काही नातलग उठून गेले. शहाणे होते ते जेवले. बरेच अन्न वाया गेले.

सर्व जातभाई डेबूजीच्या विरोधात गेले.

सोयऱ्याधायऱ्यात नाचक्की झाली म्हणून घरच्या मंडळीनीही अबोला

धरला. घरातली धूसफूस वाढत चालली.

'बुडती हे जन देखवेना डोळा' या थाटाची ही तळमळ होती. पण कोणासही समजली नाही. रुढ समाज व्यवस्थेविरुद्ध तथाकथित प्रतिष्ठेला दिलेला हा हादरा होता.

डेबुजीच्या घरचा हा पहिलाच आनंदाचा प्रसंगही सामाजिक रोषाचा बळी ठरला.

●●●

# सात
# संसाराकडे दुर्लक्ष

डेबूजीची दिनचर्याच बदलली. डेबूजी जातीने परीट असल्याने धुण्याचे, साफसफाईचे तंत्र त्यास माहित होते. पहाटे उठून गाईगुरांचे शेण काढणे, गोठा साफ करणे, अंगण झाडून सर्व घर तो लखलखित करीत असे.

कामात डेबूजीचे कौशल्य वाढू लागले. कोतेगावला मातीचे रस्ते होते. पावसाळयात चिखलात बैलगाडया रुतत, तर उन्हाळयात धुरोळा फार होई. डेबूजीनी फावल्या वेळात मुरुम आणावा, रस्त्यात टाकून ठेवावा त्यामुळे पावसाळयात रस्ता पक्का होई.

थंडीच्या दिवसात शेकोटीजवळ बसून लोक गप्पा करीत. डेबूजीनी त्यांना म्हणावे 'गप्पा मारु नका. काही कामं करा. भवंताली हजार कामं पडली आहेत.'

डेबूजी रात्रंदिवस कामात व्यग्र असे. फावला वेळ अजिबात नसे.

दर रविवारी पहाटे उठून डेबूजी ऋणमोचनास जाई. **वाटेने अभंग गुणगुणत जाताना लोक म्हणत! 'थो डेबूजी वठ्ठी असन!'**

पूर्णेत स्नान करावे, मुदगलेश्वराला ओलेत्याने पाणी घालावे, देवापाशी ध्यान धरून बसून रहावे. कोणाशी काही बोलू नये. फक्त जगाचा विचार करावा. मनास आले की गांवाकडे परतावे. असा डेबूजीचा नित्यक्रम झाला.

परत दिवसभर स्वतःला कामाला जुंपून घ्यावे. ही कर्मयोगी जीवनाची जणू सुरुवातच होती!

आता डेबूजीचे मन संसारात लागेना. दापुरे गावच्या परिसराचा त्यास विट येऊ लागला.

एकदा ऋणमोचनला कपडे काठावर ठेवून तो पूर्णा नदीत स्नानासाठी उतरला. कडोसरीला जपून ठेवलेला एक कलदार रुपया पात्रात पडला. शोधूनही सांपडला नाही. कायमचा गेला.

डेबूजीपुढे जणू वीज चमकली. एक रुपया नदीत गेला. तो पुनः सापडला नाही. कायमचा जातो, आणि संबंध आयुष्य!

असे किती आले आणि गेले. येतील आणि जातील. सगळ्यांचा मार्ग एकच! जित्याला मरण अटळच!

'मग लोक जाताना कां बरे रडतात; गेले त्याचा शोक कां करतात? किती सरळसोट प्रश्न! पण लोकांना उगाच बाऊ करण्याची सवय! डेबूजीच्या मनातील प्रश्नांना उत्तर हवे होते.

आणि त्या दिशेने डेबूजीचा जीवनप्रवास सुरू झाला होता.

आलोकाच्या मागून दोन वर्षांनी कलावतीचा जन्म झाला. त्यानंतर दोन वर्षांनी मुदगलचे आगमन झाले. मुदगलेश्वरावर डेबूजीचे निरतिशय प्रेम असल्याने मुलाचे नांव मुदगल ठेवले होते. डेबूजी मुलाच्या प्रेमात पडला. त्याला खेळवू लागला.

मुदगल सहा महिन्याचा झाला आणि लहानसे निमित्त होऊन त्याने या जगाचा कायमचा निरोप घेतला.

मुलाच्या निधनाने डेबूजीवर संकट कोसळले. घरात लळा लावणारा तो एकमेव जीव होता. तोही परमेश्वराला प्रिय झाला.

मुलाच्या जन्माच्या वेळी बकऱ्याचे जेवण झाले नाही. "याने देवाला बकरें कांपले नाही म्हणूनच पोरगा मेला" असे लोक म्हणू लागले.

पुत्र निधनाचे दुःख आणि जातभाईची टोचणी पाहून अडाणी समाजापुढे डेबूजी हवालदिल झाला.

शोक ओसरल्यावर मधले काही दिवस बरे गेले. डेबूजीने परत स्वतःला कामात झोकून घेतले. अशातच कुंताबाईला चौथ्यांदा दिवस गेले.

एक दिवस डेबूजीला मागील सर्व घटनांची आठवण होऊन मनाला **उदासीनतेने** घेरून टाकले.

आता तर त्याचे मन संसारातून पूर्णतः उडून गेले. त्याला घरी अजिबात करमेना. सभोवतालच्या समाजाचा विट आला. भजनात डेबूजी अधिक वेळ घालवू लागला.

गृहत्यागाचे विचार डेबूजीच्या मनात घर करू लागले.

●●●

# आठ

# अंतर वाढत गेले

अकोल्याशेजारी उत्तरेस तीन कोसावर उगवा नावाचे लहानसे गाव आहे. डेबूजी भटकत भटकत या गावी पोहचले. त्यावेळी या गावचे पोलीस पाटील श्री.बाबाराव देशमुख होते. गावात त्याचा दरारा होता. रयतेवर त्यांचे वजन होते. त्यांच्या हाताखाली दोन कोतवाल होते, त्यापैकी एक होता माधव शिरसाट. वय अंदाजे पन्नास वर्षाचे असावे. कोतवालाला पोलीस पाटलाने शेतावर फेरफटका मारायला घोडी दिली होती, त्यावर तो रुबाबात जात असे.

एकदा हा कोतवाल दारुच्या नशेत धूत पडला होता. घोडीवरून पडल्याने बराच मार लागलेला, उठायची सोय नव्हती. डेबूजीना तो दिसला. तशाही अवस्थेत भिकारी समजून डेबूजीस त्याने बेदम मारले. कोतवालाची स्थिती त्याचा राग न धरता त्यास डेबूजीने घरी आणून सोडले व "दारु पिणे सोडा, तुमचे कल्याण होईल" असा उपदेश केला.

व्यसनाधीन झालेला कोतवाल सत्मार्गावर चालू लागला.

डेबूजी असेच न सांगता अधून मधून घराबाहेर जाऊ लागले. घरादाराची, स्वतःची चिंता, काळजी मुळी उरलीच नव्हती.

डेबूजीच्या वागण्या बोलण्यातही फरक पडला. कुठेही जावे, मिळाले तर खावे पण कोणास काही बोलू नये अशी संपूर्ण निःस्पृह जीवन जगण्याची कामना बळावत चालली होती.

नानापरीच्या विचारानी त्यांच्या मनात थैमान मांडले होते. शेतकऱ्यांच्या पिळवणुकीविरुद्ध आवाज उठवावासा वाटत होते. जातीपातीतील भांडणे पाहून त्यांचे मन कळवळू लागले. समाजातील अंधश्रद्धा आणि कर्मकांडाविरुद्ध जागृती कराविशी वाटे.

समाजातील वाईटाविरुद्ध आवाज उठवावेसे वाटत असले तरी डेबूजीच्या वाणीला सामर्थ्य कुठे होते?

उलट सखुबाईंच्या मुलाला, डेबूजी वठ्ठयाला वेड लागल्याचे लोक बोलू लागले.

हो! डेबूजी वेडे झाले. ह्या वेडेपणाचा कोणाला त्रास नव्हता. त्यांचे ऐकणारांचा फायदाच होता.

सामाजिक जाणीवेने प्रगल्भ होत चाललेल्या एका संताचे हे वेड होते.

विशिष्ट ध्येयाने वेडा होणारा माणूसच क्रांती करू शकतो. प्रपंचाच्या मोहपाशात अडकून लोकांचा संसार चालविता येत नाही. त्यासाठी सर्वसंग परित्याग करून घरादारावर तुळशीपत्र ठेवावेच लागते. ध्येयपूर्तीसाठी डेबूजींचा असाच प्रवास सुरु झाला होता.

एकदा डेबूजी घरी आले. अडगळीतून चोणकं शोधून त्याला तार बसविली. तंबोरा जमविला आणि तालावर वाजविण्याचा प्रयत्न करीत भजन गाऊ लागले.

आपला नवरा असा विक्षिप्त का वागतो असा कुंताबाईला प्रश्न पडला. हंबीरराव नातवासाठी झुरू लागला. सखुबाई गंडेदोरे करू लागली.

समाजाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत डेबूजीना जे पटले नाही ते त्यांनी केले नाही.

सखुबाईने एकदा डेबूजीना विचारले, "आता शेंडगावला चालशीन काय?"

"कशाले"

"तुझ्या बापाचं घर होतं, तथीसा वावर होतं."

"आज आहे काय?"

"थे तर झालचं म्हना"

"ज्या मानसाचं कोणीच काही नाही, त्याची अवघी पृर्थई आहे, कोनतंही काम करावं अन् खावावं."

पुन्हा सखुबाईनी शेंडगावचे नांव काढले नाही. **डेबूजी व घरचे अंतर** मात्र उत्तरोत्तर वाढतच गेले.

●●●

# नऊ

# गृहत्याग

ऋणमोचन हे यात्रेचे ठिकाण, दापुरा व कोतेगावला जवळ असल्याने बऱ्याच साधुसंताचा सहवास गावाला लाभे. काही साधूंबरोबर शिष्य परिवारही असायचा.

त्यावेळी कोणाला तरी गुरु करण्याची परंपरा जोरात होती. कोण्यातरी बुवापाशी जाऊन त्याच्या पायावर डोके टेकून गुरुमंत्र घेतला जाई.

आईवडिलाने दिलेल्या या शरीरात आत्मा फुंकण्याचे काम गुरू करतो हे डेबूजीना माहित होते. त्यामुळे गुरू करण्याचा विचार त्यांच्याही मनात बळावला.

दापुऱ्याला दौलतगीर नावाचा गोसावी होता. त्याच्याकडे जाऊन बरेचजण गुरुमंत्र घेत असत. डेबूजीनीही एकदा सकाळी दौलतगीर गोसाव्याच्या घरी जाऊन नमस्कार केला व त्याला गुरुमंत्र मागितला.

दौलतगीरचा शिष्य करावयाचा एक नियम होता. दुसरा गुरु करावयाचा नाही व त्याच्या मठाशी एकनिष्ठ राहून गुरुची मनोभावे सेवा करायची. डेबूजीनी मान्यता दर्शवून गुरुमंत्र घेतला.

सायंकाळी डेबूजीना मठात वाईट अनुभव आला. मठामध्ये दारु पिणारांची रेलचेल होती. दौलतगीरलाही दारु आणून द्यावी लागते हे त्यांना कळताच दुसऱ्याच दिवशी त्यांनी मंत्रत्याग केला. म्हणूनच समाजातील भोंदुगिरीबद्दल त्यांनी जन्मभर आवाज उठवला.

ज्या दारुपायी त्यांनी नातलग तोडले. घराण्याची नाराजी ओढवली, त्याचपायी त्यांनी क्षणाचा गुरुही तोडून टाकला.

त्यानंतर त्यांनी कोणालाही गुरू केला नाही व शिष्य परिवारही जोडला नाही व याबाबत कोणाशी तडजोडही केली नाही.

डेबूजीचे मन प्रपंचातून बाहेर पडू लागले असले तरी शरीर कष्टाला

नाही म्हणत नव्हते. कोणाच्याही उपयोगी पडताना त्यांनी आप-पर भाव कधी बाळगला नाही. श्रमासाठी त्यांनी मागेपुढे पाहिले नाही.

१९०५ सालच्या मार्गशीर्ष महिन्यातील गोष्ट. ज्वारी भरात आलेली. ज्वारीवर येणाऱ्या पाखरांना हाकारण्यासाठी ते सकाळीच पूर्णा नदी ओलांडून खैरीच्या शेतावर गेले.

सूर्य वर सरकू लागला असताना ऐन दुपारी खैरी गावाच्या बाजूने एक ऊंच, गोरापान, तेजस्वी पुरुष येताना दिसला. जटा व दाढी वाढलेली असून त्याच्या दोन्ही हातात ओली कणसे होती. उन्हातही तो अनवाणी होता. त्याला पाहताच डेबूजीच्या मनात विचित्र कालवाकालव झाली.

दुरूनच तो त्यांना महात्मा वाटला. ते माचावरुन खाली उतरले. सामोरे जाऊन त्याला साष्टांग दंडवत घातला.

क्षणभर काय बोलावे ते सुचेना. दोघेही एकमेकांकडे पाहतच राहिले.

"आपको कुछ चाहिए" डेबुजी

"क्या दोंगे? हमारे पास सबकुछ है।" स्मित करीत तो पुरुष बोलला.

माझ्याजवळ सर्वकाही आहे म्हणणारा हा पहिलाच अनासक्त, महात्मा त्यांनी पाहिला होता.

'चलोंगे हमारे साथ' काही वेळाने महात्मा म्हणाला.

'जैसी आपकी आज्ञा'

डेबूजी त्या महात्म्याचे मागोमाग चालू लागले. दौलतगीरचा अनुभव योग्य नसताना एका अनोळखी फकीराचे मागोमाग डेबूजी गेले.

ही एक अंतर्मनाची ओढ होती. चालत चालत दोघेही पूर्णा नदीच्या वाळवंटात आले. नदीच्या स्वच्छ पाण्यात पाय सोडून महात्मा बसला असताना डेबूजीनी विचारले,

"महात्माजी, आप का भोजन ?"

"कर तो रहा हूं।"ओले कणीस खात तो म्हणाला.

"जी नही! मेरा मतलब भोजन नही बनाओगे?"

" हां हां!' क्यो नही बनाएगे? क्या क्या लाओगे?

काही वेळातच डेबूजी खैरीवरून त्यांनी सांगितलेले सर्व सामान घेऊन आले.

डेबूजीनी वाळलेल्या गोवऱ्या जमा केल्या.बारीक काडयांनी शेकोटी पेटवली. तोवर त्या महात्म्याने सर्व सामान एकत्र करुन लगदा बनविला. कढईत तेल, तूप टाकून तळून काढला.

कढई परत करायला डेबूजी खैरीला गेले, परततात तोवर म्हात्मा निघायला तयार होते.

नदी ओलांडून दोघेही दापुऱ्याच्या शिवारातील महादेवापाशी आले. एक संपूर्ण दिवस दोघेही तिथेच होते. दुसरे दिवशीच डेबूजी घरी परतले.

रात्री घरी न परतल्याने इकडे शोधाशोध सुरु झाली. हंबीररावने बळीरामला चार दोन भजनी मंडळीकडे पाठवून विचारपूस केली. कुठेही पत्ता लागला नाही.

दुसरे दिवशी डेबूजी घरी आल्यावर सगळयांनी विचारपूस केली पण त्यानी घडलेल्या प्रसंगाविषयी चकार शब्द काढला नाही.

दुसरे दिवशी डेबूजी दर्यापूरास गेले आणि इकडे तो महात्मा दापुऱ्याच्या रस्त्यारस्त्याने डेबूजीना आवाज देत शोधू लागला. फाटकी कफनी घातलेला साधू कोणत्या देविदासाला हांका मारतोय हे गावकऱ्यांना कळले नाही. त्यांना नवल वाटले. उलट पाटलाने एका महाराकरवी साधूला गावाबाहेरचा रस्ता दाखविला.

सायंकाळी डेबूजीना हे कळताच तहानभूक विसरुन ते त्या महात्म्याच्या शोधात भटकले. पाच-दहा गांवी विचारणा करुनही त्याचा पत्ता लागला नाही.

डेबूजीचा अनुग्रह असा अर्धवट राहिला. पण त्या दीड दिवसात काय झाले, काय घडले, याविषयी गाडगे महाराज कधीही कुठेही बोलले नाहीत.

त्या दिवसापासून डेबूजी भ्रमिष्टासारखे वागू लागले. संसारातील आसक्तीच कमी झाली. खाण्यापिण्यावरचे लक्ष उडाले. तो प्रसंग त्यांच्या नजरेपुढून दूर सरकतच नव्हता. पतीची अवस्था पाहून कुंताबाईने रडून रडून आकांत मांडला. सखुबाई मुलाला टाकून बोलू लागली. पण डेबूजीवरील त्या महात्म्याचा प्रभाव कमी होऊ शकला नाही.

एक दिवस रात्री देवळासमोर कीर्तन होते. डेबूजी कीर्तनात जाऊन बसले. कीर्तनकार बुवा मानवी देहाचे महत्व पटवून देऊ लागले. "देह देवाचे मंदिर असून देवाने दिलेल्या शरीराचा उपयोग पूण्यकर्मसाठी केला पाहिजे. मनुष्यजन्म वारंवार मिळत नसल्यामुळे समाजाची सेवा केली पाहिजे." कीर्तनकाराचे हे शब्द डेबूजींच्या अंतर्मनाला झोंबत होते. ते तन्मयतेने ऐकू लागले. "मृत्यू लहान थोर, गरीब श्रीमंत ओळखत नाही. रंग, रुप भेद जातपात ओळखत नाही. हा हिंदू, हा मुसलमान, स्त्री, पुरुष असे काही जाणत नाही. तो प्रत्येकाला उचलतो. आम्ही तुम्ही सर्व या मार्गानेच जात आहोत. म्हणून नरदेहाचे चीज करा!"

कीर्तन संपले. सर्व लोक पांगले. पण डेबूजी! कीर्तनकाराचा एकेक शब्द बाणासारखा हृदयात रुतला. गौतमबुद्धाची तळमळ डेबूजीत संचारली. निश्चय पक्का झाला.

डेबूजी घरी गेले. दोन्ही मुलींना कुशीत घेऊन पोटातील गर्भ वाढवित कुंताबाई गाढ झोपलेली होती.

पूर्वेकडे तांबडे फुटू लागले. डेबूजीने चौफेर नजर टाकली. कुंताबाई अजूनही गाढ झोपेतच होती. सर्व घर अनामिक सुखात होते.

फक्त एका आत्म्याची घालमेल सुरु होती.

डेबूजीनी अंगातील सदरा काढून फाटका कुडता चढविला. जुनेर

नेसून अंगणातील एक मातीचे गाडगे उचलले. घराकडे एक दृष्टिक्षेप टाकून नमस्कार केला. आणि घराबाहेर पडले. पुन्हा या मोहपाशात न अडकण्यासाठी!

डेबूजीने गृहत्याग केला आणि त्यांचा संत गाडगेमहाराज बनण्याचा प्रवास सुरू झाला.

सिद्धार्थाने मानवी समाधानासाठी गृहत्याग केला. इतिहासाच्या पुनरावृत्तीचा विलक्षण योगायोग घडत होता.

●●●

# दहा
# भ्रमंती

डेबुजीची म्हणजेच गाडगेबाबांची भटकंती सुरु झाली. दापुरे सोडल्यापासून ते चालतच राहिले. वाट फुटेल तिकडे ते जात असत. त्यांच्या चालण्याला दिशा नव्हती हे खरे पण निघणे दिशाहीन नव्हते.

कोणत्याही गावात जावे. देवळात, चावडीवर किंवा रानात मुक्काम करावा. तहान लागली तर कोणासही पाणी मागावे, भूक लागली तर कोणाच्या तरी दारासमोर उभे राहून टाळी द्यावी. 'भाकर वाढा वो माय'! मिळाली तर ठीक. थोडी प्रतीक्षा करावी. आणखी पुढे जावे. आवाज तोच 'भाकर वाढा वो माय'! त्यांचा अवतार पाहून भिकारी समजून कोणी दयेने पिठलं भाकरी देत. कोणी 'पुढे जा' म्हणत. बाबांना पाहून एखाद्या बाईने म्हणावे "अंगाने एवढा धडधाकट दिसतो, फुकटचे खाण्याऐवजी काम धंदा कां करत नाही." बाबांनी तिला काम विचारावे. तिच्या घरापुढील तण गवत काढून द्यावे, कधी लाकडे फोडून द्यावीत. मोबदला घेऊ नये. ती बाई भाजी भाकर आणायला आत गेली की यांनी हळूच निघून जावे. पुढचा रस्ता धरावा. बाईने नवल करावे. थोडा पश्चातापही करावा.

संतत्व प्राप्त होण्याच्या वाटेवरचा हा एक टप्पा नव्हे काय? विनाश्रम भाकरी खायची नाही हे बाबांनी ठरवून टाकले. शरीर कष्टाला सरावलेले असल्याने त्यांनी आपल्या व्रताला सुरुवात केली.

बाबांजवळ एकच फाटका कुडता होता. तोही घामाने थिजून गेलेला. कोणाकडून सुईदोरा मागावा. शिवून काढावा. काही दिवसांनी तो शिवण्यालायकही राहिला नाही. एक उपाय म्हणून त्यांनी रस्त्यावरच्या चिंध्या गोळा करून त्याचे ठिगळ लावले. पुढे तर जमा केलेल्या चिंध्याचेच कापड वापरणे सुरु केले.

डोईवरच्या जटा व दाढी वाढू लागली. धोतरही फाटू लागले. त्याचे

तुकडे करून लुंगी केली. त्यालाही चिंध्याचे ठिगळ लावले आणि अशाप्रकारे अंगावरचा अवघा संसारच चिंध्यांनी व्यापून टाकला.

बाबांना स्वच्छता फार आवडत असे. एखाद्या गावात मुक्काम असला की उठताबरोबरच देवळाचा परिसर ते खराटयाने साफ करीत. गल्ली बोळ झाडून काढीत. रस्त्यावर पडलेला कचरा बाजूला सारीत.

स्वतःच्या स्वच्छतेकडेही बाबा बारकाईने लक्ष देत. दुपारच्या वेळी आंघोळ, कापड धुणे ते उरकत असत.

गाडगे फुटले, दुसरे मागावे. 'बाबा एक गाडगे द्या' कुंभाराला म्हणावे.

'फुकट कसे देऊ'

'तुह्यवाले काम करतो. सांग ना'

बाबानी माती आणून गारा तयार करावा. चिखल तुडवावा. मातीची मशागत करावी. आणि कुंभार घरात गेला की आपण तिथून पोबारा करावा. कुंभाराने वाट पहावी. निराश व्हावे. विचार करावा "कोण देव माणूस असेल बरे!"

बाबानी त्या गावी थांबूच नये.पुढच्या गावासाठी रवाना व्हावे. पायात भिंगरी असल्यासारखे फिरावे. जोरात भूक लागली तर निंब, चिंचेचा पाला खावा. भरपूर पाणी प्यावे. दिवसभर श्रम करूनही पोटाचे लाड त्यांनी कधी केलेच नाही. खाण्याकरिता जगणाऱ्या या जगात जगण्याकरिता खावे लागते याकडेही त्यांचे दुर्लक्ष होते.

फिरत फिरत बाबानी कोणाच्या शेतावर जावे. त्यांचे 'ध्यान' पाहून शेतकरी त्यांना चोर समजायचा. अदबीने बाबांनी म्हणावे -

"एक पेंढी देतां?"

"तुझ्या बापाचं शेत आहे काय?"

"मग पांच पेंढया द्या"

"कधी पाहिल्या होत्या कां?" शेतकरी डाफरून म्हणे.

"फुकटच्या नको. काम करवून घे."

बाबांनी त्याच्या शेतात राब-राब राबावे. कधी बोरी बाभळीच्या काटया तोडून द्याव्या. त्याचे कुंपण घालून द्यावे. शेतकऱ्याचे दुर्लक्ष झाले की, काहीतरी निमित्त साधून तिथून निघून जावे. कामाचा मोबदला न घेताच गेलेला पाहून त्या शेतकऱ्याने नवल करावे.

अशी बाबांची भटकंती सुरू झाली. दररोज नवे गांव, नवे लोकं, नवे अनुभव!

बाबांचा काम करण्याचा सपाटा सुरुच होता. वेडापिसा अवतार दिसत असला तरी कामातले कसब पाहून एखाद्या शेतकऱ्याने म्हणावे,

"माझ्याकडे गडी म्हणून कामाला राहतोस?"

"हो"

"पगार काय घेशीन?"

"महिना दहा लाख रुपये देजा!"

कामात बरा असला तरी डोक्याने खपती समजून त्याने टिंगल करावी.

"कमीत कमी भाकरी तरी घे"

"पगार देत नाही तर तुझी भाकरीही नको." म्हणत बाबानी निघून जावे.

रस्त्याने कोणी म्हातारी बाई ओझे वाहताना दिसायची. बाबांना तिची दया येई. त्यांनी म्हणावे -

"माय बाई वझं जड झालं काय?"

"जड होऊन कसं करतं रे बाबू"

बाबांनी तिच्या डोक्यावरचे ओझे घ्यावे. तिच्या घरी पोचते करून निघून जावे. तिने कोरभर भाकर देऊ केली तर म्हणावे, "मायबाई माह्यं पोट तुडुंब भरलेलं आहे."

एखाद्याच्या शेतावर जाऊन बाया बापडयाबरोबर निंदण, खुरपण करावे. कधी नांगर, वखर चालवावे. औत हाकावी, बैल धूवून द्यावे.

आणि काम करता करता सुरेल आवाजात देवाची भजनं म्हणावी. मोबदला काहीही घेऊ नये.

एखाद्या आंधळ्याला रस्ता दाखवावा. त्याची जखम धुवून द्यावी, तोंड पुसून द्यावे. रंजल्या गांजलेल्यांना मदत करणे हा बाबांचा नित्यक्रम होता. या काळात कर्मयोगी जीवन जगण्याची त्यांना सवय जडली.

गाडगेबाबांच्या वागण्याचा कोणाला कधी त्रास झाला नाही. त्यांनी कोणाला दुःखवले नाही. पण एखाद्या गावात फार कटू अनुभव येत.

बाबाचा मुक्काम चांदूर बाजारला होता. देवळाच्या परिसरातील कचरा साफ करून बाबा भजन करीत बसले होते. सायंकाळी बाजीराव काकडेच्या वाडयासमोर जाऊन उभे राहिले. त्याच्या घरी वैभव नांदत होते. बाबाकडे पाहून कोणीतरी भिकारी आल्याचे त्याला वाटले.

"बाबा! अन्न वाढा." हांक आली.

आतून एक बाई भाकरी घेऊन आली. तिला बाबा म्हणाले, "फक्त भाकरीच आनली, घरात पूरनपोळयाचा वास येऊन राहिला."

बाई आंत गेली. भिकाऱ्याचा मिजास पाटलाला सांगितला. लालबुंद होऊन पाटील बाहेर आला. हातात आसूड होता. पाटलानी बाबास विचारले.

"काय पाहिजे तुले?"

"पूरनपोळया."

एक जोरदार फटका पाठीवर बसला. पुन्हा विचारले. "काय? पूरनपोळी पाहिजे."

"होय"

प्रत्येक वेळी तोच प्रश्न, तेच उत्तर आणि आसुडाचा फटका! पाटलाच्या वाडयात गर्दी जमली. लोक म्हणू लागले, "किती मुजोर भिकारी आहे?" पूरनपोळया मागतो!

पाटलाचा संताप अनावर झाला. अंगणातील बाभळीच्या काठीने त्याने बाबांना झोडपून काढले.

तरी बाबाचे पूरनपोळी मागणे सुरूच होते. शेवटी लोकांनी त्यांना ओढत नेऊन वाडयाबाहेर हांकलून लावले.

बाभळीचे काटे अंगात रुतल्याने सर्वांग रक्तबंबाळ झाले. हळूवार उठून बाबा रस्त्याने चालू लागले. हे सर्व दृष्य पाहून गर्दीतला एखादा हळहळत होता. पाटलाला दयामाया नाही म्हणत होता.

पण बाबांच्या मुद्रेवर दुःख किंवा पश्चाताप अजिबात नव्हते. त्यांनी ब्र सुद्धा काढला नाही. अंधारात एका पडक्या ओसरीवर जाऊन बसले. परमेश्वराचे नाव घेत अंगातून एकेक काटा काढू लागले.

तेवढयात त्या वाटेने पांडूरंग जुमळे नावाचे सदगृहस्थ जात होते. त्याने ते पाहिले. हरिस्मरण ऐकून, थांबून विचारले.

"कोण आहे?"

"मी"

"अरे पण काही नाव गाव?"

"मालूम नाही"

"अंधारात काय करुन राहिला"

"भजन करतो."

"मंग, कण्हतं कशाला."

"कुठे काय? पूरनपोळया खावून राह्यलो."

तो जवळ आला. सर्व अंग रक्ताने माखलेले पाहिले. दुपारी शेतावर मजुरांबरोबर भजन करतांना त्याने बाबाना पाहिले होते.

"मले मालूम नाही." बाबा म्हणाले व रस्त्याने अंधारातच पसार झाले.

हा प्रसंग विसरणे शक्य नव्हते. जाणून बुजून स्वीकारलेले हे कठोर व्रत होते. पण आयुष्यात गाडगेबाबानी या घटनेची कुठेही वाच्यता केली नाही. पुढे चांदूर बाजारच्याच एका भेटीत जुमळेंनी बाबांना या प्रसंगाची आठवण करून दिली.

एखाद्या विहीरीवर जाऊन बाबानी उभे रहावे. आत डोकावून मालकाला विचारावे. "आमची महारांची विहीर हीच ना?"

महार विहीरीला शिवला म्हणून त्याने शिवी द्यावी. बाबानी त्याचाही मार खावा आणि पुढे जावे.

असे कणखर, संघर्षमय जीवन ते जगत राहीले. म्हणूनच समाजजीवनाचे निरनिराळे पैलू भ्रमंतीमध्ये बाबाच्या दृष्टीस पडले.

विदर्भात बऱ्याच लोककला प्रचलित आहेत. कीर्तन, दंडार, गोंधळ इ. सातत्याने चालत असतात. बाबानी कीर्तने ऐकली होती. तुकारामाची भजनं त्यांना मुखेद्‌गत होती. जीवनाचे अवलोकन सुरूच होते. सामाजिक प्रश्नांची त्यांना पुरेपूर जाण होती.

समाजशुद्धीसाठी त्यांनी कीर्तनाचे माध्यम वापरणे सुरू केले.

एखाद्या खेडेगांवी देवळात मुक्काम असला की सभोवतालची घाण साफ करावी, कुणाच्या दारात उभे राहून खराटा मागावा. कोणी दिला नाही, रानातून तुराटया गोळा करून चिंधीने घट्ट बांधून खराटा करावा. देवळाचा पूर्ण परिसर स्वच्छ करावा. गांवातले रस्तेही झाडून काढावे. गावकऱ्यांनी विचारले तर "कोण्यातरी बोवाचं कीर्तन आहे म्हणे" असे सांगावे.

एखाद्या बाईला दया येई. तिने आणलेली भाजी भाकर गाडग्यात घेऊन खावी. पाणी पिऊन ढेकर द्यावी. दिवसभर पडेल ते श्रम करावे. शरीराला आराम म्हणून कधी लाभलाच नाही.

कीर्तनाचे नाव ऐकून एखादा ग्यासबत्ती आणून देवळासमोर उजेड करी. गावातली भजनी मंडळी गोळा होऊन टाळ, मृदंग, पेटी घेऊन येत. चार दोन लोकही कीर्तन ऐकण्यासाठी जमा झालेले असत.

अंधारातून बाबांनी पुढे यावे. लोक विचारत "कीर्तनकार बुवा कुठे आहेत?"

"थे आले नाही. मलेच पाठवलं त्यायनं" सर्व मंडळी हसत, टिंगल करीत. थोडा वेळ भजन करुन घराचा रस्ता धरत. तोवर बाबांनी हातात

दोन दगड घेऊन भजन म्हणण्यास सुरुवात करावी.

"गोपाला ऽ गोपाला ऽऽ
देवकीनंदन गोपाला ऽऽऽ
सांभाळी ही तुझी लेकरे
पुण्य समजती पापाला"

परतणाऱ्यांच्या कानी हा भरदार आवाज पडला की ते सावध होत. एकेक परतू लागत. कीर्तनात बराच समुदाय जमा होऊन जाई. मग बाबाच्या बोलण्याला धारदारपणा प्राप्त होत असे.

ते कीर्तनातून सांगत -

कर्ज काढून देवाची यात्रा करू नका.
गाईबैलांची चिंता वाहत जा.
मुलांना शिकविल्याविना राहू नका.
देवाला नवस करून कोंबडी बकरी मारू नका.
आईबापाची सेवा करा.
कर्ज काढून सण साजरे करू नका
भुकेलेल्यांना अन्न द्या
हुंडा देऊन, घेऊन लग्न करू नका
दारू पिऊ नका
देवाचे भजन केल्याशिवाय राहू नका.
शिवाशिव पाळू नका.

हे सर्व सहजगत्या लोकांना कळणारे होते. कीर्तनात आर्तता व अंतःकरणात तळमळ आहे हे जाणवू लागताच बाबांची वाणी लोकांवर हुकुमत गाजवू लागली. कीर्तनात गर्दी वाढली.

हा कोणी भिकारी किंवा फकीर नसून खरंच साधू आहे हे जनतेला

कळू लागले होते. भजन, कीर्तन संपल्यावर एखादा बाबाच्या पूर्वायुष्याविषयी चौकशी करी. कोणास कांही न सांगता ते रानाकडे निघून जात. एखाद्या झाडाखाली रात्र काढून उजाडण्याच्या आत नव्या गावाची वाट धरत. कुठेही न गुंतता, पाश निर्माण न करता दररोज नव्या गावाकडे त्यांची वाटचाल सुरू होती.

आता बाबांनी कर्म, झाडू आणि कीर्तन या माध्यमाचा वापर करणे सुरू केले होते. सकाळी गांवातले रस्ते साफ करणे, दुपारभर कोणाच्यातरी शेतात खपून रात्री कीर्तन यात त्यांनी स्वतःला गुंतवून घेतले. याशिवाय कुठल्याही गोष्टीची आसक्ती बाळगली नाही.

एक गाव सोडून दुसऱ्या नव्या गावी गेल्यावर सुरवातीला त्यांना भयंकर यातना होत. अनेक जाचाला तोंड द्यावे लागे. पागल, भिकारी समजून लहान मुलं व लोक पाठीमागे लागत, टिंगल करीत. पण बाबांनी हे सर्व सहन करीत आपले जीवन ध्येय सुरू ठेवले.

फिरता फिरता दुपार झाली की कुणाच्या दारात उभे राहून बाबा भाकरी मागत.

"धडधाकट दिसतोस, भिक मागण्याऐवजी काम का करीत नाहीस" घरधनी म्हणे.

"सांग ना बाप्पा! काय करु" बाबा म्हणत.

"घरासभोवतीचा कचरा स्वच्छ करून दे."

बाबा काम करू लागत. घराच्या मागील पुढील कचरा काढून जागा स्वच्छ करीत. काम झाल्यावर घरची बाई भाकरी बरोबर काही पैसे देऊ करी. बाबा भाकरी घेत. पैसे नाकारीत. घरधन्याला नवल वाटे. श्रमाचा मोबदला नाकारणारा व इतके चकचकीत काम करणारा भिकारी त्यांनी पाहिलेला नसे.

आगगाडीने प्रवास करताना तिकीट तपासणी करणाऱ्याने चापट मारली. खाली उतरवून दिले पण बाबांनी कधी विरोध केला नाही, 'ब्र'

काढला नाही.

असे नानापरीचे त्रास सहन करीत, जीवाचा आटापिटा करीत ते गावोगाव फिरत राहिले. लोकांचे बरे वाईट अनुभव त्यांनी चिंध्याच्या रुपानी अंगावर चढवले. शरीराचे लाडकोड त्यांनी कधी केले नाही. मिळेल ते खाऊन जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

अशाप्रकारे बाबांना भ्रमंतीत नाना प्रकारचे लोक मिळाले आणि विविध बऱ्यावाईट अनुभवांनी त्यांचे विचारधन प्रगल्भ होत गेले.

●●●

# अकरा
# कीर्तनाचा प्रारंभ

गाडगेबाबा आता कीर्तनात रमू लागले. त्यांच्या कीर्तनाचा लोकांवर प्रभाव पडू लागला होता. वऱ्हाडी भाषेत, विनोदवृत्तीने नवीन जातीचे कीर्तन करणारा निरक्षर पण अफाट निरिक्षण असणारा बाबा म्हणून ते परिचित होत गेले.

गाडगेबाबांचा वेश मोठा गमतीदार होता. अंगावर चिंध्या जोडून शिवलेला सदरा, भगव्या रंगाची लुंगी, डोईला फडके, हातात एकतारी व गाडगे असे सहज ओळखू येणारे दिसताक्षणी अलग वाटणारे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

भ्रमंतीत बाबाचे फिरणे अनिश्चित होते. कार्यक्रम आखलेला, ठरलेला नव्हता. अमुकच ठिकाणी जाऊन विशिष्ट काम करावयाचे आहे याचा आराखडा नव्हता. वाटेल तिथे जावे, मनसोक्त फिरावे, वाटलेले काम करावे असे उन्मनी ते वागत असत.

त्यांचा बराचसा प्रवास पायी असे. क्वचितप्रसंगी ते आगगाडीने जात. आगगाडीत बाबांना बसण्याचा प्रसंग आलाच तर ते शौचकुपाजवळ उघडयावर दोन्ही हात टेकून उकीडवे नम्रपणे बसून राहात. बाकावर ते कधी टेकले नाहीत. भिकारी समजून एखादा उतारू हिडिस फिडीस करी, मुकाट्याने ते सहन करीत.

बाबांनी रेल्वेने प्रवास करताना कधीही तिकीट घेतले नाही. एखाद्या तपासनीसानी उतरवून दिले तर त्याच गावी मुक्काम करीत. पण त्यांनी आपल्या वागणुकीने कोणास कधी त्रास दिला नाही.

एखाद्या गावी बाबांना वाईट अनुभव येई.हातात एकतारी घेऊन रात्री अचानक ते कीर्तनासाठी उभे ठाकले की लोक विचारीत.

'अहो चिंध्यावाले! कीर्तनकार महाराज कुठे आहेत.'

"त्याहीनच मले धाडलं, ते येत नाहीत" बाबानी म्हणावे.

यावर लोकांच्या विविध प्रतिक्रिया उमटत. कोणाला बाबा पागल वाटत. अधिक विचार न करता काही मंडळी घराकडे चालू लागत.

लोकांच्या कुठल्याही बोलण्याकडे लक्ष न देता एकतारी सुरात लावून बाबा एकाग्रचित्ताने भजन सुरू करीत.

"अनंता नाम तुझे। केशवा।।

माधवा नाम तुझे।।"

हा स्वर कानी पडू लागताच लोक मागे वळत. कीर्तनात येऊन बसत. हळू हळू जमाव जमे. बाबांचे बोलणे सुरूच असे.

"जिभले तुले काय धंदा

घडिभर भजगे गोविंदा"

देवळापुढे गर्दी जमली की बाबांनी सुरू करावे-

"मंडळी मी अडाणी मानूस. मले भजन काय कळते! लोकांचे कपडे गोळा करून धुवावं, भाकरी मागून खावावी, पोट भरावं, चिंध्या ओढाव्या असा मी."

"पण तुमी संत, सत्पुरुष! तुमच्या संगतीने मले भजन करण्याची बुद्धी सुचली.'

जमलेल्या मंडळीची बाबांनी स्तुती करावी मग ते निष्ठेने ऐकू लागत. एकदा कीर्तनात रंग चढला आणि त्याचा लोकांवर प्रभाव चढू लागला की हळूच त्यांना बोचणार नाही अशाप्रकारे त्यांच्या वैगुण्यावर बोट ठेवून प्रहार करीत. बाबा सांगू लागत.

"पृथ्वी निर्माण करणारा, आपल्यासाठी अन्नधान्य व सर्व सुखसोयी निर्माण करणारा हा परमेश्वर एक आहे की दोन?"

'एकच!' काही मंडळी हळू आवाजात उत्तर देत

'नीट विचार करून सांगा! 'देव किती?'

'एकच'!

'हां आता हिशेब करा. 'तुमच्या गावांत खंडोबाचे देऊळ आहे की नाही.'

'आहे!'

'तुमच्या शेताच्या बांधावर म्हसोबा असतंत कां नाही.'

'होय!'

'तुमच्या गांवच्या शिवेवर मातामाय येऊन बसली की नाही'

'होय'

अशारीतीने विरोबा, वेताळ, भैराळ, बहिरम, जाखाई, जोखाई, येसकाई अशा अनेक देवाची लांबलचक यादी बाबा ऐकवित आणि सगळा समूह त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊ लागला की अचानक बाबा त्यांच्यावर आवाज वाढवून म्हणत.

'देव बारा पंधरा झाले की नाही!'

'झाले!'

बाबांचा आवेग पाहून देव 'एक'च आहे म्हणणारा समूह चमके, खडबडून जागा होत असे. चुकल्याचा भाव मनात जागृत होई. त्यात दिवसा बाबाकडून काम करवून घेणारी बाई असे, घरधनी असे, भाकरी वाढणारी असे. 'बाहेर जा.' 'पुढे हो' म्हणणारे असत. थट्टा टिंगल करणारे असत. सगळे सजग होऊन ऐकू लागत.

बाबांना पागल म्हणणाऱ्यांना पश्चाताप होई. सगळा जमाव त्यांच्या कह्यात आला की त्यांचे सरळसोट आघात शब्दांच्या फटकाऱ्यांनी सुरु होत.

'या देवांना नवस, करता कां नाही.' 'देवा माझं पोरंग पडलं याले बरं कर. तुले कोंबडा बकरा देईन. म्हणता की नाही!"

'होय!' मग बाबा समजावून सांगत.

मुलगा बरा होतो. परमेश्वराच्या कृपेने, नवस बोलल्याने हे भाग्य लाभले असे समजून नवस फेडण्यासाठी देवाच्या यात्रेला जावे लागते. बकरा ओढत देवासमोर आणून मानेवर सुरी दिली की रक्ताचे काही थेंब परमेश्वरावर शिंपडले जातात. बाकी सर्व नातलग फस्त करतात.

बाबा म्हणत - 'घरी निघताना देवाले म्हनता कां देवा आमचं कल्याण कर', मग - चढलेल्या आवाजात बाबा लगोलग म्हणत, 'देव तुमचा सत्यानाश करील' समाजातले दुःख पाहून ते जसे तळमळत तसेच या वाईट प्रथांनी त्यांना वेदना होत.

अशाप्रकारे बाबांची कीर्तने रंगू लागली. लोकांवर त्याचा प्रभाव जाणवू लागला.

रोज नविन प्रकारचे कीर्तन होऊ लागले. दररोज नविन गाव. एकाच गावी बाबा फारसे थांबत नसत. पुढचा मुक्काम ठरलेला नसे. रस्त्यात एखादे गाव बरे वाटले की ते थांबत. मुक्काम करीत. रात्री कीर्तनासाठी उभे राहात.

रोज नवीन प्रकारचे कीर्तन चाले. समाजातील वाईट चालीरितीचा सूक्ष्म अभ्यास करून त्याचे चिंतन व आत्मनिरीक्षण ते कीर्तनातून चपखल दाखले देऊन सांगू लागत. सावकाराचे अत्याचारी पाश, कर्जाचा कोंडमारा, कामाचा न मिळणारा मोबदला, देवदेवतांना नवस करुन आजारपणावर उतारा शोधून आणि शेवटी निराश होणाऱ्या गरीब भोळया भाबड्या जनतेचे हाल, अस्पृश्यतेचा कलंक, जातीयता, वर्गकलह, वर्णव्यवस्था हे सारे त्यांनी पाहिले. अठराविश्व दारिद्र्य त्यांनी स्वतः उपभोगले होते. त्याचे चटके सहन करीतच ते जगले. कोणे एकेकाळी संपन्न परीट परिवारात जन्मलेला पण नियतीने सर्व हिरावून व्यसनाधीन बापाचे हाल पाहिलेले गाडगेबाबा दारूच्या व्यसनाबद्दल जनतेला मार्गदर्शन करीत. दारु पिऊन बायकोला मारणे, पोराबाळांची आबाळ, हे बाबा लोकांना समजावून सांगत,

'दोन आन्याची पिता! अन दोन रुपयांची प्याल्याचं सोंग करता!'

एकंदरीत दारुचे व्यसन व नवस करणाराला वाटे आता हे सर्व सोडून द्यावे व परमेश्वराच्या नामस्मरणांत, भजनात स्वतःला गुंतवून घेऊन सन्मार्ग धरावा. आचरण शुद्ध ठेवावे. एखाद्याला वाटे जन्म फुकट घालवला!

अशाप्रकारे गाडगेबाबांच्या कीर्तनाची कीर्ती संपूर्ण विदर्भभर पसरु लागली. कीर्तनासाठी त्यांना निमंत्रणे येऊ लागली.

बाबांनी सतत बारा वर्षे भ्रमण केले. एक तपाच्या साधनेत त्यांनी लोकांचे व लोकजीवनांचे सूक्ष्म निरीक्षण करुन अनुभव प्राप्त केला व त्याचा उपयोग कीर्तनातून मार्गदर्शन करण्यात केला. असे अनुभवाच्या मुशीतून सिद्ध झालेले गाडगेबाबांचे जीवन होते.

गृहत्याग केल्यापासून ते सातत्याने हालअपेष्टा सहन करीत वणवण हिंडले. प्रामुख्याने विदर्भ व मध्यप्रांताचा काही भाग त्यांनी पायी तुडवला. देशाटनातून ज्ञान मिळविले.

गाडगेबाबाचे कीर्तन आहे म्हटले की रात्री हजारोचा जमाव जमू लागे. लोकजीवनातले सामान्य दाखले, समाजातील वाईट रुढीवर प्रहार, कर्मकांडाचा निषेध, हुंडा विरोध असे साधेसुधे कीर्तनाचे विषय होत. कोणाचीही भीडमूर्वत न ठेवता त्यांना जे वाटे ते बोलत असत.

"आईबाबांची सेवा करा" असा कीर्तनातून उपदेश करणाऱ्या गाडेबाबांना एकदा एका गावकऱ्याने विचारले, "बाबा, या बाबतीत तुमचा अनुभव काय?"

क्षणभर बाबा चरकले. सावध होऊन म्हणाले, "बापा! 'तुमी कोन व्हयतं माझे' तुम्ही माझे मायबापच नाही काय? बाबांनी त्यास निरुत्तर केले. जन्म देणाऱ्या आईची माया त्यांनी अनुभवली होती. पुत्रप्रेमाने ते क्षणभर कां होईना सुखावले होते. बापाची उणीव मामानी भरून काढली होती पण तेही नियतीला पाहावले नाही. बायको, मुले असताना संसाराचा त्याग केला. तेव्हापासून जगालाच मायबाप समजणारा व लोकांतच देव पाहणारा हा साधू होता.

देशात उच्चनीचता, स्पृश्यास्पृश्य, भेदाभेद, शिवाशिव फार मोठया

प्रमाणात असल्याचे त्यांना आढळून आल्याने जातीपातीचा विचार न करता ते सर्व लोकांत मिसळून राहू लागले. धोब्या घरचा जन्म असल्याने त्यांना ह्या प्रश्नाची जाणीव होती.

गरीब कष्ट करतो, दिवसभर राबतो तरी खायला मिळत नाही. बाप उसने आणतो, कर्ज काढतो, दारू पितो. आईला मारझोड करतो. लहानशा झोपडीत किंवा उघडयावरही ही पोरं वाढत राहतात. शिक्षणाचा गंध नाही. भल्याबुऱ्याची चाड नाही. स्वच्छतेचा संस्कार नाही. देवाला नवस करणे, नैवेद्य दाखविणे, गंडादोरे बांधणे असे कर्मकांडही पाहिले.

हे सर्व पाहून समाजाला संस्काराची गरज असल्याचे त्यांना लक्षात आल्याने परमेश्वराची भक्ती करायला ते लोकांना सांगत. हेच त्यांच्या कीर्तनाचे विषय होते.

एक तपाची भ्रमंती म्हणजे जणू वनवासच होता. मनातील दृष्ट प्रवृत्तीच्या रावणाचा नाश झाला. साधुत्व आले. गाडगेबाबाची खरी ओळख पटून त्यांना समाज प्रतिष्ठा मिळू लागली.

●●●

# बारा

# ऋणमोचनचा उद्धार

ऋणमोचनला पौष महिन्यात दर रविवारला यात्रा भरत असे. पहिल्याच रविवारला बाबा तेथे पोचले.

गृहत्याग केल्यापासून पहिल्यांदाच ते ऋणमोचनला आले होते. तत्पूर्वी घरच्यांनी त्यांना शोधण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला होता. कुंताबाई व सखुबाईच्या आसवांना पार नव्हता. सर्वांनी कसोशीने प्रयत्न करूनही डेबूजींचा ठावठिकाणा लागू शकला नाही.

डेबूजी कोठे गेले असावेत! नातेवाईकांकडे निरोप गेले. चौकशी झाली. थांगपत्ता लागला नाही. शोधाशोध करून सर्व थकले. नदीनाले, आडविहीर तपासले गेले. शेवटी परमेश्वरावर भरवसा ठेवून सगळ्यांनी दिवस काढणे सुरू केले.

बाबांनी घर सोडले तेव्हा कुंताबाई तीन महिन्याची गर्भार होती. तिने एका सुंदर मुलाला जन्म दिला होता. नाव ठेवले गोविंदा! मुदगलसारखे गोविंदाला चिऊकाऊ शिकवायला 'बाप' घरी होताच कुठे?

हंबीररावांनी अन्नपाणीच सोडले. चिंतातूर अवस्थेतच एक दिवस त्यांनी जगाचा निरोप घेतला. नातवाला 'गाडगे महाराज' म्हणून पाहण्याचे भाग्यही त्यांच्या नशिबी आले नाही.

बळीराम एकदा मुर्तिजापूरला धमणी घेऊन गेला असताना एका परीटाशी त्याची भेट झाली. तो म्हणाला "डेबूजी माहूरच्या यात्रेत दिसला' त्याची दाढी वाढलेली होती. हातात खराटा घेऊन पटांगण झाडताना त्याच्या नजरेस पडला होता.

"त्या गड्यानं पुसलं, कां 'तुमी डेबूजी वट्टी व्हा काय" तर म्हणे 'मले मालूम नाई' पन त्यानं पक्क वळखलं" डेबूजीची आस सोडणारांना हे ऐकूनच बरे वाटले डेबूजी जिवंत असल्याचे समाधान झाले.

घरादाराची, बायको मुलांची आठवण होऊन कधीतरी परत येईल असे प्रत्येकाला वाटू लागले. पण डेबूजी घरी परतले नाही की घराची आठवण सुद्धा काढली नाही. घरची मंडळी मात्र डेबूजीचा अधून मधून मागोवा घेत होती. लोकांच्या सांगण्यावरून डेबूजी प्रत्येक यात्रेत असतात अशी त्यांना कुणकुण लागली होती.

पौष महिन्यातल्या पहिल्या रविवारी सखूबाई पूर्ण परिवारासह ऋणमोचनला पोचली.

बाबांनी आमल्याच्या पाटलाकडून कुदळ फावडे मागून यात्रेकरूंसाठी नदीच्या पात्रात दरड खणून पायऱ्या करण्याचे काम सुरू केले होते. ते त्यात मग्न असतांना सखुबाईने जवळ जाऊन भीत भीतच हाक दिली.

अजिबात लक्ष न देता बाबा खणण्याचे काम करतच राहिले. त्यांच्याभोवती सर्व नातलग व कुटुंब गोळा झाले, बाबांची विनवणी करू लागले. कुंताबाई गोविंदाला पोटाशी धरून रडू लागली. बाबांनी वर मान करूनसुद्धा पाहिले नाही.

"अरे तू निंगाला बाबू? मंग आमाले कोन रे!"

"तुमाले देव आहे"

"देव? तू नाहीस काय?" सखुबाई म्हणाली.

"मी आज आहो, उद्या नसन, इतले मानसं गेले. नवरा गेला, भाऊ गेला, बाप गेला, नातू गेला, माझीही तीच वाट?"

"असं काहून बोलतं रे बाबू"

"खरं तेच बोलतो, अवघ्याहीले त्याच वाटेने जायचे आहे."

सखुबाईच्या विनवणीचा, नातलगाच्या आग्रहाचा बाबांवर यत्किंचितही परिणाम झाला नव्हता. कुंताबाई रडत म्हणाली, "मंग आमी कोनाकडे जावावं ? कोनाच्या तोंडाकड पहाव?"

बाबा म्हणाले, "मी लोकांची कामं करतो. भिक मागून खातो. श्रम करतो. चार घरचे खाण्याची चव वेगळीच असते. तुमची इच्छा असेल तर तुम्ही येऊ शकता. नाहीतर तुम्हाला तुमचे घर आहे."

पूर्ण पौष महिनाभर बाबा ऋणमोचनला थांबले. दर रविवारी यात्रेच्या दिवशी ते येणाऱ्या भाविकांची सेवा करीत. सवड मिळताच आठवड्यातून एक दोन दिवस ते आजुबाजूला गांवात जाऊन येत. पण ते दापुऱ्यास गेले नाही. बायको मुलांची विचारपूस केली नाही. कोणत्याही नातलगाकडे गेले नाही. संपूर्ण निःसंग वृत्तीने ते वावरले.

प्रत्येक रविवारला सखुबाई व घरची मंडळी येऊन बाबांना गावाला चालण्याचा आग्रह करत. सोयऱ्या धायऱ्यानींही प्रयत्न केले पण बाबांवर कोणाचाही इलाज चालला नाही.

"हे सुख सोडून त्या पडक्या घरात यायले सांगता मले? वा ऽ जी तुमीही भले हुशार दिसता"! असे बाबा म्हणत.

ऋणमोचनला असा बाबाचा एक महिना गेला. नंतर दरवर्षी बाबा यात्रेनिमित्त ऋणमोचनला येऊ लागले. यात्रेला जायचे. हातात खराटा घेऊन सर्व पटांगण साफ करायचे, शेणकचरा साफ करून दूर फेकून द्यायचा. असे त्यांचे काम सुरू होते. रात्री कीर्तनासाठी उभे राहून लोकांना नानाप्रकारे उपदेश करीत.

दिवसा गांवातील घाण साफ करून कीर्तनात ते लोकांचे अंतरंगातील मळ साफ करण्याचा प्रयत्न करीत.

बाबांचे कीर्तन लोकांना आवडू लागले, पटू लागले होते त्यामुळे जनता त्यांच्याकडे आदराने पाहू लागल्याने त्यांना पूर्वी वेडा समजणारे पश्चाताप करू लागले. आपल्या जातीत गाडगे महाराजांसारखा सत्पुरुष जन्मला आहे याचा सार्थ अभिमान धोब्यांना वाटू लागला.बरीच मंडळी वड्याची कामे सोडून त्यांच्या सहवासाची अपेक्षा करु लागले. जे नातलग बाबांना घरी वापस चालण्याची विनवणी करत तेच आता सखुबाई, कुंताबाई, बळीराम इत्यादींना समजावू लागले. घरी असलेल्या हिऱ्याची आपण पारख करू शकलो नाही असे गावकऱ्यांना व नातलगांना वाटत राहिले.

सखुबाईची कुस धन्य झाली. पण कुतांबाई म्हणायची,

"कुंताबाई म्हणे लोकांपाशी

बाई माझे पती वेडे झाले''

शेवटी कुंताबाई ऐन तारुण्यात तीन मुलांना घेऊन काय करणार? कुठे जाणार? कसे पोट भरणार याची तिला विवंचना होती. तिला स्वतःचे घर नव्हते. कोतेगावचे शेत व घर रामपुऱ्याच्या सावकाराच्या घशात कधीच गेले होते. सासरा झिंगराजी जाणोरकर यांच्या व्यसनापायी घराची वाताहात झाली होती. नवरा असा फिरस्ती, कीर्तनकार झालेला. आलोका, कलावती यांची लग्ने होऊन ती सासरी जातीलही पण गोविंदाचे काय? ही काळजी तिला खात होती.

सखुबाईने जीवनात बरेच ऊन-पावसाळे, टोणपे सहन केले असल्याने ती सुनेला व नातवांना धीर देत राहिली.

●●●

# तेरा
# सहभोजन

पूर्णानदीला पूर आला की खणलेल्या दरडी व पायऱ्या वाहून जात, त्यामुळे दरवर्षी त्या नव्याने खणाव्या लागत. या कार्यात बाबांना आता लोक मदत करू लागले. वड्डी समाज तर तयार होताच.

एकदा बाबांच्या सांगण्यावरून सर्व वड्डी एकत्र आले. वर्गणी गोळा केली आणि ऋणमोचनला यात्रेच्या प्रत्येक रविवारला एकत्र जेवण करण्याचा बेत ठरविला. जेवणात साधेपणा असे. दारु-कोंबडी यांना फाटा देण्यात आले.

दर रविवारला स्वयंपाक होई. सामूहिक पंगती उठत, बाबा जेवायचे मैदान साफ करून पंगतीसाठी रेषा आखून देत. सगळ्यांची आस्थेने चौकशी करुन जेवायला घालत, भांडे घासून पुसून साफ करून ठेवत.

मात्र या अन्नाला बाबांनी कधी हात लावला नाही. यात्रेकरूंजवळून भाकरी मागूनच ते खापरात खात. त्यांची वागण्याची पद्धत लोकांच्या अंगवळणी पडल्याने त्यांना कोणी आग्रह करीत नसत.

रात्री त्याच ठिकाणी कीर्तन होई. दरवेळी नवीन विषय कीर्तनात असे.

अशाप्रकारे ऋणमोचनला सार्वजनिक पंगतीचा पाया बाबांच्या आशीर्वादाने रचला गेला. या कामी मागास समजलेल्या वड्डी जातीने पुढाकार घेतला. समाजात एकी नांदू लागली. बाबांचा निर्णय हा परवलीचा शब्द बनला.

तसे वड्डी जातीत भांडण तंटे फार असत. झगडे कोर्टात नेण्याऐवजी लोक अपली कैफियत बाबांना सांगू लागले.

बाबा सांगत, 'घरातले भांडण रस्त्यावर, चावडीवर नेणे बरे नव्हे, आपली लाज आपणच राखली पाहिजे. कोर्टात गेल्याने वेळ व पैसा वाया

जातो. तारखांसाठी कर्ज काढावे लागते. घरच्या सर्वांना त्रास होतो. म्हणून दोघांनीही आपसात समजरमज करणे बरे असल्याचे बाबा त्यांना पटवून देत असत.

विशेष म्हणजे बाबांनी केलेला निवाडा दोन्ही पक्षांना मान्य होई. ते गुण्यागोविंदाने राहू लागत. कधी मधी सवडीनुसार बाबा याविषयी चौकशी करून आनंद व्यक्त करीत. आपला समाज सुधारतो आहे हे पाहून त्यांना बरे वाटे. मुलीच्या बारशाला जेवणासाठी आग्रह धरून विरोध करणारा हाच समाज आज सात आठ वर्षाच्या कालावधीत बाबांच्या तालमीत कमालीचा बदलू लागला होता.

पराटांमधली एकी हा चर्चेचा विषय ठरली.

●●●

# चौदा
# पूर्णानदीवरील घाट

ऋणमोचनला यात्रेच्या वेळी बाबांचे दरडी खणण्याचे काम सुरू होते. एकदा ते मैदान साफ करीत असताना पाच सहा जण त्यांच्या जवळ येऊन उभे राहिले.

" अरे तिडके सावकार काय?" बाबांना नवल वाटले, ते म्हणाले, "बोला काय हुकूम आहे?"

"बाबा हे दरवर्षी नदीच्या दरडी खणणे. हे किती वर्ष करणार?" एक जण म्हणाला.

"हे पक्के बांधीत कां नाही?" तिडके सावकार बोलला.

"त्याले पैसा लागन तो?"

"मी देतो. तुम्ही घाट बांधून काढा" सावकार म्हणाला.

हे दरवर्षी दरडी खणणे लोकांच्याने पहावले नाही. बाबा एकटे खपत. कधी सोबतीला काही लोक असत. नदीला पूर येऊन कष्ट वाया जात. दरवर्षी ते करावे लागे. तिडके सावकाराच्या कानावर गेले. महाराजांशी सलगी करण्याच्या शोधात तो होताच.

पण यावेळी सावकाराचे मन साफ होते. बाबांच्या कार्याची त्याला ओळख पटली होती. बेईमानीने जमवलेले धन सत्कारणी लावण्याची संधी त्याला प्राप्त झाली.

बेत ठरला. सर्व नदीवर गेले. पक्का घाट बांधण्यासाठी जागेची निवड झाली. लगेच भूमीपूजन करण्यात आले. लवकरच कामाला सुरुवात झाली आणि घाटावर पायऱ्या उभ्या ठाकू लागल्या.

बाबा कामावर प्रत्यक्ष देखरेख करीत सावकाराने विनवणी करूनही त्यानी अग्रिम पैसे न घेता फक्त आठवड्यातून एकदा मजुरांची मजुरी चुकती करण्यासाठी ते त्याच्याकडे चिठ्ठी पाठवित. मजूर दारावर आले की नेमाने सावकार चुकारा करीत.

बनाजी प्रिथमजी तिडके व त्याचा भाऊ तुकाराम हे घाटासाठी खर्च करताहेत, व त्यासाठी गाडगेबाबा तयार झालेत याचे लोकांना आश्चर्य वाटले.

नवलच घडले होते. ज्या सावकाराने खोट्याचे नाटे करून घशात जमीन घातली होती. ज्यापायी कंटाळून बाबांना घर सोडावे लागले होते, तोच सावकार आज त्यांच्या पायावर लोटांगण घेऊन घाटासाठी पैसा ओतत होता, ताठ मानेचा कणा वाकला होता.

काळाचा महिमा असाच अगाध असतो.

मुदगलेश्वरला लागून पहिला घाट उभा राहिला. नदी किनाऱ्याजवळील दोन तीन गावाकडून घाटाची व्यवस्था करावी हे बाबांना कळून चुकले. त्यासाठी ते तयारीला लागले. घाटाच्या कामासाठी द्रव्याचा ओघ सुरु झाला, न मागता पैसा येऊ लागला. पूर्णेच्या दक्षिण तीरावर दुसरा घाट आकार घेऊ लागला.

आता बाबांच्या कार्यक्षेत्रात वाढ झाली होती. अमरावती व विदर्भाबाहेर ते पूर्ण महाराष्ट्र पालथा घालून जनजागृती करु लागले. त्यांच्या कार्याची महती लोकांना कळून चुकली. असंख्य सुशिक्षित लोक अनुयायासारखे त्यांच्या पाठीशी उभे राहू लागले. हळू हळू बाबांची कीर्ती संपूर्ण महाराष्ट्रभर पसरली.

आलोका लग्नाची झाली. तिच्यासाठी वर संशोधन सुरू झाले. एका उन्हाळयात मूर्तीजापूर तालुक्यातील गोरेगावच्या फकीरासोबत तिचे लग्न ठरले. लग्नानिमित्त बाबांची शोधाशोध सुरु झाली आणि शेवटी बाबांशिवाय आलोकाचे लग्न पार पडले. बळीरामला कन्यादान करावे लागले. आलोका सासरी गेली. काही दिवस बरे गेले आणि लग्नात केलेल्या खर्चावरून घरी धुसफूस वाढत गेली. घरातील भांडण बाहेर जायच्या आधीच सखुबाई सर्वांना घेऊन ऋणमोचनला गेली. बाबांनी सखुबाई व कुंताबाईला घाटावरील कामासाठी ठेवून घेतले. इतर मजुराप्रमाणे त्यांनाही बाबा कामाची मजुरी देत. त्यांनी त्यांच्यासाठी एका झाडाखाली

लहानशी झोपडी बांधून दिली. कुटुंबासोबत ते कधी थांबले नाहीत.

बाबांचे नातेवाईक, घरची मंडळी समजून त्यांना कोणी मदत केलेली बाबांना चालत नसे. गाडगेबाबांचे कुटुंब म्हणून त्यांना मेहरबानी नको असे. इतरांसारखे कष्ट करूनच रहावे हा नेम त्यांनी पाळला. कोणासाठी कधीही त्यांनी स्वतःहून केलेला नियम मोडला नाही.

अशाप्रकारे ऋणमोचनला एक एक घाट उभा राहू लागला. मुदगलेश्वराजवळचा पहिला घाट पावसाने वाहून गेल्यावर व्यंकट तिडके यांनी त्याचा जीर्णोद्धार केला. अकोला जिल्ह्यातील उंबर्ड्याच्या पारूबाईंनी एक पक्का घाट बांधून दिला. अडगावचे श्रीमंत दानशूर श्री. काशीनाथ टाके यांनी एका घाटाचा भार उचलला. दाढीचे राहणारे माणिकलाल व नारायणलाल बंधूंनी दक्षिण तीरावर एक प्रशस्त घाटाचा वाटा उचलून ऋणमोचनचा उद्धार केला. आज हे चारही घाट पूर्णानदीवर डौलाने उभे असून बाबांच्या कार्याची व सेवेची ग्वाही देतात.

सुरुवातीला बाबा दगडांचा टाळ करून कीर्तनासाठी उभे राहत. आजही त्यांच्या कार्याचा संदेश व भजनाचा निनाद या पायरीच्या दगडातून घुमत असल्याचे भक्तांना जाणवते.

●●●

## पंधरा

## नातलग

घर सोडल्यापासून बाबा दापुरा व कोतेगावला गेलेले नव्हते. भ्रमंतीत त्यांनी कोणत्याही नातेवाईकाला ओळख दाखविली नव्हती. ऋणमोचनच्या मुक्कामात विनवणी करूनही बाबा घरी परतले नाहीत. कोणाची साधी चौकशी केलेली नाही. बाबांच्या पश्चात घराची फारच दैना झाली.

जनतेवर निरतिशय प्रेम करणारे बाबा कुटुंबाबद्दल मात्र फारच कठोर वागल्याचे दिसतात. पण त्यांनी स्वतःला ज्या चौकटीत व नियमात बांधून घेतले होते तो नियमभंग त्यांनी घरादारासाठी केला नाही. 'काम करा आणि खा' हा बाबांनी सर्वांसाठी लावलेला नियम नातलगासाठीही कठोरपणे पाळला.

घरी कर्ता पुरुष कोणी नाही. कुंताबाई व म्हातारी सखुबाई दिवसभर कष्ट करून गुजराण करीत. पोटापाण्याचे हाल होऊ लागले. आलोकाच्या लग्नानंतर घरी थोडीशी धुसफूसही वाढलेली होती. बळीरामाने तरी त्यांचे किती दिवस करावे? आलोकाचे लग्न होऊन ती आपले घरी नांदत होती. पण कलावती व गोविंदा या दोन्ही मुलांची फारच आबाळ झाली.

ऋणमोचनच्या घाटावर पूर्ण कुटुंब कामाला होते. बाबांनी एका झोपडीत त्यांची व्यवस्था केली होती. गाडगेबाबांचे कुटुंब म्हणून फुकटचे काही घेऊ नये हा कटाक्ष घातला. कोणी काही दिले तर बाबा सर्व मजुरांना वाटून देत.

जनतेचा पैसा बाबांनी स्वतःसाठी कधी वापरला नाही. मग कुटुंबाचे तर नावच नको!

एखाद्याप्रसंगी सखुबाई चिडून म्हणे, "हे कोन्त होय तुह्यावाल? आमी मांगायला थोडीच गेलो होतो कोनाच्या दारी"

"हे मजूर तुहे लेकरं नोहेत काय?"

अशी ही बाबांची निःस्पृह वृत्ती होती. काम करणाऱ्या मजुराला ते देव मानीत.

कितीतरी दिवसानंतर बाबांची व घरच्यांची भेट झालेली असल्याने आणि ऋणमोचनला जवळ जवळ राहात असल्याने कधी कधी त्यांना कुटुंबाकडे थोडे लक्ष द्यावे लागे. ते त्यांच्यासोबत कधी राहिले नाहीत, त्यांच्याकडे कधी काही खाल्ले नाही पण त्याचा चरितार्थ थोडाफार चालविण्याचा प्रयत्न केला. यासाठी कधी घाटावर काम देऊन तर कधी सर्वांना कामाला पाठवून!

कलावतीचे लग्नाचे वय झाले. बळीराम तिच्यासाठी मुलगा शोधू लागला. गाडगेबाबाची मुलगी म्हणून नक्षापूरच्या शिवराम वठ्ठ्याचा मुलगा लवकरच तयार झाला. या लग्नाचाही भार बळीराम सहन करायला तयार असला तरी मागचा अनुभव बरा राहिला नव्हता.

कलावतीच्या लग्नाचा भार इतरांनी सहन करावा हे बाबांना रुचले नाही.

"मग लगीन कसं होईनजी?" बळीरामने बाबाजवळ प्रश्न केला.

"मुलीच्या आईनं भिक्षा मागावं अन् लगीन कराव!" खरोखरीच कुंताबाईनी भिक्षा मागून ज्वारी गोळा केली. आमले गावी वऱ्हाड एकत्र जमले.

लग्नाचा दिवस उजाडला. बाबा सकाळीच आमल्यास पोहचले. वधू-वरास ऋणमोचनला घेऊन आले. पूर्णामायीत आंघोळ घातली. भाजी भाकरीचे जेवण घातले. सायंकाळी लग्नाचा मुहुर्त होता.

पण बाबा लग्न लावण्यासाठी थांबले नाही. रात्री जवळच्याच गावी कीर्तनासाठी निघून गेले ते उशिरा परतले.

बाबा नसतांनाच कलावतीचे लग्न पार पडले. नाईलाजाने या वेळेसही बळीरामलाच कन्यादान करावे लागले.

दुसरे दिवशी सकाळी लवकर उठून बाबांनी पटांगण झाडून साफ केले. माणसांनी आपली जेवणाची व्यवस्था स्वतः करावी असे सांगून सर्वांचा निरोप घेतला. कलावतीला सासरी पाठवितानाही ते थांबले नाही. कोणताही पाश मागे न सोडता ते निघून गेले.

कार्यसिद्धीसाठी बाबाची भ्रमंती परत सुरु झाली.

लग्नानंतर कलावतीचे काही दिवस आनंदात गेले. उणेपुरे एक वर्ष ती संसारात रमली आणि एक दिवस कलावतीचे अकाली निधन झाले. बाबांना उशीरा निरोप मिळाला.

एक दिवस ते घरी आले. कुंताबाई व गोविंदास सोबत घेऊन ते झिंगले पिंगले या ओसाड गावी गेले. चार पाच तास खपून एक झोपडी उभी केली. त्यात मायलेकरांची व्यवस्था करुन पुढच्या प्रवासासाठी रवाना झाले.

पुढे बाबांच्या सांगण्यावरून गोविंदाला त्याच्या मावशीकडे कळाशी येथे ठेवण्यात आले.

कुंताबाई मागून खाऊ लागली. काही दिवसानंतर मूर्तिजापूरला स्थिरावली. भाकरी मागून खाणे सुरु होते. गोविंदात जीव अडलेला असायचा. नवरा अवलीया, सासुबाई आमल्यात, मुलगा कळाशीला व कुंताबाई मूर्तिजापुरात असे कुटुंबाचे चार तुकडे झाले.

मूर्तिजापूरला डॉ. सहस्त्रबुद्धे नावाचे सज्जन गृहस्थ होते. त्यांनी बाबांचे कीर्तन ऐकले होते. एक दिवस भाकरी मागत कुंताबाई त्यांच्याकडे पोहचली. गाडगेबाबाची पत्नी म्हणून ओळख पटताच डॉक्टरांनी जबराईने कुंताबाईस घरी ठेवून घेतले. कोणते कामंही करु देईनात. काही दिवस कुंताबाईचे मजेत गेले.

एक दिवस बाबांना हे कळले. खाऊन पिऊन सुखात जीवन जगणारी कुंताबाई परत मागून खायला लागली.

इकडे कळाशीत बाबांचा मुलगा गोविंदा एकटाच असतो ही वार्ता मुंबईच्या बाबाच्या परीट भक्तांना माहीत झाली.

"भिक्षा मागून का होईना पण या मुलाचे अिथे शिक्षण तरी होईल" असे ठरवून गोविंदास मुंबईला आणले गेले. सातरस्त्यास आऊबाई भंडारी यांचे घरी गोविंदाची राहण्याची व्यवस्था करण्यात आली. त्याने रोज

एकेका घरी वारानुसार जेवावे व शाळेत जावे असे ठरले. तसे गोविंदाला मुंबईला आणण्याचा निर्णय बाबांना पटला नव्हता पण वरील अटीवर बाबा तयार झाले.

इकडे सखूबाईला गोविंदाच्या लग्नाची घाई झाली. बालवयात लग्न करण्याची पद्धत विदर्भात रुढ होतीच. खैरी गावच्या मारोती गवळी याची मुलगी वाग्वधू म्हणून निश्चित करण्यात आली. एकदा ऋणमोचनला बाबा आले असताना तिने हा निर्णय त्यांना कळविला. बाबांना सखुबाईच्या हट्टापुढे नमावे लागले.

गोविंदाचे लग्नासाठी वरवधूकडील मोजकी मंडळी मुंबईला दाखल झाली. बाबांच्या ओळखीने व पुण्याईने बरीच गर्दी झाली. लग्नाची तिथी व वेळेचा पत्ता बाबांनी कोणास लागू दिला नाही. एक दिवस ते सातरस्त्यास आले व गोविंदास म्हणाले, "बाबुरे! आज तुहं लगीन कऱ्याचं, उठा, भिक्षा मागून या." बिचारा गोविंदा लग्नाच्या दिवशीही चार घरी भिक्षा मागायला गेला.

आपले आज लग्न आहे याचा मागमुसही गोविंदाला लागला नाही. मुंबईतील वरळीच्या डोंगरावर सर्व लोक जाऊन थांबले. एका मोकळ्या जागेची निवड करून ती जागा बाबांनी सर्वांकडून साफ करवून घेतली. नेसलेल्या जुनेरावरच वधू-वरास हळद लावण्यात आली. दोघांनाही सज्ज करून एकमेकांना पुष्पमाला घालायला सांगण्यात आले अशाप्रकारे गोविंदाचे लग्न लागले.

गाडगेबाबाच्या गोविंदाच्या लग्नाचा खर्च फक्त साडेसात रुपये एवढा होता. नंतर एक बैलगाडी मागवून बाबांनी वरात तिथेच डोंगराकडे वळविली. रात्री जमलेल्या मंडळीसमोर त्यांचे कीर्तन झाले. लग्नात होणारा अनावश्यक खर्च व हुंडा हा कीर्तनाचा विषय होता. सर्वांना तो पटला आणि बाबाविषयीची श्रद्धा अधिक गाढ झाली

सखूबाई थकली होती. ऋणमोचनला एकदा बाबांची तिची भेट झाली. पुढे मात्र ती आजारी राहू लागली. म्हातारपणामुळे शरीर साथ

देत नसे. ती कळाशीला गेली असताना आजारी पडली. एकदा तरी मुलाची भेट व्हावी अशी सखुबाईची इच्छा होती.

बाबांचे कीर्तन मुर्तिजापूरला असल्याची माहिती मिळताच कुंताबाई तिथे गेली. सासू आजारी असल्याचे सांगून बाबांना विनवणी करू लागली.

बाबा म्हणाले, "मंग मी येऊन काय करू? आजारी पडले माणूस, तर त्याले डागदरकडे न्याव का माह्याकडे?"

"पर त्या म्हंनत का येकडाव भेट घडवा!"

"तिला मनावं माह्याकडून लक्ष काढा. थे देवाकडे लावा."

"माहं कीर्तन आहे - मले जावं लागते!"

कुंताबाई हताश होऊन परतली. नवऱ्याला उणेदुणे बोलू लागली.

डेबूजी येत नसल्याचे सखुबाईला कळताच क्षीण स्वरात ती म्हणाली, "आइकल काय? माहा डेबू गुनाचा आहे, थो तर देवाचा मानूस झाला. त्याची कीरत गंगनाले भिडली. त्याचा राग करू नोका. जमलं तितकी त्याले साथ दया. त्याची साथ सोडू नोका. त्यानं आपला उद्धार करून घेतला. तुमचाही उद्धार होऊ द्या." हे सखूबाईचे शब्द शेवटचेच ठरले.

१ मे १९२३ रोजी सखुबाईची प्राणज्योत मालवली. शेवटी कर्मयोगी मुलाची भेट न होताच कर्मयोगिनी सखूबाई महाप्रवासाला निघाली.

गोविंदा आता मुंबई सोडून पुण्यास श्री शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये राहून चवथ्या वर्गात शिकत होता.

एक दिवस शाळेत जाण्यासाठी निघाला असतांना रस्त्यात पिसाळलेल्या कुत्र्याने त्याचा चावा घेतला.

डॉक्टरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पण गुण लाभला नाही आणि ५ मे १९२३ ला गोविंदाचा मृत्यु झाला.

एका आठवड्याच्या अंतराने बाबांवर ओढवलेला हा दुसरा कुठाराघात

होता.

बाबाचा मुक्काम त्या दिवशी रत्नागिरी जिल्ह्यातील खारेपाटण येथे होता. पुण्यावरून त्यांना तारेने गोविंदा गेल्याची वार्ता कळविण्यात आली.

बाबा थोडा वेळ गंभीर झाले. क्षणभर अश्रूंनी डोळे पाणावले. काही वेळाने उठून उभे ठाकले. गावात भाकरी मागायला निघून गेले. आणि रात्री ठरल्याप्रमाणे कीर्तनास उभे राहिले. बोलता बोलता ते म्हणाले,

राम गेले, कृष्ण गेले, पांडवही त्याच वाटीनं गेले.

ऐसे गेले कोट्यानुकोटी। काय रडू एकासाठी।।

पुत्रशोकासाठी ते पुण्याकडे वळलेही नाहीत. ठरल्याप्रमाणे कीर्तनासाठी दुसरीकडे रवाना झाले.

जनरीतीवर बाबाचा विश्वास नसला तरी पिंडदानासाठी कोण बरे उरला होता? बाबाच्या कुटुंबात आता फक्त कुंताबाई व आलोका मागे राहिल्या.

कलावती गेली बाबा आले नव्हते. सखुबाई गेली तेव्हाही ते फिरकले नाहीत. एकुलता एक गोविंदा गेला, बाबांनी तेव्हाही भेट दिली नाही. कुंताबाईना माहीत झाले तेव्हा त्यांनी रडून आकांत मांडला. तिचाही विचार बाबांनी केला नाही. ठरल्याप्रमाणे आपल्या कार्यक्रमात ते व्यस्त राहिले.

आलोका, नवरा व तीन मुलांना घेऊन मूर्तिजापूरला आली. गोरक्षणात इतरांबरोबर त्यांना काम करावे लागे. त्यांना त्याबद्दल मजुरी मिळे. सर्वांसोबत एकाच पंक्तीला बसावे लागे. गाडगेबाबांची मुलगी म्हणून वेगळी वागणूक अजिबात मिळत नसे. कोणी असा प्रयत्न केला तरी बाबा रागावीत. सर्वांभूती समभाव हीच त्यांची शिकवण घरच्यांनाही कटाक्षाने पाळावी लागे.

आलोकासाठी मूर्तिजापूरच्या गोरक्षण संस्थेच्या आवारात बाबांनी

एक झोपडी बांधून दिली होती. त्यात तिचे कुटुंब राही. एकदा तिने गोरक्षणातील आणखी एक खोली खाली करुन मागताच बाबा चिडले.

आलोकाला गोरक्षणातून बाहेर पडावे लागले. मुलगी म्हणून तिच्याविषयी बाबांना फार काळजी होती. तिचे थोडे शेत होते. फकीराच्या या शेताचा हिशेब बाबा वेगळा ठेवत असत. बाबांनी वारंवार आलोकाला पत्रांनी किंवा प्रत्यक्ष भेटून उपदेश केला आहे. मुलगी म्हणून वेगळी वागणुक मात्र दिली नाही. दुसऱ्यांनी दिलेले सार्वजनिक धन ही त्यांनी ठेव म्हणून जतन करताना बाबांनी पोटच्या मुलीलाही सोडले नाही. बाबाच्या वागणुकीचे हे विशेष काहींना आवडो वा न आवडो पण समानतेचे अंगिकारलेले हे तत्व होते, मिशन होते.

कुंताबाईच्या जीवनाची सतत परवडच होत गेली. डेबुजींशी लग्न झाले तेव्हा सुरवातीला फक्त वडील सोडले तर सगळ्यांचा विरोध होता. लग्न झाले आणि काही दिवस बरे गेले. नवऱ्याचे सुख चार पाच वर्षे मिळाले. पण जीवनात आनंद म्हणून कधी त्या बाईने पाहिला नाही. लहान असताना मुदगल, लग्न करून दिले व कलावती आणि गोविंदा देवाघरी गेले. सासुचा कुंताबाईला एकमेव आधार होता. तीही गेली. नवऱ्याने नंतर कधी आश्रय दिला नाही, जवळ केले नाही. फक्त कधी मूर्तिजापूर, कधी पुणे तर कधी नाशिक, अशी कुंताबाईची व्यवस्था झोपडी बांधून करून दिली. मोजक्या सामानासहित कुंताबाईने फाटका संसार केला.

जोवर श्रम करणे जमले तोवर, कष्ट उपसत राहिली. शेवटपर्यंत काम करूनच मिळालेल्या मजुरीवर उदरनिर्वाह केला. गाडगेबाबांची बायको म्हणून तिला कोणी काय देऊ केले तरी ती बाई सवयीने नाकारू लागली.

कुंताबाई दैवाला दोष देत दुःख करीत असतानाच तिचे दुसरे मन तिला थोडे समाधान देत असे तिला वाटे,

भाग्याची बाई कुंती। संताची नारी झाली।

लाखोचे श्रद्धास्थान। पती माझे ।।

गाडगेमहाराजांची पत्नी म्हणून लौकिक सुख मिळाले नसले तरी आत्मिक सुख अनुभवले. पण तरी तिला वाटत राही की,

कोटीच्या धर्मशाळा। बांधल्या लोकांसाठी।

झोपडी नशिबी नाही। कुंताबाईच्या।।

काढीले अन्नछत्र। भुकेले होती तृप्त।

वाट्याला माझ्या।। नाही अन्न शित।।

कुंताबाईला पोशिंदा कोणी नसल्याने बाबांनी तिची रहायची तेवढी व्यवस्था करून दिली होती.

बाबांच्या शेवटच्या दुःखण्यात कुंताबाई अमरावतीच्या इर्विन हॉस्पिटलमध्ये सोबत होती, तिथेही बाबांनी तिला राहू दिले नाही. त्यांचा शेवटचा शब्द आज्ञेप्रमाणे मानून ती अमरावतीला झोपडी बांधून राहू लागली.

बाबांच्या निर्वाणानंतर गाडगेनगर अमरावती येथील त्यांच्या समाधी स्थळाजवळ कुंताबाईची राहण्याची व्यवस्था करण्यात आली.

दोन तीन वर्षांनी कुंताबाईंनी गाडगेनगर येथेच देह ठेवला आणि गाडगेबाबांच्या कुटुंबाचा शेवटचा दुवा निखळला.

●●●

# सोळा

# पंढरपूर यात्रा व धर्मशाळा

गाडगेबाबांची कीर्ती महाराष्ट्रभर पसरू लागली होती. कीर्तनातून त्यांची लोकांना ओळख पटली होती. ऋणमोचन आणि पंढरपूरची यात्रा बाबा नित्यनेमाने करीत असत. ऋणमोचनला त्यांनी घाटांच्या बांधणीला सुरुवात केली होती. पंढरपूरला येणारा प्रचंड जनसमुदाय पाहून बाबांचे मन हेलावून जाई. पंढरपूर सारख्या लहान गावात लाखोने येणाऱ्या भक्तांची व्यवस्था तोकडी असे. यात्रेकरूचे होणारे हाल त्याच्यांनी पहावत नसे.

श्रीक्षेत्र पंढरपूर, महाराष्ट्रातील भक्तिसंप्रदायाचे आद्यपीठ. वारकरी पंढरीस आल्यावर चंद्रभागेचे स्नान, क्षेत्रप्रदक्षिणा, पांडुरंगदर्शन, हरिकीर्तन असा चतुर्विध यात्राविधी करतात.

धन्य धन्य हे नगर। भूवैकुंठ पंढरपूर।। पंढरपूरचा 'राणा' श्रीविठ्ठल. हा पांडुरंग असून बालकृष्णही आहे. जडजीवाचा उद्धारकर्ता! पतितपावन करून दोषभंग करणारी चंद्रभागाही इथेच! थोडक्यात पंढरपूर म्हणजे "सर्व तीर्थांचे माहेर" आणि श्री विठ्ठल ही मायमाऊली।

गाडगेबाबा पंढरपूरला आले. यात्रेत तीन चार लाखाचा जमाव असे. पंढरपूरला आषाढात पाऊस तर कार्तिकात थंडी फार असे. मंदिर परिसरात व गावातही व्यवस्था थिटी पडून जाई आणि श्रद्धेने येणारा वारकरी पाऊस आणि थंडीने कुडकडून जाई. पंढरपूरला येऊन धन्य झाल्याचा आनंद त्याला मिळत असला तरी परमेश्वर दर्शनासाठी हजारो कोसावरून येणाऱ्या भक्ताला हालअपेष्टाना तोंड द्यावे लागे.

पंढरपूरला आले की बाबांचा 'झाडू' सुरूच असे. झाडताना कोणी लांबून जाई, एखादा 'थांब थोडं' म्हणे. मंदिरापुढे चिल्लर दुकानाच्या रांगेत सदैव घाण असे. विठ्ठलाच्या दर्शनासाठी भक्त रात्रंदिवस ताटकळत असल्याने अशा दुकानदारांचे फावत असे. मग तिथे केरकचरा भरपूर

होई. बाबांनी हे सर्व पहाटे साफ करावे. कोणाला त्रास होणार नाही याची ते काळजी घेत.बाबांचा वेश पाहून त्यांच्याजवळ कोणी फिरकत नसे. परिसर साफ करताना त्यांचे लोकनिरीक्षण सुरू असे.

पंढरपूरला दर्शनासाठी येणारा भक्त हा 'वारकरी' असला तरी तो विविध जातीत विभागला होता. पंढरपूरचा विठोबा हा वर्णातीत असला तरी दर्शनासाठी महारांना पुढे ताटकळत उभे रहावे लागे. कधी प्रवेशच दिला जात नसे.

इथेही बाबांना शिवाशिव, स्पृश्यास्पृश्य भेद मोठ्या प्रमाणात आढळून आले. महाराष्ट्रात महार मांग मोठ्या संख्येने आहेत. मेलेली ढोरं ओढणे हा त्यांचा धंदा होता म्हणून लोक त्यांना शिवत नसत. चातुर्वर्ण्य मोठ्या प्रमाणात पाळले जाई. पंढरपूरला देवदर्शनास आलेल्या मंडळीत उच्चनीच हा भेदाभेद भरपूर प्रमाणात होता. महारमांगांना देवदर्शन मंदिराचे बाहेरून पायरीजवळून घ्यावे लागे. फक्त एवढ्यासाठी हे लोक पंढरपूरला कशाला येतात असे बाबांना वाटे.

पंढरपूरला मोठमोठ्या संताची कीर्तने असत. एखाद्या कानाकोपऱ्यात बाबाही कीर्तन करीत. थोडाफार समुदाय असेच. "गुरं ढोरं तुमी पोसता, मेल्यावर म्हार मांग ते ओढतात, तुमच्या दारची घाणच ते बाहेर काढतात, दूर करतात, अन्यथा ते ढोर तुमच्या घरात सडून सर्वत्र वास झाला असता" असे बाबा कीर्तनात आवर्जून सांगत.

पंढरपूरला घराघरातून वारकरी उतरत. रहायला जागा नसे. सर्वत्र मळ दुर्गंधी पसरलेली. बडव्यांची अंधारलेली जुनाट पडकी घरे म्हणजे पैसे कमावण्याच्या बोर्डिंगच असत.

अस्पृश्यांचे हाल कुत्राही खात नसे. महारवाड्यात त्यांना मिळेल त्या जागेत दाटीदाटीनं तर कधी उघड्यावर थंडी पावसात दिवस कंठावे लागत. झोपेचा पत्ता नाही. खाण्यापिण्याचे हाल होत असत. तरी निष्ठावंत वारकरी हे सर्व सहन करून पंढरपूरला येत.

श्री विठ्ठलाच्या पंढरपूरी हा भेदभाव बाबांना सहन झाला नाही. ते

पंढरपूरला नेमाने गेले असले तरी भेदभाव असणाऱ्या विठ्ठलमंदिरात जाऊन त्यांनी कधी दर्शन घेतले नाही. देवळात पाय ठेवला नाही.

तशी बाबांची कीर्ती सर्वत्र वाढू लागल्याने कीर्तनाला भरपूर गर्दी असे. त्यांच्या परखड व निर्भिड उपदेशांचा अमंल महाराष्ट्रभर दिसू लागला. गाडगेबाबा पंढरपूरला असले की त्यांनी मंदिरप्रवेश करावा, कीर्तन करावे असा स्पृश्य लोकही आग्रह धरु लागत पण त्यांनी कधी ऐकले नाही.

अस्पृश्य वारकरी दुर्गंधीतच उतरत. मंदिरांचा कळस दुरून पाहून दर्शन घेत. चंद्रभागेत एका आडोशाला खालच्या बाजूने स्नान करुन पावसात भिजत क्षेत्र प्रदक्षिणा करीत. सुरुवातीला स्वतः गाडगेबाबांनी ह्या यातना भोगलेल्या होत्या.

अस्पृश्यांच्या यातना पाहून बाबांचे मन करुणेने भरून आले. त्यांच्यासाठी कायमचा निवारा असावा हे त्यांच्या मनाने हेरले. म्हणूनच धर्मशाळा बांधून त्यांची पंढपूरला योग्य व्यवस्था करावी हा बाबांचा निश्चय पक्का झाला.

ऋणमोचनचे घाट उभे करताना त्यांना पैशाची ददात पडली नाही. पण पंढरपूर तसे दूरचे गांव असल्याने पैसा कसा उभा करावा याचे विचार मनात घोळू लागले.

पंढरपूरला बाबांच्या कीर्तनात गरीब, श्रीमंत, स्पृश्य, अस्पृश्य सर्वच येऊन बसत. त्यांचा उपदेश ऐकून कित्येकांनी दुर्व्यसन सोडले. तुळशीमाळ घालून पंढरीच्या सेवेत रुजू झाले. बाबा सांगतील तसे वागायला काही जण तयार होते.

कित्येक जण बाबांना भेटून विचारीत. गरीब, श्रीमंत, वृद्ध, स्त्री पुरुष, तरुण कितीतरी असत. एखादे वेळी वृद्धांना चेष्टेने बाबा म्हणत.

"कुठून आला?"

ती वृद्धा गावाचे नाव सांगे

"तुपाचं गाडगं संग आनलं का नाही"

"नाही बाबा"

"झालं मंग! सूनबाई करते त्याचा सत्यानाश!"

"नाही बाबा सून चांगली आहे."

"मंग तुम्ही तिले सासुरवास करीत असान"

"नाही बाबा."

"नाही त काय? हे करू नको, ते करू नको, इकडं जाऊ नको नवऱ्याशी बोलू नको."

"नाही बाबा."

"मंग आता काय हुकूम आहे"

"हे पैसे आनलेले आहेत बाबा."

"किती आहेत"

"हजार रुपये"! माझ्या धन्यानं माझ्यासाठी ठेवले होते."

"आन् सूनेले लेकाले ठेवाल का नाही?"

"त्यांचे त्यांनाही भरपूर ठेवले आहेत."

"मंग मी यांच काय करू?"

"काहीही करा!"

असा पैशाचा ओघ येत असे. पण बाबांनी गरीबांकडून पैसा घेतला नाही." आमची ठेव म्हणून तुमच्याकडे राहू द्या. निरोप आला की पाठवा" असे सांगून परत केले.

अशाप्रकारे कितीतरी लोक बाबांना मदत करायला तयार झाले.

पंढरपूरला गोपाळपूर रस्त्यावर एक मोकळी जागा बाबांच्या पाहण्यात होती. ती खरेदी केली. ठिकठिकाणाहून पैसे मागविले. लवकरच योग्य मुहुर्त साधून धर्मशाळेच्या बांधकामाला सुरुवात झाली.

अस्पृश्यासाठी धर्मशाळा बांधणे हा अभिनव कार्यक्रम होता. व याचे शिल्पकार होते गाडगेबाबा. दूरवरच्या विदर्भातील रहिवाशी असणाऱ्या बाबांनी पंढरपूरला ही किमया करून दाखविली आणि समाजापुढे एक आदर्श उभा केला. त्यांचे कीर्तन ऐकून मिळालेल्या प्रेरणेतून लोकांनी पैसा दिल्याने हे जनतेचे कार्य होते.

बांधकामावर देखरेख व व्यवस्था पाहण्यासाठी नागपूरकडील अड्याळचे श्री. तुळशीराम फुलझेले व यवतमाळ जिल्ह्यातील दाभे गावचे जागोबा बोरकर या दोन विश्वासू सेवकांची बाबांनी नियुक्ती केली. ते दोघेही अशिक्षित असल्याने हिशेबाची देखरेख करण्यासाठी बुद्धिवान व निष्ठेने काम करणाऱ्या व्यक्तीची गरज होती, ती रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वरच्या गणपत हरिभाऊ गांगण यांच्या रुपाने भरून निघाली.

माणसांची निवड करताना बाबा त्यांची कसून परीक्षा घेत. कामाच्या विविध कसोटया घेऊन त्यांची निवड करीत. गणपतराव त्यात उत्तीर्ण झाले. ते प्रामाणिक कार्यकर्ते होते. पंढरपूर धर्मशाळेची संपूर्ण जबाबदारी बाबांनी त्यांचेवर सोपविली होती.

गाडगेबाबांना लोकांनी भरभरून पैसा दिला. पैसा कोठून कसा येई हे कळत नसे,न मागताही पैसा येत राहिला. मात्र आलेल्या पैशाचे व खर्च झाला त्याचे चोख हिशेब असत. एखादेवेळी कोणी अकल्पित दाता उभा राही आणि दान देऊन निघून जाई.

एकदा असाच एक प्रसंग घडला. पंढरपूरला धर्मशाळेचे बांधकाम सुरू असताना एक सौम्य मुद्रा असलेले, कफन घातलेले संन्यासी पुढे येऊन उभे ठाकले. इथे कोणी गाडगेबाबा नावाचे महाराज अस्पृश्यासाठी धर्मशाळा बांधणार आहेत हे त्यांनी ऐकले. बांधकामाजवळ येऊन विचारपूस केली.

"कौन गाडगेबाबा? कहां है वो।"

कुणीतरी बाबांना निरोप दिला. बाबा समोर आले आणि हात जोडून नम्रपणे म्हणाले.

"कहिए क्या हुक्म है?"

संन्याशी आश्चर्याने बाबांकडे पहातच राहिले. त्यांचा विचित्र पोषाख निरखित म्हणाले.

"क्या धर्मशाळा आप बनवा रहे है?"

"मै तो उसका दास हूं" बाबा अदबीने म्हणाले.

"लेकीनअस्पृश्योंके लिए?" तपस्वी माहिती घेण्याचा प्रयत्न करू लागले.

अस्पृश्य वारकऱ्यांचे पंढरपूरला कसे हाल होतात यांची माहिती बाबांनी संन्याशाला दिली. धर्मशाळा बांधण्याचा उद्देश कथन केला. स्वामाजींना बाबाचा पाक हेतू लक्षात आला ते म्हणाले,

'इच्छा होती है, मैं भी कुछ हात बटाऊ?"

बाबांना वाटले की स्वामी शंभर दोनशे रूपये देतील. पण स्वामीजींनी जवळच्या पिशवीतून चेकबूक काढले व पंचवीस हजारांचा चेक त्याने बाबांच्या हातावर ठेवला.

एका फकीराला दुसऱ्या फकीरांची ओळख पटली होती. एका साधूने दुसऱ्या साधूच्या कामाची तळमळ पाहून कदर केली.

हे तपस्वी होते गुजरातचे रहिवाशी असलेले स्वामी अखंडानंद! दोघांची ओळख झाली. मैत्री झाली. पत्रव्यवहार सुरु झाला!

पंढरपूरला अस्पृश्यांसाठी धर्मशाळा उभी राहिली. यात्रेनिमित्त वारकरी आले की त्यांची राहण्याची चिंता राहिली नाही. शिवाशिव पाळत असलेल्या काळात केलेले हे कार्य म्हणजे दलितांसाठी संजीवनी होती. देवदर्शनासाठी आलेला समाज भक्तिनिवासात राहू लागला त्यांची निवारा ही मूलभूत गरज भागू लागली.

हरिजन गिरीजनासाठी बांधलेल्या ह्या पहिल्या धर्मशाळेचे कार्य १९२० सालच्या दरम्यान पूर्णत्वास गेले.

काम करीत राहणे ही गाडगेमहाराजांची जीवननिष्ठा होती. कर्मयोगी माणसाला समाजातील दुःखाची ओढ असते, समाज स्थितीची जाणीव असल्याने एकेक समस्या सोडवावीशी वाटत राहते. सकाळी झाडू, रात्री

कीर्तन, दिवसभर कोणतेतरी काम, देखरेख असे दिवसभर बाबा स्वतःला कामात ओतून घेत.

एक धर्मशाळा उभी राहिली, आणि बाबांना बरीच मंडळी येऊन भेटू लागली. विनंती करु लागली. पुढे त्यांनी सवड मिळताच मराठा धर्मशाळेचा मुहूर्त केला.

मराठा समाज प्रामुख्याने महाराष्ट्रात मोठया प्रमाणात आहे. शिवाजी महाराजांचा वसा मिळालेली ही शूर जमात पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर आढळते. या समाजातील बरीच दानशूर मंडळी बाबांना भेटली व त्यांनी धर्मशाळा उभारण्याचा आग्रह केला. बाबा तयार झाले. त्यांना पैशासाठी त्रास झाला नाही. आणि एक दिवस फार मोठी भव्य दिव्य अशी मराठा धर्मशाळा पंढरपुरात दिमाखाने उभी ठाकली.

भारत कितीही पुढारलेला देश झाला तरी जातीबंधनातून मुक्त होईल की नाही याविषयी शंका वाटते. गाडगेमहाराज परीट जातीतले. धोबी हा त्यांचा पिढीजात धंदा. एखाद्यावेळी कीर्तनात उपदेश करताना आपल्या जातीचा बाबा उल्लेख करून वर्ण्यविषय समानतेसाठी पटवून देत. पण बाबांची परीट जात एका कार्याची दिशा ठरली.

परीट जातीतील अनेक मंडळी पंढरपूरला येत. त्यांनी हरिजन व मराठा धर्मशाळा पाहिल्या, त्या गाडगेबाबांनी बांधून उत्तमरीतीने त्यांचे व्यवस्थापन केलेले पाहिले. म्हणून परीटांनी एकत्र येऊन वर्गणी गोळा केली. बाबांच्या मागे लागून धर्मशाळा बांधण्याचा आग्रह धरला. बाबांना त्यांची निकड पटली, त्यांनी होकार देऊन पंढरपूरला तिसरी परीट धर्मशाळा बांधून भक्तांची निवास व्यवस्था केली. १९२५ दरम्यान ही धर्मशाळा बांधून पूर्ण झाली. परीटांमधलेच पंच नेमून त्यांच्यावर धर्मशाळेचा कारभार सोपविला. दर्यापूरचे अमृत गणाजी व नंतर दगडूबुवा यांनी उत्तमरीतीने व्यवस्थापन पाहिले.

अशाप्रकारे पांच वर्षाच्या अल्प कालावधीत गाडगेबाबांनी हरिजन, मराठा व परीट धर्मशाळांची पंढरपूरला उभारणी करून आपल्या कार्यांची अखिल महाराष्ट्रात मुहूर्तमेढ रोविली.

# सतरा
# नाचू कीर्तनाचे रंगी

गाडगेबाबांनी आयुष्यभर जनसेवेचे अखंड व्रत धारण करुन जो समाज जागृत केला त्यावर त्यांचे अफाट ऋण आहे. जीवनभर कर्जमुक्तीचा संदेश देणाऱ्या बाबांनी सर्व महाराष्ट्राला आपल्या कर्तृत्वाचे कायम ऋणी करून ठेवले आहे.

कीर्तनासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांचा प्रवास सुरु झाला. निमंत्रणे सांभाळताना त्यांची व त्यांच्या अनुयायांची दमछाक होऊ लागली.

तीर्थयात्रेच्या निमित्ताने त्यांना पंढरपूर, ऋणमोचन, माहूर, नाशिक, आळंदी येथे जावे लागे. कर्मवीर पाटलांच्या घनिष्ठ सान्निध्यामुळे त्यांनी पूर्ण कोकण पालथा घातला. प्रयागचा कुंभमेळा, काशी यात्रा इ. ठिकाणीही त्यांच्या कीर्तनाच्या नोंदी सापडतात. वऱ्हाडास मध्यप्रांत लागून असल्याने बाबांनी जबलपूर, रायपूर पर्यंत कीर्तनाने समाज जागृत केला. आंध्रप्रदेशातही हैद्राबाद व आसपासच्या परिसरातून बाबांना वारंवार निमंत्रणे येत. तिथेही त्यांना कीर्तनासाठी जावे लागले. लांबलांबचे प्रवास असत. कार्यक्रमांची सतत गर्दी होती. आज नागपूर, उद्या पुणे, परवा खारेपाटण लगेच हैद्राबाद आणि पुढे अमरावती असे कीर्तनाचे कार्यक्रम ठरलेले असत.

व्यसनमुक्ती, दारुबंदी आणि अस्पृश्यता निवारणाचा प्रसार करण्यासाठी बाबांनी कीर्तनाचा झपाटा आरंभिला. १९४८ साली या कार्यासाठी शासनाने त्यांना एक मोटार गाडी दिली होती. त्यामुळे त्यांना महाराष्ट्रभर प्रवास करणे सुलभ झाले. सततच्या प्रवासाची दगदग होत असली तरी कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करणे हा त्यांच्या प्रवासाचा मुख्य हेतू होता. कीर्तनासाठी वणवण फिरणे हे बाबांचे प्राक्तनच; पण समाजमळ धुवून काढण्यासाठी कर्मयोगी बाबांनी ते आनंदाने स्वीकारलेले जीवनव्रत होते.

बाबांच्या कीर्तनातील विषय मोठे गंमतीदार असत. संवाद तर थेट लोकांच्या हृदयाशी जाऊन भिडणारे असत. कोणताही विषय बाबा स्वतःच्या नाट्यमय शैलीत हातवारे करून समजावून सांगताना लोकांची हसून पुरेवाट होई. आपल्यावरच होणारे शब्दांचे फटकारे आपण सहन करीत आहोत आणि हे सांगताना हसण्याचा आनंद लुटणाऱ्या जमावाला बाबांचे हे दुधारी शस्त्र लवकर उमजत नसेल म्हणूनच कीर्तनात कोणतीही परंपरा न पाळता बाबांनी स्वतःची खास शैली निर्माण करून लोकाभिमूख बनविली.

गाडगेबाबांची कीर्तनशैली लोकविलक्षण होती. लोकशिक्षणासाठी त्यांनी कीर्तनासारख्या पारंपारिक कलेचा अतिशय सुंदर उपयोग केला.

वारकरी कीर्तन हे सांप्रदायिक कीर्तन म्हणून ओळखले जाते. तसेच नारदापासून सुरु झालेल्या ह्या कीर्तन परंपरेत एकनाथी असो की रामदासी असो, हळू हळू ते पोट भरण्याचे साधन बनत गेले. या पार्श्वभूमीवर गाडगेबाबाचें कीर्तन ठळकपणे उठून दिसणारे आहे.

जनकल्याणाच्या तळमळीतून तयार झालेले बाबांचे हे प्रचारतंत्र त्यांच्या कीर्तनशैलीत हुबेहूब उतरले आहे. देवदेवतांचे अवास्तव स्तोम त्यांनी माजविले नाही. लोकहिताच्या, उपयोगितेच्या दोन गोष्टी कीर्तनातून सांगितल्या. त्यांच्या कीर्तनाचे महत्वाचे वैशिष्ट्ये असे की भाषेचे स्तोम न माजविता आपली वैदर्भिय वऱ्हाडी बोली कीर्तनातून रुजविली आणि थेट पश्चिम महाराष्ट्राच्या गळी उतरविली. प्रत्येकजण त्यांच्या गावकरी भाषेने अंतर्मूख होई. पुण्यामुंबईकडील सुशिक्षित समाजालाही बाबांचे कीर्तन समजताना कोणतीही अडचण गेली नाही यातच त्याच्या लोकभाषेतील कीर्तनशैलीचा प्रत्यय येतो.

त्यांच्या कीर्तनात श्रोता, वक्ता, संवादाला फार महत्व असे. अशा नाट्यमय संवादाने कीर्तनात डुलक्या देण्याला वावच नसे. श्रोत्यांना बोलके करताना त्यांनी अवास्तव व अनाकलनीय गोष्टी कधी सांगितल्या नाहीत.

ईश्वरगान करण्यासाठी कीर्तन असा समज असताना त्यांनी परमेश्वर रुपाला व त्याच्या अतिंद्रिय शक्तीला विरोध करण्यासाठी प्रभावी साधन

म्हणून कीर्तनाचा वापर केला व समाज परिवर्तन घडवून आणले. दारु, हिंसा, शिवाशिव, कर्जमुक्ती सारखे विषय हाताळून समाजातील शोषण थांबविण्याचा मार्ग त्यांनी निरुपणातून दाखविला. ग्रामसफाई करीत करीत वैचारिक धन देऊन जनमानसातील मानसिक रोग नष्ट करण्याचे महान कार्य त्यांना कीर्तनाद्वारे करावे लागले. यासाठी त्यांना संपूर्ण महाराष्ट्रच नव्हे तर मध्यप्रांत आणि आंध्रप्रदेश इथूनही निमंत्रणे येत गेली. वृत्तपत्रीय प्रसिद्धी नसतानाही त्यांच्या कार्याची ओळख जनतेला होत गेली. यासाठी कीर्तन या एकमेव साधनाचा त्यांनी बेमालूमपणे उपयोग केला.

गाडगेबाबांनी कीर्तनाचा लोकशिक्षणासाठी म्हणून केलेला उपयोग अनेक वर्षे सुरु होता. आयुष्याच्या सायंकाळी त्यांची तब्येत तोळामासा राहू लागली. त्यांना कित्येक दिवस दवाखान्यात ठेवावे लागले पण औषधोपचार सुरु असतानाही त्यांना विश्रांती घेता आली नाही. जनतेचा लोभ पाहून ते कीर्तनासाठी उभे राहात. सातत्याच्या भ्रमंतीने अंतिम क्षणीही त्यांच्या थकलेल्या शरीराला आराम मिळू शकला नाही.

अशाप्रकारे ८ नोव्हेंबर १९५६ ला मुंबई येथे बांद्रा पोलीस स्टेशनच्या आवारात झालेले बाबांचे कीर्तन अखेरचे ठरले. या कीर्तनाला जाण्यापूर्वी ते विश्राम करीत होते. पोलीसांच्या विनंतीवरून ते कार्यक्रमाच्या ठिकाणी जाण्यास तयार झाले. तेथे गेल्यावर त्यांनी जनतेला अभिवादन केले. कीर्तनास भरपूर गर्दी होती. एकतर बाबांनी बसूनच दोन शब्द बोलावे किंवा भजन म्हणावे अशी विनंती करण्यात आली. जनतेची आग्रही मागणी पाहून ते महाप्रयासाने उभे झाले. भजन म्हणता म्हणता कीर्तन सुरू झाले. ते रंगत गेले. बाबांचे हे कीर्तन सार्वजनिकरीत्या अखेरचे ठरले. त्यांनी आयुष्यभर केलेल्या कीर्तनापैकी या एकमेव कीर्तनाची ध्वनिफित आजही उपलब्ध आहे.

या कीर्तनातील सारांश खाली दिलेला आहे.

गोपाला गोपाला। देवकीनंदन गोपाला।। असा भजनाचा जयघोष

करीत बाबांचे कीर्तन सुरू होई. तुकोबारायाचा दाखला देत ते म्हणायचे, "देव पहावयासी गेलो' पण देव दिसला नाही. देवाला पाहण्यासाठी भटकणे सुरूच होते. शेवटी 'मीच देव झालो' आणि देव काय पहायची वस्तू आहे काय?

देव कोणाला दिसला नाही. तो कोणाला दिसणार नाही. मग जो दिसतच नाही त्यासाठी एवढा आटापिटा करण्याची गरज काय? बाबा म्हणत 'मानसाच्या जल्मात येऊन जो भजन करील तो देव होईल. तुकोबारायांचा पुरावा आहे -

देव पहावयासी गेलो।

अन् तेथे देव होवोनी ठेलो।।

देव कसा आहे. वाऱ्यासारखा आहे. वाऱ्यासारखा परमेश्वराचा संचार आहे.

वायू वसे सकल ठायी ।

परि त्यासि बिऱ्हाडची नाही ।।

तीर्थयात्रेला जाणाऱ्या लोकांना बाबा पटवून सांगतात की, 'तीर्थाला जा. पैशाचा नाश,' 'जगन्नाथ, रामेश्वर हे सर्व पोट भरण्याचे देव आहेत.'

देव देव करता शिनले माझे मन।

पानी आणि पाषाण जेथे तेथे।।

दगडाचा देव आणि गंगेचे पाणी हेच तीर्थयात्रेत बाबांना दिसले. पण देव दिसला नाही. कबिराच्या भाषेत

जत्रामे फतरा बिठाया तीरथ बनाया पानी ।

दुनिया भयी दिवानी पैसों की धुलधानी ।।

दिसत नसलेल्या देवासाठी लोकांची चाललेली धडपड, तीर्थयात्रेत गरिबांची होणारी पिळवणूक, पाहून त्यांना वाईट वाटे. तीर्थयात्रा म्हणजे भोळया अज्ञ जनतेची लूट होती. पैशाचा नाश होता. म्हणून बाबा म्हणत.

दगडाचा देव बोलील तो कैसा ।

कवन काळी वाचा फुटील त्यासी ।।

'मग देव कुठे आहे? मनुष्यमात्रांच्या सेवेत! मानवसेवा हाच खरा धर्म असून त्यातच देव आहे!'

'जे का रंजले गांजले त्यासी म्हणजे जो आपुले.' देव अशा रंजल्या गांजलेल्याच्या सेवेत आहे. सेवा हा मोठा धर्म आहे. म्हणून बाबा कीर्तनातून सांगत की ज्याला उठता बसता येत नाही त्याचा हात धरून चालायला लावा, यांत देव आहे. भूकेल्याला अन्न, भूतदया यात देव आहे. कुष्ठरोगी, आंधळापांगळा यांची सेवा करा यात माणूसधर्म आहे. अंतकरणात सेवाधर्म जागृत करा, हा देव सोडून रामेश्वरला का जायचे? पुंडलिकासारखे आईबापाची, जनताजनार्दनाची सेवा करा, विठ्ठल तुमच्या दाराशी उभा राहिल. बाबांचे हे तत्वज्ञान जनमानसाच्या परीक्षेतून समाज निरिक्षकेतून उतरलेले होते.

सत्यनारायणाच्या पोथीची थट्टा करताना बाबाच्या अंगी असलेले नाटय उफाळून येई. ते म्हणत, 'सत्यनारायन कोन करते? लोभी लोकं! गाडी मिळत नाही, पैसा हातात नाही, सत्यनारायण करू?

'सत्यनारायनाच्या पोथीत असे आहे की नाही, साधूवान्यानं परसाद नाही घेतला, सत्यनारायन नाही केला. त्याची करोडो रुपयाची नौका पान्यात बुडाली' -

'अडीच रुपयाचा सत्यनारायण केला. परसाद वाटला, परसाद घेतला अन् करोडो रुपयाची बुडालेली नौका वर आली.' हे खरे नसल्याचे ते जमावाला पटवून देत. चपखल उदाहरणे देऊन त्यांचा विश्वास संपादन करीत. देऊळ तयार झाल्यावर जर मूर्ती आणावी लागली तर 'इकत की फुकट' असा प्रश्न विचारून विकत म्हणणारांना 'देव इकत भेटत असते. सांगा? देव इकत भेटते कां? मेथीची भाजी होय? का कांदे बटाटे होत?'' असा प्रश्न विचारून निरुत्तर करीत. एखादा विषय हरहुन्नरी जनतेला पटवून देण्याचे त्यांचे कीर्तनाचे कसब वाखाणण्यासारखे आहे.

हा संसार देवभोळा होता. धर्मभावना जोपासण्यासाठी स्त्रियांची व भोळया जनतेची पिळवणूक बाबांनी पाहिली. त्यांनी तीर्थयात्रेत हजेरी लावली. अनेक ठिकाणी गेले. तेथील साफसफाई केली. पण देवदर्शन केले नाही. एकदा ते पंढरपूरला गेले असतांना देवदर्शन करणाराच्या ओळीत उभे राहिले तेव्हा एका बडव्याने जनतेचा खोळंबा होतो म्हणून बाबांना धक्का देऊन बाहेर काढले व एका श्रीमंत माणसाला वाट करून दिली. तेव्हापासून गरीब श्रीमंत भेद मानणाऱ्या देवाचे दर्शन घेणार नाही ही अलिखित प्रतिज्ञा त्यांनी जीवनभर पाळली. देवदर्शन करणाऱ्यांचा मार्ग झाडून स्वच्छ केला. त्यांच्यासाठी सुखसोयी उपलब्ध करून देण्यासाठी झटले. मनुष्यमात्रांची सेवा हाच खरा देवापर्यंत पोहोचण्याचा मार्ग होता. हीच देवभक्ती होती हे त्यांनी ओळखले होते. 'या जगात देव आहे, जगाची सेवा करा' हा त्यांच्या कीर्तनाचा संदेश हेच सांगत नाही काय?

ते जनतेला म्हणत. 'इंग्रजी सरकारच्या अरिष्टानंतर सत्याग्रह कोणी केला? यासाठी देवळातले देव आले नाही. वाद्रयांचे राम, दादरचे इठोबा, वाळकेश्वराचे महादेव, कोणी आले नाही?

मग सत्याग्रह कोणी केला?

मानसांनी!

मग! कोन चलेजाव म्हनलं?

गांधीजींनी!

मंग! गांधीजीले देव म्हणा. कारण त्यांच्या एका शब्दानं इंग्रज गेले. माणसाचं धन तिजोरी नाही, हिरे नाही, मोटर नाही. मानसाच धन कीर्ती! म्हणून कीर्तीरुपानं गांधीजी जिवंत आहेत.'

तुका म्हणे एक मरणचि खरे ।

उत्तमचि उरे कीर्ती मागे ।।

हजारो वर्षांच्या गुलामगिरीतून मुक्तता करणाऱ्या गांधीजींना देव माना म्हणणारे गाडगेबाबा पाहिले की मानवधर्माची महती कळून येते.

म्हणूनच जगाची सेवा करणे, गरिबांवर दया करणे, हाच खरा मानवधर्म होय.

धरम करो गरिबीसे मग्रोरीमे धोका है ।

तुम बोलो मै दाता हूँ तो माल कहाँ से आता है।।

जगात जनार्दन असल्याचा पुरावा संतांनी दिला. म्हणूनच गरीबांसाठी दवाखाना बांधून त्यांची औषधपाण्याची सोय करा, त्यांना कपडालत्ता देऊन अन्न द्या असे सांगणारे संत पृथ्वीवर मोठे आहेत. गाडगेमहाराज याच संत कुळातले असल्याने त्यांचाही मान मोठा आहे.

सत्पुरुष कोण? हे सांगतांना बाबा म्हणायचे की, ज्या धन्याच्या अंतकरणात दया असेल तो सत्पुरुष! संसारात काटकसर, स्वच्छता आणि दया ही मोठी शस्त्रे आहेत.

"तीरथ जाव काशी जाव चाहे जाव गया ।

कबीर कहे कमालकू सबसे बडी दया।।"

याकरिता प्रत्येकाच्या मनात दयाभाव निर्माण होणे आवश्यक असल्याचे त्यांचे प्रतिपादन असे.

मुंबईत सर्वात जास्त धन मारवाडी, गुजराथी आणि ब्राह्मणाजवळ असल्याचे ते कीर्तनातून सांगत असले तरी त्यांचा उपदेश असा होता की या लोकांना जमाखर्चाचा लेखाजोखा ठेवावा लागत नाही. पैसा खर्च करताना आखडता हात घेण्याची गरज नाही. आणि महार, तेली, तांबोळी यांना मात्र खायची ददात आहे. 'आजा पंजापासून आमटी यांच्या घरात घुसली बाहेर निघतच नाही.' असा टोमणा मारुन हे लोक गरीबीत राहण्याचे कारण विद्या होय असे बाबा म्हणत. 'ज्याला विद्या नाही त्याले खराट्याचा बैल म्हटले पाहिजे' असे ठणकावून सांगत व 'आतातरी मुलाले शिक्षण द्या, पैसे नाही म्हणाल तर जेवणाचे ताट मोडा.पण मुलाले शाळेत घातल्याविना राहू नका' असा उपदेश करीत.

'विद्या मोठं धन आहे, यातलेच माणसं दिल्लीच्या तख्तावर जाऊन

भाषणे देतात आणि यातलेच बोरीबंदरच्या स्टेशनवर पोते उचलून हमाली करतात? ते मानसं आणि हे कोण?' असा प्रश्न विचारुन अज्ञानाची चीड ते व्यक्त करीत. मुलांना शिकवून मोठे करा असे म्हणताना ते दाखला देतात की 'डॉ.आंबेडकर साहेबांच्या पिढ्यान पिढ्या झाडू मारायचं काम करीत. त्यांच्या वडिलाले बुद्धी सुचली अन् आंबेडकर साहेबांना शाळेत घातलं. साहेबानं काही लहान सहान कमाई नाही केली. हिंदुस्थानची घटना केली घटना. आणि जर का ते शाळेत गेले नसते तर? झाडू मारणंच त्यांच्या कर्मात होतं.' यासाठीच विद्या शिका अन् गरीबाले विद्येसाठी मदत करा. हा त्यांचा बहुमोल विचार गरीब जनतेत रुजविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आपल्या हिंदुस्थानले एक मोठा डाग आहे. तो डाग धुवून काढायचा प्रयत्न करा.

तो डाग कोणता?

शिवाशिव!

हिंदुस्थानले शिवाशिवीचा डाग आहे. विलायतेत, रशियात, चीन, अमेरिका इ. देशात शिवाशिव नाही. हे सुद्धा बाबांना सांगावे लागले. पण हे जग बदलण्यासाठी त्यांनी किती शब्दांची आटापिटी करावी. ते म्हणत?

'तांब्या बाटते की नाही?'

होय!

'त्याला शुद्ध करता कां नाही? कसा शुद्ध करता? तांब्याला हात लागला. इस्त्यान भाजून शुद्ध करता!'

'माणूस बाटते कां नाही?'

होय!

'मग त्याले साल्याच्या अंगावर गवत टाका. अन् द्या आगपेटी लावून, पेटू द्या!'

म्हणून शिवाशिव काढा. सरळ शहाणे व्हा. या शिवाशिविन हिंदुस्थानचा घात झाला असा बाबा उपदेश करीत.

अशाप्रकारे बाबांच्या कीर्तनाचा घाट होता. अखेरच्या क्षणी केलेल्या या कीर्तनात बाबांनी अंधश्रद्धा, देव, पूजा, दारु, अस्पृश्यता, धर्मांधता, तीर्थयात्रा, संतत्व, मानवता, शिक्षण इ. अनेक गोष्टींवर उपदेश केला. या कीर्तनातून बाबांच्या अनेक गुणांचा जनतेला प्रत्यय येतो.

महाराष्ट्र भूमीने एक समाजपरायण संत गाडगेबाबांच्या रुपाने दिला. आपल्या स्वतःच्या आगळया कीर्तनशैलीने संपूर्ण समाजजीवन उजळून टाकण्याचे सामर्थ्य त्यांच्या कीर्तनातून जाणवते.

बाबांच्या कार्याचे प्रमुख माध्यम म्हणजे कीर्तन; ते त्यांनी लोकाभिमुख करून स्वतःचे तंत्र निर्माण केले. लोकभाषा सोडली नाही. स्वभाषा स्वीकारून कीर्तनात मराठीचे वऱ्हाडीपण त्यांनी प्रेमाने जपून ठेवले. भक्तिहीन लोककथा कीर्तनातून सांगून लोकांना सन्मार्ग दाखविला. त्यांची ही कीर्तनशैली पाहिली की त्यांच्या बंडखोर वृत्तीचा प्रत्यय येतो आणि हीच वृत्ती त्यांनी शेवटपर्यंत लोकशिक्षणाची गुरुकिल्ली म्हणून प्रचारात आणली; व तत्कालीन संतपरंपरेला तडा दिला. म्हणूनच समाजातील भोंदुगिरी कमी होण्यामागे त्यांच्या कीर्तनशैलीचे मूल्यमापन करावेच लागते.

ह्या कीर्तनाच्या शेवटी ते म्हणाले की, 'आज बांद्रयांच्या मंडळीचं मले दर्शन झालं. आता माझी ही शेवटची भेट आहे. माझे मरण माझे पुढे उभे आहे. कीर्तन आटोपलं. मी बोलता बोलता चुकलो अशीन तर माझ्या चुकीची क्षमा करून जा, आज आनंद केला. पोलीस मंडळी माझे गुरू आहेत. पडलो असतो पण माझ्या मुखानं देवाचे नांव घ्यायला लावलं.' मुंबईत जाहीरपणे केलेले हे बाबांचे शेवटचे कीर्तन ठरले.

प्रकृतीकडे फारसे लक्ष न देता बाबांनी कामे उरकणे चालूच ठेवले. कदाचित त्यांना मरणाची चाहूल लागली असावी.

कार्तिकी एकादशीस पंढरपूरच्या यात्रेसाठी बाबांनी यावे असा आग्रह झाला तेव्हा १३ सप्टे. १९५६ ला बाबा पंढरपुरास पोहचले. बाबा आल्याची

वार्ता पंढरपुरात कळताच भक्तांची दर्शनासाठी गर्दी होऊ लागली. पहाटेपासून बाबा लोकांपासून बाजूला होऊन सफाई करू लागले. नंतर भजनाचा गजर झाला. बाबांचे करुणाख्यान दिवसभर अखंडपणे सुरू होते.

मराठा धर्मशाळेच्या पुढील पटांगणात रात्री नऊ वाजता बाबांचे करुणाख्यान सुरू झाले. नेहमीप्रमाणे जन्मभर अंगिकारलेल्या तत्वज्ञानाचा पाठपुरावा बाबांनी याही ठिकाणी केला. मंत्रमुग्ध होऊन श्रद्धाळूंनी त्याचा आस्वाद घेतला. प्रश्नोत्तरांची झड झाली. व्यसन सोडण्याच्या शपथा झाल्या. त्या दिवशी बाबांचे अंगी जणू भीमाचे बळ संचारले होते.

करुणाख्यान आटोपले. रात्रीचे बारा वाजले. बाबा म्हणाले -

आम्ही जातो आमुच्या गांवा
आमुचा रामराम घ्यावा,
आता कैचे येणे जाणे
सहज खुंटले बोलणे ।।

बाबांचे खरे होते. कीर्तनाचा शेवट झाला होता. अंगात त्राण उरलेले नव्हते. जन्मभर केलेल्या जनताजनार्दनाच्या सेवेचा कल्लोळ दाटून येत होता. बाबा बोलता-बोलता थांबले. लोकांना हात जोडून नम्रपणे उभे राहिले.

जनतेला अभिवादन करून आशीर्वाद मागितला व रात्री आराम केला.

गाडगेबाबांचे बोलणे संपले. त्यानंतर नियतीने त्यांना कीर्तनातून उपदेश करण्याची संधी दिली नाही.

काळाचा महिमा अगाध होता. बाबांचे सेवाव्रती जीवन ऋणमोचनपासून सुरू झाले असले तरी सार्वजनिक जीवनाची खरी सुरुवात त्यांनी पंढरपूरपासून केली आणि जन्मभर अंगिकारलेल्या व्रताचा अखेरही पांडुरंगाच्या साक्षीने पंढरपूरलाच झाला.

●●●

# अठरा

# गोरक्षणाची मोहीम

भारतीय संस्कृतीने गोमाता म्हणून गायीचा गौरव केला. आबालवृद्धांना तिच्या दुधापासून जीवनदान मिळाले. तिच्यापासून मिळणाऱ्या बैलांचा शेतीसाठी मोठ्या प्रमाणात उपयोग होतो.

गाई-बैलांच्या भरवश्यावर उदरनिर्वाह केल्यावर म्हातारे झाले की त्यांना कसायाकडे नेऊन विकण्याची प्रथा होती, काही प्रमाणात आजही आढळते. शेतावर राबत असताना बाबांचा गाईगुराशी संपर्क आला. एवढेच नव्हे तर त्यांनीं लहानपणी गुराख्याचे काम केलेले होते. गाई गोठ्यातून सोडण्यापासून तर त्यांची आंघोळ, चारा पाणी बाबा करीत. शेतीवर बैलाकरवी काम घेताना ते त्यांना मायेने जपत असत. म्हणूनच मुक्या प्राण्याबद्दल त्यांना पूर्वीपासून सहानुभूती होती.

म्हाताऱ्या गुरांना कसाईखान्याकडे जाताना पाहून त्यांचा जीव तुटत असे. शंकरपटात शर्यतीत बैलांना पराण्या टोचून हाकण्याच्या कृतीलाही ते विरोध करीत.

कीर्तनात तुकाराम महाराजांचा दाखला देऊन बाबा म्हणत,

भूतदया गाई पशूंचे पालन

तान्हेल्या जीवा वनामाजी

गाय दूध देते, शेतीसाठी गोऱ्हे बैल देते. खतासाठी शेण देते. उद्या गाईने गोऱ्हे दिले नाहीतर शेती करताना, नांगराला, बैलगाडीला स्वतःला जुंपाल काय? असा त्यांचा रोकडा सवाल होता.

बाबांच्या लग्नानंतर झालेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी हंबीररावांनी म्हातारा बैल कसायाला विकायला काढला तेव्हा बाबांनी त्याला व मामाला जोरदार विरोध करून बैल खुंटावरच मरू दिला पण कसायास विकू दिलेला नव्हता. याउलट 'मलाच कसायास कां विकत नाहीत' असे उत्तर द्यायला कमी केले नाही.

आई-बाप म्हातारे झाले की त्यांना तुम्ही बाजारात उभे करता काय? म्हणून बाबा म्हणत,

'धिक तो दुर्जन नाही भूतदया।

व्यर्थ माय त्या प्रसवली।।'

अशा चांडाळाला जन्म देण्याऐवजी त्याची आई दगड प्रसवली असती तरी बरे!

अरे एवढे तुमचे मन कठीण की बिचाऱ्याना उपाशी पोटी बाजारात उभे करता? स्वतः मात्र दोन चारदा भजे खाता?

बाबा म्हणत, "ते गाई बैल तुमाले काय आशीर्वाद देत असतील? "उद्या त्याले हे पाप भोगावं लागत - त्याच्या बापालेही चुकणार नाही!"

अशा तळमळीने ते बोलायला लागले की शेतकरी म्हातारी गुरे विकायला मागे पुढे पहात. पण शेतकऱ्यांनी तरी अशा गुरांचे काय करावे? हा प्रश्न होता.

म्हाताऱ्या गुरांची व्यवस्था हा बिकट प्रश्न होता. बाबाचे मन विचार करू लागले आणि त्यांच्या मनात गोरक्षण संस्था उभी करण्याचा विचार घोळू लागला.

बाबांची इच्छा दुर्दम्य होती. ते योग्य जागेच्या शोधात होते. शेवटी इच्छा तेथे मार्ग सापडला.

मूर्तिजापूरला नानासाहेब जमादार नावाचे एक श्रीमंत गृहस्थ होते. कसाई बाजाराला लागूनच त्यांची भरपूर शेती होती. ते स्वभावाने सालस व दानशूर वृत्तीचे होते. गाडगेबाबांशी त्यांचा थोडाफार परिचय होता. नानासाहेबांना बाबांच्या कार्याची प्रचिती व तळमळ माहित होती. अनाथ गुरांच्या संस्थेसाठी कार्य करण्याची इच्छा बोलून दाखविताच नानासाहेबांनी बाजाराला लागून असलेली छपन्न एकर शेती देण्याचे कबूल केले. योजना आखून कामाला सुरवात झाली आणि बाबांच्या प्रेरणेने नानासाहेबाच्या देखरेखीखाली मूर्तिजापूरला पहिली गोरक्षण संस्था आकार घेऊ लागली.

या संदर्भात नवी नवी कामं उभी राहिली. ती करण्यासाठी माणसंही मिळू लागली. म्हाताऱ्या गुरांना लोक गोरक्षणात आणून सोडू लागले. त्यासोबत चारापाणी, कुटार कडबाही आणून देऊ लागले.

कसायाचा रोष बाबांना पचवावा लागला. पण जनतेच्या दृष्टीने एका नवीन कामाची सुरवात करून बाबांनी त्यांना वाईटापासून परावृत्त केले. भूतदयेचा हा उत्कृष्ट नमूना होता.

यानंतर अशा गोरक्षण संस्था गावोगांव उभ्या होऊ लागल्या.

सातपुड्याच्या पर्वतराजीत नागरवाडी नावाचे गाव वसलेले आहे. सभोवताल डोंगररांगा आणि झऱ्यांची झुळझुळ असून कुरणासाठी भरपूर मोकळेरान असल्याने बाबांनी नागरवाडीची गोरक्षणासाठी निवड केली.

नागरवाडी एक निसर्गरम्य लहानसे खेडे . तिथला डोंगर, झाडीझुडपे आणि गावठाणापर्यंत पसरलेले रान पाहून बाबा संतुष्ट झाले. गावात एक पडकी विहीर होती व जवळूनच लहानसा ओढा वाहत होता. हे सर्व पाहून त्यांनी गोरक्षणासाठी नागरवाडीची त्वरित निवड केली.

गोरक्षणात रात्रंदिवस पहारा ठेवण्यात आला. कर्मचारी नियुक्त झाले. नागरवाडीच्या प्रसन्न वातावरणात लवकरच गुरं ताजीतवानी दिसू लागली.

या नागरवाडीवर बाबांचे निरातिशय प्रेम होते. त्यांची पूर्ण हयात दगदग व त्रासात गेलेली. त्यामुळे निवांतपणे मिळणाऱ्या एकांतासाठी बाबा नागरवाडीस येत. शेवटच्या क्षणी बाबा मुंबईला दवाखान्यात भरती असताना त्यांनी सर्व अनुयायांना नागरवाडीस नेण्यासंबंधी सूचना केली होती. यावरून त्यांचे या गावावर किती प्रेम होते हे दिसून येते.

गाडगेबाबाच्या प्रेरणेनेच त्यांचे अनुयायी श्री धोंगडेबुवानी खानदेशात शेंगोळे आणि अकोला जिल्ह्यातील मोरगाव येथे गोरक्षण सुरु केले.

महाराष्ट्रात अशी अनेक गोरक्षणे बाबांच्या आशीर्वादाने उभी ठाकली. मानवाप्रमाणेच म्हाताऱ्या मुक्या गुरांचा सांभाळ व जपणूक करून त्यांच्यावर प्रेम करण्याचे हे अभिनव तंत्र बाबांनी सुरू केले.

भूतदया ही बाबांची शिकवण, तर गोरक्षण ही त्या कार्याची पावती होती.

गोसेवेच्या बाबतीत गाडगेमहाराज कमालीचे प्रायोगिक होते. १९५० साली प्रयागला कुंभमेळा भरला. तेव्हा बाबा आपल्या साथीदारांसह उपस्थित होते. दररोज यात्रेचे मैदान झाडून स्वच्छ करणे व गंगेचा केरकचरा काढून ते यात्रेकरूंची व्यवस्था राखत असत. रात्री दोन तीन दिवस सातत्याने त्यांचे कीर्तन झाले. त्यांच्या भजन कीर्तनाची आगळीवेगळी पद्धत पाहून उत्तरेतील लोकांनाही गोडी वाटू लागली.

कुंभमेळयात एक दिवस राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय साधू समाजाची सभा झाली. भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेले महामंडलेश्वर व्यासपीठावर विराजमान झाले. साधू फार मोठ्या संख्येने उपस्थित होते. गाडगेबाबांना आग्रह होऊनही ते श्रोत्यामध्ये खाली बसून राहिले. गोमातेचा महिमा पटवून देणारे एकेक व्याख्यान सुरू झाले. सर्व साधूंनी गोरक्षणाचा सल्ला दिला व उपाय सांगितला. महामंडलेश्वर श्री प्रभुदत्त ब्रह्मचारी व तुकडोजी महाराजांनी बाबांना दोन शब्द बोलण्याचा आग्रह केला. बाबा सावकाश व्यासपीठाजवळ गेले आणि खालीच उभे राहून हिंदीमध्ये आपले गोरक्षणाच्या संबंधातील विचार व्यक्त केले. ते म्हणाले, "हे साधुसंतांनो आपल्या चरणांशी गाडगेबाबांची विनंती आहे की, आपण सर्वांनी गाई पाळून त्यांचेसाठी गोठे तयार करावे. गोसेवा करावी." बोलणी व करणी यातील अंतर साधूंच्या बाबतीतही त्यांना प्रत्ययास आले. सारा साधू समाज मंत्रमुग्धपणे ऐकत होता. शेवटी बाबा म्हणाले, "फिर मै अकेला सारा हिंदुस्थान घुमकर कसाई के हाथसे गौए छुडाकर आपके पास ला दुंगा।"

बाबांच्या विचारांनी सारा साधू समाज विचारात पडला; प्रभावित झाला. पण जेव्हा श्री प्रभूदत्तजी महाराजांनी या उपक्रमासाठी नावे घ्यायला सुरवात केली तेव्हा गोरक्षणावर, गोसेवेवर कंठशोष करणारे साधुमुनी एकेक करून उठून जाऊ लागले. साधू समाजांचा खरा हेतू लक्षात येताच बाबा तिथून हळूच बाहेर पडले; हातात झाडू घेऊन गंगेचा घाट साफ करायला लागले.

गोरक्षणाच्या बाबतीत बाबा कळवळून कार्य करीत. कारण लहानपणापासून त्यांचा गाईगुरांशी संबंध आलेला होता. गाईरानातून आणून त्यांची शुश्रृषा करणे, धुवून पुसून त्यांचा चारापाणी ते पहात असत. म्हणूनच बैलांना शेतीसाठी मरेस्तोवर राबवून म्हातारे होताच त्यांना निरुपयोगी समजून कसायाला विकणे त्यांना अजिबात आवडत नसे. त्यासाठी गोरक्षण संस्था उघडून त्यांनी पशूंचे वृद्धाश्रम सुरु केले.

गोरक्षणाच्या माध्यमातून बाबांनी गाईबैलांची केलेली सेवा अवर्णनीय आहे. एका निरक्षरांनी दाखविलेली भूतदया हा जिवंत जीवनानुभव आहे.

मूर्तिजापूरच्या गोरक्षणानंतर लोकांमध्ये जागृती आली. काही शेतकरी आपली वृद्ध गुरे गोरक्षणात आणून ठेवू लागली. सोबतच चारा, पानी, कडबा, कुटार येऊ लागला. अनेक दानशूर लोकांनी बाबांच्या गोरक्षण मोहिमेला प्रत्यक्ष मदत पुरविली, पैसा पुरविला. मुक्या प्राण्यांच्या सेवेत त्यामुळे कुठेही खंड पडला नाही. गावोगावी असे गोरक्षण बाबांच्या प्रेरणेने उभे राहिले.

●●●

# एकोणिस

# धर्मशाळा

गांडगेबाबा खरे कर्मयोगी होते. एखादे काम हातावेगळे झाले की लगेच दुसऱ्या कामात स्वतःला झोकून घेत असत. स्वस्थ बसणे हा त्यांचा स्वभावच नव्हता. त्यामुळेच कितीतरी लोकोत्तर कार्ये त्यांनी तडीस नेले.

नाशिक नगरपालिकेचे काही सदस्य पंढरपूरला गेले असताना त्यांनी मराठा धर्मशाळेत बाबांची भेट घेऊन नाशिकला धर्मशाळा उभारण्याची विनंती करून मदतीचे पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

नाशिकला कुंभमेळयाच्या प्रसंगी लोकांची होणारी प्रचंड गैरसोय बाबांनी पाहिली होती.

बाबा नाशिकला गेले. गोदावरी तीरावर 'हनुमानगढी' म्हणून उपेक्षित जागा होती ती धर्मशाळेसाठी निश्चित केली. कार्यकर्त्यांना घेऊन ते जागा साफ करायला लागले तेव्हा तेथील निवडुंगात दडी मारून बसलेले साप त्यांना बाहेर काढावे लागले. टेकाड भाग सपाट करून घेतला. रेषा आखून आराखडा तयार केला. कामाला सुरवात झाली. निवडुंगाच्या बनात अशी ईमारत आकार घेताना पाहून लोकांना नवल वाटे. बाबांच्या पुण्याईने इमारतीचे काम जोरात सुरु होते.

गोरगरीब, यात्रेकरू आणि पांथस्थांना निवारा मिळणार होता म्हणूनच मजूर खपत होते. एक दिवस त्याबाजूने नाशिकचे तत्कालीन जिल्हाधिकारी मि.पेरी जात होते, त्यानी हा लवाजमा पाहिला, प्रभावित होऊन बाबांच्या विनंतीवरून त्यांनी त्याजागेचा पूर्ण कर माफ केला.

यथावकाश एका उत्तम धर्मशाळेने आकार घेतला. नाशिकच्या धर्मशाळेत काम करणाऱ्या मंडळीसाठी बाबांनी नियम करून दिले. त्यावरून त्यांच्या दूरदर्शीपणाची ओळख होते.

१) सर्वांनी पहाटे पाच वाजता उठून अंथरुण व्यवस्थित गुंडाळून

बांधून ठेवावे. आपल्या कामाला लागावे. आपली कामे वेळच्या वेळी नीट करावी.

२) कामाशिवाय धर्मशाळा सोडून कोणी बाहेर जावू नये.

३) धर्मशाळेतील सेवकास कोणतेही व्यसन नसावे.

४) सर्वांचे जेवण्याकरिता स्वयंपाकाचे पदार्थ एक असावेत.

५) येथील सामान्य सेवकाने आपले आप्तेष्ट, मित्र यांचा जमाव जमवू नये. कोणाचे नातेवाईक आल्यास त्यांचा जेवणाचा मान फक्त एक दिवसाचा. नंतर त्यांनी आपली सोय बाहेर करावी.

६) कोणत्याही यात्रेकरूने जेवावयास बोलाविले तरी कोणी जाऊ नये.

७) कोणाकडून काहीही सामान उधार आणू नये. देणाऱ्यांनी ते देऊ नये दिल्यास संस्था जबाबदार राहणार नाही.

८) यात्रेकरुंजवळ कोणत्याही सबबीवर पै-पैसा मागू नये. देणाऱ्यांनी तो देऊ नये.

९) कीर्तनकार, अनुयायी यांना संस्थेत जेवण मिळणार नाही. त्यांनी बाहेरून जेवण करून यावे. धर्मशाळेत फक्त एक दिवस झोपावे.

१०) मॅनेजर, ट्रस्टी यांनी खाजगी कामे कोणाही सामान्य सेवकाकडून करून घेण्यकरिता आपला अधिकार वापरू नये.

बाबांनी असे कठोर नियम करून त्याच्या पालनाची दक्षताही घेतली, असे नियम नंतर त्यांनी प्रत्येक धर्मशाळेतही केले व नियमपालनात हयगय केली नाही.

नाशिकला यशवंतराव भंडारी ट्रस्टी असून ते धर्मशाळेची संपूर्ण व्यवस्था पहात. एकदा त्यांना पत्रात बाबा लिहितात की, 'मागे आलो होतो. हो ला हो अशीच साफसफाई आहे. तरी साफसफाईबाबत चांगली काळजी घ्यावी. येणाऱ्या जाणाऱ्या पॅसेंजरचा चांगला आदर करावा. त्यांचेशी सर्वच सेवक मंडळींनी प्रेमाने आणि आदराने वागावे."

ज्ञानेश्वरांची समाधी असलेल्या श्री क्षेत्र आळंदीला ज्येष्ठामध्ये ज्ञानदेवाची पालखी आळंदीहून निघते, तेव्हा व इतरही वेळेस यात्रेकरू व भाविकांनी आळंदी फुललेली असते. अलंकापुरीला एखादी धर्मशाळा असावी असे बाबांच्या मनात आले. रत्नागिरीच्या पतितपावन मंदिराच्या उद्घाटन प्रसंगी भागोजी कीर नावाच्या दानशूर व्यक्तीशी बाबांची ओळख झाली. होती. त्यांचेजवळ बाबांनी आपली इच्छा बोलून दाखविली. दोघेही आळंदीस आले. जागेची पाहणी करून बाबांनी भगोजी कीर यांना काही महत्त्वाच्या सूचना केल्या. त्याप्रमाणे संपूर्ण धर्मशाळा श्री.कीर यांनी बांधून दिली. याशिवाय वर्षाकाठी दोन हजार रुपयाची मदत ते करू लागले. ज्ञानदेवांची पालखी धर्मशाळेवरून जाई. ती निघाली की वारकऱ्यांसाठी बाबा पिठले भाकर तयार ठेवीत आणि प्रत्येकाला ओळीने मिळेल याची व्यवस्था करीत. अशाप्रकारे आळंदीला गाडगेमहाराज धर्मशाळा उभी राहिली.

आळंदीजवळच तुकारामाची जन्मभूमी देहू हे लहानसे गाव आहे. गाडगेमहाराजांच्या व्यक्तित्वात तुकोबांचे बरेच गुणधर्म आढळून येतात. बाबांच्या बाबतीत "तुकाराम अवतार रजकाच्या वंशी" असे म्हटले जाई. तुकोबांच्या अभंगाचा उपयोग बरेचदा बाबा कीर्तनात करीत आणि "तुकोबाराया म्हणत" असा शब्दप्रयोग करून अभंगाचा दाखला देत.

देहूस इंद्रायणीचे स्नान, तुकोबांच्या घराचे दर्शन, मंदिर, भंडाराटेकडी असा दर्शनाचा लाभ घेणाऱ्या भक्तांना तुकोबाची अभंगगाथा कोरडीच बाहेर काढणाऱ्या इंद्रायणीचे कुतूहल असे, म्हणून शुद्ध एकादशीस वारकरी गोळा होत. दरवर्षी बिजेची यात्रा करून भक्त देहूस येत. यात्रेकरूंची देहूला फारशी गर्दी होत नसली तरी भाविकांची निवास व्यवस्था व्हावी यासाठी बाबांनी देहूला धर्मशाळा बांधणे फारच जिकरीचे काम होते. कारण दगडाचा खच फोडून ती रचून व्यवस्थित बांधावी लागत. भंडारा डोंगरावर पश्चिमेकडील उतरणीवर असणाऱ्या लेण्यासमोर बाबांच्या आज्ञेने राजारामबुवा वैशंपायन यांनी भाविकासाठी एक पत्र्यांची सपरी उभी करून ठेवली. डोंगरावर सर्व सामान वर चढविणे फार जिकीरीचे काम होते. पण बाबांच्या शूर अनुयायांनी ते काम सहज करून धर्मशाळा उभी केली.

पुणे महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असल्याने शासकीय किंवा अन्य कामासाठी येणाऱ्या गोरगरीब लोकांसाठी बाबांनी पुणे येथे धर्मशाळा बांधण्याचे ठरविले. पंढरपूर धर्मशाळेचे व्यवस्थापक श्री चिपळूणकर यांच्या विनंतीवरून बाबांनी, सोमवार पेठेतील गोसाव्याच्या स्मशानाजवळ आकूल नावाच्या निवृत्त पोलीस अधिकाऱ्यांची मोकळी जागा होती त्यावर धर्मशाळा बांधण्याचे ठरविले. आकूल यांच्याकडे पैसाही भरपूर होता. हळूवार कामाला सुरवात झाला आणि काही दिवसातच धर्मशाळेचे बांधकाम पूर्ण होऊन गोरगरीब, विद्यार्थी व रुग्णाचे नातलग यांचे सेवेत आकूल धर्मशाळा रुजू झाली.

पुण्यापेक्षा मुंबईत गोरगरिबांचे हाल अधिक होत असत. मुंबई हे एक औद्योगिक शहर असल्याने गरिबांना पोटाची काळजी अधिक असे. आजारपणात त्यांना दैववादीच व्हावे लागे. जे.जे. रुग्णालयात हजारो देशविदेशीचे रोगी उपचारासाठी येत. त्यांच्या नातेवाईकांच्या राहण्याची सोय व्हावी यासाठी हॉस्पिटला लागूनच असलेल्या मोकळ्या जागेत, पारशी ट्रस्टच्या संमतीने बाबांनी धर्मशाळेचे बांधकाम सुरू केले. कार्यालयीन सर्व शासकीय अडचणीत बाबांना तत्कालीन मुख्यमंत्री श्री खेर, आरोग्यमंत्री डॉ. गिल्डर व बांधकाम मंत्री मालोजीराव निंबाळकर यांनी मोलाचे सहकार्य केले व भूमिदानातील अडचणी दूर केल्या. दानशूर व्यक्तींनी पैशांची मदत केली. असंख्य अडचणीवर मात करीत जे. जे. रुग्णालयाजवळ धर्मशाळा डौलाने उभी झाली. रुग्णाच्या नातलगांना लागणारी भांडीकुंडी धर्मशाळेत उपलब्ध होऊ लागल्याने गोरगरिबाचे ते एक भरवश्याचे विश्रामस्थळ झाले.

बाबांचा धर्मशाळा बांधण्याचा उपक्रम सुरूच राहिला. आळंदीस पुन्हा एक धर्मशाळा त्यांनी उभी केली. नागपूरलाही एखादी धर्मशाळा असावी ही त्यांची इच्छा होती ती पूर्णत्वास जाऊ शकली नाही तरीपण मेडिकल चौकात रुग्णांच्या नातेवाईकांसाठी बाबांच्या प्रेरणेने त्यांच्या पश्चात 'गाडगेबाबा धर्मशाळा' उभी झाली.

अशाप्रकारे जनसेवेचे कांकण बांधून बाबांनी गोरगरिंबासाठी धर्मशाळा उभ्या केल्या.

तीर्थस्थळी भाविकांची गर्दी अधिक तशीच भिकाऱ्यांची संख्याही फार असे. भाविकांच्या धार्मिक भावनांना हात घालून यात्रेकरूंकडून मागून खाणारे भिकारीही मोठ्या प्रमाणात असत. भ्रमंती काळात बाबांनी अपंग, आंधळे, महारोगी, निराधार लोकांना जनतेच्या दातृत्व भावनेला जागृत करताना पाहिले. अशा लोकांना अन्न, वस्त्र, निवारा देण्याचे कार्य बाबांनी केले. सुरवात नाशिक क्षेत्रापासून करून गोरगरीबांना अन्न वाटप करण्यात यावे यासाठी सदावर्त सुरू केले.

"दया करणे जे पुत्रांसी। तेचि दांसा आणि दासी"

असा तुकारामाचा दाखला देऊन लोकांची दातृत्व भावना ते जागृत करीत. काही मंडळींनी मासिक वर्गणी पाठविली. यातून अन्न छत्र सुरू झाले.

बाबा कर्तव्य कठोर होते. पंक्तीत कोणी धडधाकडट दिसला तर त्याला बखोटीला धरून उठवायला ते कमी करीत नसत. फुकटचे खाण्याऐवजी त्याला श्रमाचे मोल पटवून देत.

नाशिकप्रमाणेच बाबांनी आळंदीलाही अन्नवाटप सुरू केले. आळंदीहून पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांना बीजेच्या दिवशी बाबा स्वतः उपस्थित राहून झुणका भाकर देत असत - तसेच वलगांव मार्गावर जगुभाई पटेलाच्या बंगल्यात अमरावतीकरांच्या साह्याने त्यांनी आंधळयापांगळयासाठी सदावर्त सुरू केले होते.

बाबांच्या प्रेरणेने अनेक सप्ताह सुरू झाले. त्यात गोरगरिबांना अन्न वाटप होऊ लागले. ऋणमोचनच्या यात्रेतही सदावर्त होत . पंढरपुरातही बाबांनी अन्नछत्र सुरु केले. सातारा, नगर इ. शहरातील सप्ताहात शेवटच्या दिवशी बाबांचे कीर्तन व हजारो लोकांना अन्नदान होत असे. अशाप्रकारे लक्षावधी भुकेल्यांना अन्नदान करून बाबांनी सदावर्ताची सुरुवात केली.

त्यांनी एवढे सदावर्त चालविले, गोरगरीबांना, गोडधोड खाऊ घातले पण स्वतः मात्र त्यातील अन्नाला हात न लावता भीक्षा मागून भाजी भाकरी हातावर घेऊनच खाल्ली.

श्री बाबाचे जीवन म्हणजे प्रत्यक्ष अनुभवांची खाण होती. आईबाप म्हातारे झाले की मुलाबाळांकडून त्यांची आबाळ होत असे हे पाहून ते गहिवरले. इंग्रजी संस्कृतीच्या प्रभावाने व विभक्त कुटुंब पद्धतीच्या आसक्तीने घरातील म्हाताऱ्यांना बाहेर काढण्याचे कितीतरी प्रकार बाबांनी पाहिले, अनुभवले. विशेषतः तीर्थक्षेत्री अशा निराधार वृद्धांची संख्या भरपूर असे. त्यांना कोणाच्यातरी सेवेची गरज असतानाचेवेळी घरा बाहेरची वाट दाखविली जाई. अशा कित्येक निराधार वृद्धमंडळीची आसवे पुसायला बाबा धडपडले आणि त्यासाठी पंढरपुरला वृद्धाश्रम स्थापन केले. घरच्या प्रेमाला वंचित झालेल्या म्हाताऱ्यांना तेथे सन्मानाने वागविले जाई. त्यांची अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता करण्याबरोबरच औषधपाणी होऊ लागले. त्यात रोगी, महारोगी, असत. बाबा व त्यांच्या अनुयायांनी अशा लोकांचे पुनर्वसन वृद्धाश्रमात केले.

समाजातील दुःख पाहून बाबा हळहळत, दीन दलितांचा हा महान कैवारी आबालवृद्धांच्या सेवेचे व्रत घेऊनच जन्माला आलेला देवदूत होता.

वृद्धाश्रमाबरोबरच एखादे कुष्टधाम काढण्याचीही त्यांची योजना होती. कुष्ठरोग्यांचे दुःख पाहून बाबांना वाईट वाटत असले तरी त्यांची ही योजना मात्र पूर्णत्वास जाऊ शकली नाही याचे त्यांना दुःख होते. पण वृद्धाश्रमातून अशा कुष्ठरोग्यांचीही त्यांनी मनोभावे सेवा करून उपेक्षितांचे अंतरंग ओळखले.

**भूतदया -**

जीवदयेबरोबरच भूतदया अंगिकरून गाडगेबाबांनी गोसेवा केली. अपेयपान, मांसाहार, अन्य रुढीविरुद्ध कीर्तनातून प्रचार करीत असताना मुक्या जीवाची हत्या त्यांनी थांबविली. पशुबळी थांबवून परमेश्वराच्या नावाने अवैध स्तोम बंद केले.

गाय ही लहान लेकरांसाठी आईच. धर्मशास्त्रानेही गायीला पवित्र मानले. पशुहत्या त्यांना पहावेना म्हणून त्यांनी गोहत्या बंदीसाठी मोहीम राबविली.

गायत्री विकोनी पोट जे जाळिती
तया अधोगती नर्कवास।।
हा त्यांचा रोकडा सवाल होता.

गोसेवेसाठी त्यांनी मूर्तिजापूर नागरवाडीसारखे मोठे गोरक्षण उभे केले. कसायाकडे जाणाऱ्या गाईंना त्यांच्या तावडीतून सोडविले. गाई पाळणाऱ्याने म्हातारी गाय कसायास विकली तर ते "गाय कसायास देती त्यांच्या संसाराची माती" असा उपदेश करीत.

मूर्तिजापूरला फिरत असताना एका गरजू शेतकऱ्याने कसायाला गाय विकल्याचे बाबांना लक्षात आले, त्याकडे घरी औषधपाण्याला पैसे नव्हते. बाबांनी वर्गणी गोळा केली. कसायाकडून गाय सोडवून दिली.

'देवकीनंदन गोपाला' हा बाबांचा मंत्र. देवकीमातेची सतत आठवण ठेवणारा कृष्ण त्यांना गोपालस्वरूप वाटला. गोरक्षण, गोसेवा करणारा गोपाल. बाबांनी गोरक्षण काढून कसायाकडे जाणाऱ्या गाई अडवल्या. गोहत्या थांबविली, त्या गाईचे संवर्धन करून आपणही 'गोपालकृष्ण' आहोत हे सिद्ध केले.

कोणत्याही योग्य गोष्टीची सुरुवात घरापासून करावी लागते. संपूर्ण जीवनात यज्ञ, जप, योग, देवदर्शन करताना बाबा कोणाला दिसले नाहीत.

मुलीच्या बारशाचा आनंद व्यक्त करण्यासाठी नातलगाचा आग्रह त्यांनी मोडून काढला. गोडधोडाचे जेवण,मटनाचे जेवण, यांना विरोध केला. रुढीपरंपरा थांबविली. घरच्यांनीही देवीचा कोप होईल असे म्हटले पण वाईट रुढी तोडण्याचे व्रत घेतलेले बाबा कोणाच्याही विरोधाला बधले नाहीत.

गोहत्या बंद केली. गोशाला, गोरक्षण काढून निरपराध प्राण्यांची हत्या थांबविली. बाबांनी हिंसाबंदीसाठी अनेक प्रयोग केले.

कीर्तनातून ते वारकऱ्यांना म्हणत, 'बकरा कापता? मग त्याच्या बरोबर मलेही कापा?" बाबांचा रोखठोक प्रश्न पाहून कोण हिंमत करेल? सातारा, नगर, अमरावती, नागपूर जिल्ह्यात बाबांनी पशुबळी थांबवून परंपरेला विरोध केला.

बाबा म्हणत, "जिभेला सांग, शेण खा ! मंग ते खाते का पहा. जीभ म्हणेल की मला कोंबडीच पाहिजे तर ती कापून टाका बकरा कापल्यासारखी. काय होते त्याचा अनुभव घ्या. अरेरे या दगडांच्या देवाच्या मागे लागून आपण आपला खाना खराब केला."

"देवानं कधी कोणाला मागितले कां? अरे जो देतच आला. जो दयाळू म्हणून तुम्ही त्याला मागता तो त्याचा मोबदला कसा घेईल, देवाला बदनाम करू नका. देवाचे सत्यस्वरूप ओळखून त्याचे भजन करा." असा त्यांचा उपदेश असे.

पशूहत्याविरोध करून त्यांनी जीवनभर भूतदया जोपासली. लुळया पांगळयासाठी धर्मशाळा काढून मानवधर्म जोपासला. जगन्नाथ ठाकूर नावाच्या बाबांच्या अनुयायाचा अनुभव बोलका आहे. बाबांना ऋणमोचनला जायचे होते. रामनाथशेठ बियाणींनी मोटारने सोडून देण्याचा केलेला आग्रह मान्य न करता बाबा रेल्वेने निघाले. रात्री १०.३० वा. कुरुम स्टेशनवर उतरले. पौष महिना असल्याने थंडी भरपूर होती. ऋणमोचनपर्यंत नेण्याविषयी गाडीवाले तयार झाले नाही. अंधार असल्याने बाबांना फारसे कोणी ओळखले नसावे. कसे तरी रात्रीचे बारा वाजता बाबा वाढी नावाचे गावी पोहचले. बाबांना जोरात तहान लागली, त्यांनी एका झोपडीपुढे थांबून हांक मारली. 'चोर' समजून शिवी हासंडत एक बाई बाहेर आली. हातात चिमणीच्या मिणमिणत्या प्रकाशात घरमालकाने पाहिले. बाबांना ओळखले. त्यांना पश्चाताप झाला. स्वतःच्या थोबाडीत ती बाई मारून घेऊ लागली. बाबांनी पाणी मागितले. 'मी मांगगारूडी आहे आपणास पाणी कसे देऊ?" असे तो म्हणाला तेव्हा बाबा म्हणाले, "आपण मानूस आहात. मानसाच्या हातचे पाणी प्यायचे नाहीतर मग जनावरांच्या हातचे प्यावं काय?" असा बाबाचा मानवधर्म होता.

पाणी पिऊन बाबा वाटेला लागले. त्या माणसाला घेऊन एका दिवाणजीकडे गेले. गाडी मागवून घेतली. जगन्नाथ ठाकूर थकलेले होते आधीच जाऊन बसले. गाडी सुरू झाली. बाबांनी गड्याकडे विचारणा केली. "बैलांना चारा किती वेळा टाकतोस? गोठ्यात बांधतोस की बाहेर? बैलांचे जीवावरच आपली मजा आहे. दिवसभर बैल मरेतो कामं करतात पण आपण त्यांना कठोरतेने वागवितो. काठीच्या टोकाला खिळा टोचून आरूने मारतो. हे महापाप आहे. देव आमचं कसं बरं करील?"

बाबा त्या गड्याशी बोलत असता काही अंतरावर एक नदी आडवी आली. तिथे गाडी थांबवून बाबांनी गाडीवाल्याला वापस पाठविले पायीच प्रवास सुरू केला. म्हणाले,

"जाऊ द्या गाडी घरी. बैलांना चारापानी करा. अंगावर बारदाना टाका थंडी फार आहे."

पहाटेचे चार वाजले, ते दोघेही चालत होते. तेवढ्यात यात्रेला जाणारी एक गाडी दिसली. बाबा व ठाकूर पुन्हा बैलगाडीत बसले. अंधारामुळे गाडीवाल्याचे बाबांकडे लक्ष नव्हते. बैलांना जोराने हाकण्यासाठी तो पराणी टोचू लागला. काठीने मारू लागला. बाबांना संताप आला. ते गाडीवाल्याला म्हणाले 'कसाई आहात तुम्ही? किती बैलाला मारता? तुमच्या डोक्यावर दोन पायली दळण देऊन मागून कोणी धक्का दिला तर त्याचे अंगावर धावून जाता? आणि मुक्या प्राण्याला खुशाल काठीने बदडता? तुमचं कधी बरं होणार नाही?"

गाडीवाल्याने बाबांना ओळखले. तो वरमला. काठी फेकून देऊन गयावया करू लागला. या दोघांचा परत पायी प्रवास सुरू झाला.

वऱ्हाडातील शंकरपट हा शेतकऱ्यांचा एक सांस्कृतिक कार्यक्रम असतो. पटात बैलांच्या शर्यती लागतात. पराण्या टोचून बैलांना पळविले जाते. रक्तबंबाळ केले जाते. हे सर्व प्रकार पाहून बाबा हळहळत. ते शंकरपटांत कधी गेले नाही. बैलाचे काही शंकरपट त्यांनी बंद करविले. अशी बाबांची भूतदया त्यांच्या जीवनाभूतीचा भाग झालेली होती.

●●●

# वीस

# अंधश्रद्धा निर्मूलन

बाबांनी अंधश्रद्धा निर्मूलनावर जो भर दिला तो प्रबोधनाच्या चळवळीला प्रेरक ठरणारा आहे. एक नवचैतन्यानं भारलेला समाज निर्माण करण्यासाठी त्याच्या अंधश्रद्धाविषयक विचाराचे व आचारांचे चिंतन झाले पाहिजे.

गोदावरी नदीच्या पात्रात पितराना अर्ध्य देताना काही पंडित त्यांना दिसले तेव्हा बाबा नदीत उतरून किनाऱ्यावर पाणी फेकू लागले. पंडितांनी चकीत होऊन विचारले तेव्हा बाबा म्हणाले की, "तुम्ही इथून स्वर्गातल्या पितराना अर्ध्य देता तर मग मीही इथून दापुऱ्याले पाणी पाठवतो. वावरं तरी पिकतीन." सर्व पंडित निरुत्तर झाले.

आज समाज प्रबोधनाची आणि अंधश्रद्धा निर्मूलनाची सुशिक्षित समाजालाही नितांत आवश्यकता आहे. बाबांनी आपल्या खराट्याच्या माध्यमातून कीर्तनातून व्यक्तीधर्म, कुटुंबधर्म, समाजधर्म, राष्ट्रधर्म शिकवला. त्यांच्या प्रकट विचारांचा आचरणात उपयोग केला तरी अंधश्रद्धांना आळा बसू शकतो.

भूतबाधेला मनाचा खेळ मानून पोथ्यांनी व ज्योतिषानी कोणाचे भले झाले नाही. याउलट शिका आणि भोवतीच्या समाजाचे ऋण फेडा असे सांगणारे समाजहितैषी गाडगेबाबा आमच्यासमोर उभे ठाकतात.

गाडगेबाबांची ईश्वरावर श्रद्धा होती. परमेश्वराचे स्मरण व भजन करा, असे ते लोकांना सांगत पण यासाठी नवस, नैवेद्य देण्याची गरज नव्हती, दैव आणि देव याबाबतीतला त्याचा आचार बुद्धिवंताला लाजविणारा आहे. ते ईश्वराचे बाबतीत कर्तृत्ववादी वाटतात पण ग्रंथप्रामाण्य आणि कर्मकांड नाकारतात. मूर्तिपूजेला विरोध करतात.

'जत्रामे फतरा बिठाया', "दगडाचा देव बोलील तो कैचा" असे पुरावे देतात. जग विष्णूमय असेल तर एका विशिष्ट मूर्तीचीच पूजा का करावी असे बाबा विचारीत.

तीर्थयात्रेतील शोषणाचा त्यांना तिटकारा होता. ते म्हणतात, 'अरे तीर्थाला जाता पण तुमचा रामेश्वर देव काई बोलतो कां? तुमी जेवले का नाही याची तरी विचारपूस करते ? अरे तुमच्या देवाले धोतर नाही नेसता येत, नैवेद्य नाही खाता येत, असा कसारे तुमचा देव? 'अशा संवादातून मतपरिवर्तन करणारे गाडगेबाबा हजारो अंधश्रद्धांना चिकित्सेचा प्रकाश देत होते. कर्मकांड पुरोहितशाही आणि देवधर्माच्या विळख्यातून समाज मुक्तीचा लढा ते लढत राहिले. श्राद्ध तेरवी, सण हे गरीबाच्या नाशाचे कारण त्यांनी ओळखून त्यास विरोध केला. पोथीनिष्ठा त्यांनी नाकारली.

मुक्यातही जीव। अंधश्रद्धेचा असूर

दूर सारतो केर। डेबूजी।।-

खोट्यानाट्या देवदेवीना नवस सायास करून त्यांच्या नावावर मुक्या प्राण्याची हत्या करू नका. दारू जुगार वगैरे व्यसनापासून दूर रहा. गंडे धागेदोरे भूतप्रेतावर विश्वास ठेवू नका. वाईट प्रथांवर कडाडून हल्ला करतांना ते म्हणत-

डोईला गाडगे हातामध्ये झाडू

स्वच्छतेने गाडू। अंधश्रद्धा.

गाडगेबाबांचा अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश जनतेपर्यंत पोचवून कुप्रथांना आळा घालणे हीच आमची प्रतिज्ञा असावी.

एकंदरीत भोळयाभाबड्या अशा समाजातील परंपरांगत रुढी व धर्मकल्पनांना तिलांजली देऊन अंधश्रद्धा नाहीशी करणे हा गाडगेबाबाचा खरा धर्म होता.

●●●

# एकविस
# स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठा

गाडगेबाबांना निसर्गतः बलदंड देहयष्टी लाभलेली. तरुणपणी शेतात राबून काळ्या मातीची सेवा करताना जमिनीतून सोने पिकविताना त्यांना भरपूर श्रम करावे लागले. स्वतःची कामे स्वतः करण्याची सवय अगदी लहानपणापासून असल्याने स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठेचा धर्म जोपासला. श्रमाला मोल प्राप्त करून देण्यासाठी त्यांनी हातात खराटा घेऊन स्वच्छता अंगी बाणवली. त्यांच्याबरोबर अनुयायी वर्गही हातात खराटे घेऊन झाडू लागत हा खराट्याचा तांडा एखाद्या गावातून शिरला तर गाव लख्ख होऊन जाई, व पुढे त्या गांवातील मंडळीच रस्ता साफ करू लागत. गावांत गाडगेमहाराज येणार असल्याचे पूर्वनियोजित असले तर श्रमदान करून ग्रामसफाई होत असे. अशाप्रकारे आरोग्यपूर्णश्रमाची प्रतिष्ठा जनतेत रुजविण्याचे त्यांनी कार्य केले.

आपली स्वतःची कामे बाबांनी कोणाकरवी केली नाहीत. करवून घेतली नाहीत. कार्यकर्त्यांनाही स्वावलंबनाबरोबर श्रमाची सवय लावली. कोणासही कोणावर ओझे होऊ दिले नाही व स्वतःही झाले नाहीत.

बाबा मेहनत केल्याशिवाय भाकरी खात नसत. त्यांचेजवळ आळशी लोकांना अजिबात स्थान नव्हते. श्रम करणाऱ्या माणसाची मात्र त्यांनी कधी आबाळ होऊ दिली नाही. म्हणूनच धडधाकट दिसणाऱ्या लोकांना पंगतीतून उठवतांना त्यांना कधीच काही वाटत नसे. उद्योग हे पुरुषार्थाचे लक्षण असून उद्योगी पुरुषालाच परमेश्वर भेटत असतो. उद्योग, कष्ट, अभ्यास, प्रयत्न केल्याशिवाय शिक्षण व संपत्ती मिळत नसल्याने आळस झटकून कष्ट करण्याचे आवाहन बाबा लोकांना करीत असत. स्वतःची उन्नती स्वतः करा, दुसऱ्यांवर विसंबून राहू नका असा त्यांचा संदेश होता. तसेच कर्तव्यकर्म करीत असावे, फळाची आशा धरू नये. कुणाच्याही श्रमावर जगू नये, कष्ट करावे, घाम गाळावा फुकटचे खावू नये, कुणाकडून कसलीही अपेक्षा न बाळगता अनासक्त जीवन जगावे यासाठी स्वावलंबन आणि श्रमाचे महत्व ते लोकांना पटवून सांगत.

## बावीस

# जयाचे मनी लालसा शिक्षणाची

बाबा निरक्षर होते. शिक्षणाचा गंध नसलेल्या बाबांनी संताची शिकवण कशी अनुभवली हा प्रश्न पडतो. पण बाबा जिथे जन्मले तिथे गरिबी होती, दारिद्र्य होते, अज्ञान होते, सावकाराचे पाश होते. शिक्षणाच्या अभावाने अनाचार बोकाळला होता, शोषण व पिळवणुकीची दाहक जाणीव बाबांना झाल्याने त्यांनी जनतेला शिक्षण घेण्याचा उपदेश केला.

जगातील बऱ्याच प्रश्नाचे मूळ शिक्षण असते. न शिकल्याने किती अन्याय सहन करावे लागले याचे चटके बाबांनी भोगले होते. म्हणूनच 'मुलाबाळांना शिकविल्याविना राहू नका' हे त्यांचे सांगणे असे. एखाद्या दारासमोर उभे राहून घरी मुले मुली दिसली की 'शाळेत जातोस' कां अशी आस्थेने चौकशी करीत. 'नाही' उत्तर आले तर आईवडिलांना समजावून सांगत.

बाबा म्हणत " रोगांवर शिक्षण हा एकमेव रामबाण उपाय आहे. अशिक्षित माणसात व जनावरात काही फरक नाही. अशिक्षित, अज्ञानी माणसाला सावकार बुडवतो, सरकारी नोकर दरडावतो, लबाड लोक बडवतात. तुम्हाला स्वाभिमानाने जीवन जगावयाचे असेल तर माझ्या मायबापांनो शिक्षण घ्या. लहान असा मोठे असा स्त्री-पुरुष असा पण शिक्षण घेतल्याशिवाय राहू नका."

शिक्षणामुळे मानवाचा, समाजाचा उद्धार होतो. ज्या देशातला नागरिक अडाणी तो देश प्रगती करू शकत नाही. म्हणून बाबा म्हणत की, "मायबापहो! तुम्हाला काम तरी मिळालं पण तुमच्या मुलाबाळाच्या नशिबी तेही येणार नाही. शिक्षण हे मोठं पुण्याचं काम आहे. आपण शिका व इतरांनाही शिकवा."

शिक्षण प्रसारासाठी बाबांनी शाळा, वसतिगृहे, महाविद्यालये काढण्यासाठी प्रेरणा दिली. तत्कालीन. समाजाला रूढीप्रियते पासून

वाचविण्यासाठी त्यांनी शिक्षण आवश्यक मानले.

गाडगेबाबांच्या कीर्तनातून शिक्षणाविषयीची तळमळ जाणवते.

जयाचे मनी लालसा शिक्षणाची

गरीबीमुळे होतसे हाय त्याची

अशा इच्छिती लावूनी हातभार

करा श्रेष्ठ हे दान सर्वात थोर

बाबा म्हणत, 'विद्या शिका अन् गरीबाले विद्येसाठी मदत करा. गरीबाच्या मुलाले चड्डी द्या, खादी टोपी द्या, शिसपेन पाटी द्या, कोरी वही द्या, आपल्या पोराले विलायतेले पाठवण्याची इच्छा करता या गरीबालेही एकदोन आण्याची पुस्तक वही घेऊन द्या, त्यालेही शिकू द्या, शिकण्याची संधी द्या." असे जर झाले तर ईश्वराची ही सुंदर रुपे असणारी शेकडो बालके रस्त्यावर कचऱ्यासारखी पडलेली दिसणार नाहीत. त्यांना संधी मिळाल्यास न जाणो उद्या त्याच्यातूनच एखादे, गांधी, आंबेडकर होणार नाहीत असे कसे म्हणावे?

●●●

# तेवीस

# एकाच देवाची औलाद

गाडगेबाबांच्या समाजसुधारणेच्या कार्याचा मुळाधार अस्पृश्यतानिवारण, दारुबंदी व गोसेवा असल्याने याबाबतीत बाबांची मते फारच जहाल होती. समाजातील शिवाशिव, अंधश्रद्धा, व्यसन पाहून ते तळमळत. एकटा माणूस काय करू शकेल असे कुठेही वाटू न देता ते अखंड फिरून कीर्तनातून याबाबतीत उपदेश देत राहीले. शासनाने सुद्धा त्यांना दारुबंदी, व्यसनमुक्ती अस्पृश्यनिवारण यासाठी प्रचार करण्यास एक गाडी दिली होती.

गाडगेबाबा जातिभेद पाळत नसत. शिवाशिव न पाळणे हा त्यांचा धर्म होता. दीन दुबळे, अनाथ, अपंग, अस्पृश्य, निराधार म्हातारे ह्यांच्या ठिकाणी प्रत्यक्ष परमेश्वर आहे असे समजून रंजल्यागांजल्याची सेवा हे बाबांचे व्रत होते, हीच खरी जनसेवा पर्यायाने जनार्दनसेवा होती. म्हणूनच जातीजातीत धर्माधर्मात झगडे, भांडणे, कलह कसे निरर्थक आहेत हे पटवून देऊन बंधुत्वाची कल्याणकारी वृत्ती मानसात जागृत करण्यासाठी ते झटत राहिले. खरे तर अशा जनतेच्या सेवेतच मुक्ती भक्ती आणि शक्ती त्यांना दिसत होती.

आपण सर्व एकाच ईश्वरांची लेकरे असल्याने इथे उचनिचता पाळण्याची गरज काय? "माणसाने माणसाला कमी लेखावे यासारखा अधर्म नाही. ब्राह्मणापासून महारापर्यंत सर्व माणसे एकाच होडीतील प्राणी आहेत. कुणी मोठा नाही कुणी लहान नाही. जातीची बंधने माणसाने निर्माण केली आहेत, देवांनी नाही. एकाच देवाची आपण औलाद आहोत त्यात भेद नाही." असे बाबांचे विचार पाहिले की त्याच्या जीवितकार्याची महत्ती पटायला लागते. आज आपण साध्या माणुसकीला पारखे झालो. म्हणून, 'मायबापांनो आतातरी जातिभेद दूर करा?' असे कळकळीचे आवाहन बाबांनी जनतेला केले ते स्मरणीय आहे.

कीर्तन हे बाबांचे खास प्रचारतंत्र होते त्यातूनही शिवाशिव या विषयावर पोटतिडकीने ते विषय प्रतिपादन करीत राहिले. बाबा म्हणत -

"ज्याच्या अंगात अभिमान आहे तो जात पुसते. जो जात पुसते त्याच्या सारखाच तो आहे की नाही? याले चार हात अन त्याले दीड हात आहे कां? तुमचं आमचं दोन काय आहे?" असे विविध प्रश्न विचारून बाबा म्हणत, "समाजात बाई आणि पुरुष या दोनच जाती आहेत. तिसरी जातच नाही" कधी म्हणत, " आमची तुमची एकच जात आहे ती म्हणजे माणूस. म्हणून कोणी तुम्हाले जात विचारील तू कोन, तर म्हणावं मी माणूस!'

एकदा रिद्धपूरजवळील आरटोली गावात बाबांचे कीर्तन सुरु होते. कीर्तनात गावातील सर्व जातीधर्माची मंडळी आपली जागा राखून बसलेली बाबांनी पाहिली. विविध विषयावरून ते स्पृश्यास्पृश्य विषयावर आले. नेहमीप्रमाणे निरुपण करून त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्याची व अस्पृश्य बांधवा संबंधीच्या कार्याची माहिती सांगून, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरकी जय म्हणा' असा जयघोष केला. लोकांनी म्हटलं नाही. बाबा लालबुंद झाले, रागावले. स्टेजवरून खाली उडी घेऊन कीर्तन अर्धवट सोडून निघून गेले. तद्नंतर काही मंडळी माफी मागून गयावया करायला लागले. पण बाबा मानले नाहीत. तद्नंतर ते त्या गावातही कधी गेले नाहीत.

ज्यावेळी अस्पृश्यतानिवारणार्थ आवाजही ऐकू येत नव्हता. तेव्हापासून याविषयी आपल्या कीर्तनातून चीड व्यक्त करीत बाबा महाराष्ट्रभर हिंडत होते. समाजमान्य समाजाने अस्पृश्य बांधवांना आपल्यासारखे समजावे यासाठी कार्य करीत होते. समाजशील व समाजमान्य कुटुंब व समाज एकत्र आले तर हा प्रश्न सुटेल आणि देशाच्या विकासातील प्रमुख अडथळा दूर होईल असे बाबांना नेहमी वाटत असे.

●●●

# चौवीस

# बाबांचा रोकडा धर्म

बाबांच्या यशाचे व मोठेपणाचे सारे रहस्य त्यांच्या मानवतावादात आहे. दुःखी कष्टी पददलित पाहून त्यांचा जीव तीळतीळ तुटत असे. मानवाच्या अन्न, निवारा या प्रमुख गरजांना प्राधान्य देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, आरोग्य व रोजगार मिळणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी करणीने पटवून दिले.

त्यांच्या काळात वर्गकलह व गरीब श्रीमंत भेदाभेद जोरात होते. बाबांनी श्रीमतांचा द्वेष केला नाही. पण त्यांचा पक्ष गरिबांचा होता, दलितांचा होता, माणुसकीचा होता. वाईट सवयी व कर्तबगारी नसणे ही गरिबीची कारणे असल्याने श्रीमतांचा राग न मानता त्यांच्यातील दातृत्वभावनेला पर्यायाने माणुसकीला जागृत करून त्यांच्या पैशावर गरिबासाठी धर्मशाळा उभ्या केल्या, सदावर्त सुरू करून मानवधर्म जोपासला.श्रीमतांचा द्वेष करण्यापेक्षा गुजराथी, मारवाडी, ब्राह्मणासारखे कर्तृत्व करून परस्पराशी मानवतेने वागण्याचे ते आवाहन करीत.

बाबांची कीर्तने म्हणजे समाज प्रबोधनाची प्रश्नोत्तर रुपाने चाललेली सभाच असायची. सावकारशाहीला विरोध, श्राध्द तेरव्या बारसे करू नका, देवाचे भजन करा. तीर्थस्थळी जाऊ नका तर मनातील देवाची मनोभावे पूजा करून माणुसकी ओळखा आणि समाजसेवेतच देव पाहून त्याची पूजा करा म्हणून सांगणारे बाबा समाजवादी विचारसरणीचे संत होते. तुकाराम व कबिराचे दोहे सोडले तर कोणाचेही नाव न घेता कितीतरी महान लोकांचे तत्वज्ञान त्यांनी जनतेला पटवून सांगितले. मोठमोठी मंदिरे उभारून त्यात मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याऐवजी जित्या जागत्या माणसांना थारा देणे हीच माणुसकी असल्याचे बाबांचे तत्वज्ञान म्हणजे बुद्धिवादाचा स्वीकार होता. हिंदू मुसलमान असा धर्मकलह त्यांनी कधी होऊ दिला नाही. व्यसन, कर्मकांड थांबवून जनतेला सन्मार्ग दाखविण्याचे कार्य केले. वाईट सवयी सोडल्यास कोणापुढेही हात पसरवावा

लागणार नाही असा समाधानाने जगण्याचा मार्ग दाखविला.

बाबांचे हैद्राबादला कीर्तन झाले, दुसरे दिवशी जवळच एका खेडेगावात कीर्तन होते, एका मुसलमान अंमलदाराने त्यांना कीर्तनाची मनाई केली. "तुमच्या कीर्तनाने आमच्या गांवात धार्मिक संघर्ष होण्याची शक्यता आहे" असे त्याने सांगितले. धर्मकलह करण्याचा आपला कोणताच हेतू नसल्याचे बाबांनी सांगितले. त्या अमंलदाराला कुराणाची शिकवण विचारणे सुरु केले. त्यांनी सांगितलेल्या शिकवणीवर हिंदू धर्माचे दाखले देऊन ही हिंदू धर्मात कशी आहे हे बाबा सांगू लागले. असा एक तास कार्यक्रम चालला. बाबांचे सांगणे त्या मुसलमान सरदाराला पटत गेले आणि सर्वांना नकळत घडत गेलेल्या अभिनव कीर्तनाचा लाभ झाला. राजकीय भांडणाचे मूळ ठरलेल्या धार्मिक बाबी एकमेकात मिसळून कशा वागतात आणि त्यांचा बाऊ करून आम्ही सोयीनुसार त्याचा कसा अर्थ लावतो हे बाबांनी आपल्या जिवंत नाट्यमय शैलीने पटवून दिले.

बाबांनी जनतेच्या नैतिकतेवर भर देऊन सदाचार सत्प्रवृत्ती आचारणाने शिकविली. कर्मकांडात जखडलेल्या समाजाला सुलभ सोपे अध्यात्म शिकविले. फळाची अपेक्षा न धरता कर्तव्यकर्म करीत राहण्याचा श्रमाधिष्ठित गितोपदेश शिकविला.

रुढीप्रिय समाजव्यवस्थेला विरोध करूनही बाबा लोकप्रिय राहिले. अर्थात त्यांचे सांगणे लोकांना पटलेले असावे म्हणूनच परंपरेचा सोयीस्कर अर्थ लावणारी पारंपारिक रुढीप्रियता त्यांनी मोडून काढली, आणि

"वाहे अमृताचा झरा
असा गाडग्यामधून
रीतीरिवाजात मेल्या
जीव नवे संजीवन"

समाजाला नव संजीवन देऊन अमर राहण्याचा मूलमंत्र सांगितला. हा त्यांचा समाजधर्म म्हणजे मानवसेवाच होती. कोणताही व्यक्ती मोठा होतो. त्यासाठी समाज राष्ट्र मानवतेची अखंड सेवा करावी लागते,

तत्वनिष्ठा, त्याग, सेवा यावर जनतेला नवदीशा, नवतेज द्यावे लागते म्हणूनच मानवसेवा हाच बाबांचा सेवाधर्म होता.

म्हणूनच निष्काम कर्मयोगी श्री संत गाडगेबाबांचा संदेश व सेवाधर्म सामान्य जनतेपर्यंत पोहचणे ही काळाची गरज आहे.

श्री गाडगेबाबाचे संपूर्ण जीवन कार्य अनुभवले की वाटते.

"पुरुष म्हणू तुज! - पुरुषोत्तम तरी

तुज न रुचे जरि देव म्हणावे."

खास देव ओळखून त्याचीच सेवा करा म्हणणाऱ्या बाबांनी खेडुतांना समजेल अशा सोप्या साध्या आंतरिक वेदनेने ओथंबलेल्या भाषेत व्यवहारातील दृष्टांत दिले. बाबा म्हणतात -

कर्ज काढून तीर्थयात्रा करू नका.

गाईबैलांची चिंता वाहात जा.

मुलांना शिकविल्याविना राहू नका.

देवाला नवस करून कोंबडी, बकरी मारू नका.

आईबापाची सेवा करा.

कर्ज काढून सण करू नका.

भुकेल्याला अन्न द्या.

हुंडा घेऊन देऊन लग्न करू नका.

शिवाशिव पाळू नका.

दारु पिऊ नका.

देवाचे भजनकेल्याशिवाय राहू नका.

हा बाबांचा उपदेश म्हणजे मानवतेचा दिव्य संदेश आहे. मानवाची सेवा हाच बाबांचा धर्म आहे.

| | | |
|---|---|---|
| भुकेल्यांना | - | जेवण |
| तहानलेल्यांना | - | पाणी |
| उघड्यानागड्यांना | - | वस्त्र |
| गरीब मुलामुलींना | - | शिक्षणासाठी मदत |
| बेघरांना | - | निवारा, आश्रय |
| अंधू, पंगू, रोग्यांना | - | औषधोपचार |
| बेकारांना | - | रोजगार |
| पशुपक्षी मुक्या प्राण्यांना | - | अभय |
| गरीब तरुण तरुणीचे | - | लग्न |
| दुःखी व निराशांना | - | हिंमत |

हीच खरी भक्ती व देवपूजा आहे
हाच आमचा रोकडा धर्म आहे.

# पंचवीस

# लोकसंग्रह व पत्रव्यवहार

गाडगेबाबांचे नाव सर्वत्र झाले होते. कीर्तनासाठी त्यांना लांबलांबचे प्रवास करावे लागत. त्यांचा अनुयायी व चाहता वर्ग वाढत चालला होता. त्यांची लोकसंग्रहकता दांडगी होती. बाबांसोबत काम करणारा कार्यकर्ता आहे असे कळले तरी त्याच्या भोवती लोकांचा गलका होई.

गोरक्षण, धर्मशाळा, यात्रा आणि अनषंगिक इतरही कामासाठी बाबांना पत्रव्यवहार करावा लागे. कार्यक्रमांची गर्दी व नियंत्रणे सांभाळताना त्यांची दमछाक होई. पण त्यांनी कधीच कंटाळा केला नाही.

बाबा अक्षरशून्य असले तरी त्यांचा पत्रव्यवहार हजारो ठिकाणी अखंडपणे सुरु असे. पत्रात बारीक-सारिक गोष्टींचे बारकावे तपशिलासह ते अचुकपणे देत. बाबांनी लिहवून घेतलेली कितीतरी पत्रे आजही उपलब्ध होतात. त्यावरून असे लक्षात येते की, त्यांना अस्वच्छ अक्षरे आवडत नसावीत, पत्र निटनिटके व वाचनीय असावे असा त्यांचा कटाक्ष होता.

संस्थेत काम करणाऱ्या आपल्या अनुयायांना बाबा नेहमी पत्रे लिहून कामासंबंधी सूचना देत, बांधकाम सुरु असेल तर त्यासंबंधीचे बारकावे पत्रात नमूद केलेले असत.

ऋणमोचनचे घाट व पंढरपूरची धर्मशाळा बांधतांना बाबांचा प्रत्यक्ष बांधकामाशी संबंध आला असल्याने चुना, विटा, रेती आणि इतरही सामान केव्हा कसे वापरावे हे ते पत्राने समजावून सांगत. संस्थेतील कार्यकर्त्यांचे एकमेकांशी संबंध व वागणे कसे असावे या बाबत ते कटाक्षाने सूचना करत असल्याचे प्रत्यक्ष पुरावे पत्रातून सापडतात. व्यक्ती विषयींचा आदर, देणगीदारांचे अभिनंदन, गावकऱ्यांना प्रोत्साहन किंवा एखाद्याच्या कार्यासंबंधीची कृतज्ञता व्यक्त करताना बाबांच्या पत्रलेखकाला वेगवेगळ्या सूचना दिलेल्या दिसून येतात.

पत्र लिहिताना बाबा लहान मोठा, गरीब-श्रीमंत असा भेद न पाळता सर्वांना आदरपूर्वक मायना लिहायला सांगत, "श्रीमंत ह.भ.प. यांना

अनंतकोटी नमस्कार व लगेच पत्रास कारण की," ही त्यांची शैली होती, श्रीमंत, दयाळू, उदार, मायबाप अशी विशेषणे वापरून देणगीदारा बद्दलची सहानुभूती व आदरभाव व्यक्त करीत. पत्रात वैयक्तिक, कौटुंबिक, आप्त स्वकीयाचा भाग नगण्य असे. उलट सार्वजनिक जीवनाशी निगडीत विषयच ते प्रामुख्याने हाताळीत. उपदेश, बांधकामाचे आराखडे, धर्मशाळा, सदावर्त, गोरक्षण, कीर्तन, वसतीगृह, मार्गदर्शन असे साधेसाधे विषय त्यांच्या पत्राचे आहेत. नित्य नैमित्तिक समाजसेवेसंबंधीचे चिंतन या पत्रातून प्रकट होते तसेच त्यांच्या अनेक पैलूंची ओळख होते.

बाबाचा हिशेब पक्का व तोंडपाठ असे. ते पै पै चा हिशेब लिहवून घेत. इकडचा पैसा तिकडे खर्च न करण्याचा त्याचा कटाक्ष होता. सार्वजनिक पैशाचा विनियोग योग्य झाला पाहिजे याविषयीचे त्याचे पत्रलेखनातील बारकावे मुद्दाम देत आहोत.

एकदा मुंबईहून त्यांची मुलगी आलोकाबाईस लिहिलेले पत्र फार बोलके आहे.

"सौ आलोकाबाईस श्री गाडगेबाबांचा अनंतकोटी नमस्कार. पत्रास कारण की, गोरक्षणातून लवकर बाहेर पडाल तर बरे होईल.

"तुला पैशाचे पक्के भूत लागले. कमी नाही. तू मेल्याशिवाय हे भूत निघणार नाही. तुला हे न लगावं पण लागले. दादाला निरोप सांगावा की, पाहुणेबुवाचे दोन रुपये बंद करा. पाहुणेबुवा तुझे मालक आहेत. त्यांचे डोळयाने दिसत नाही. त्यांची पूर्ण सेवा कर. ज्या माणसाले पैशाचे भूत लागले तो पोटाला कमी खात असते. तो स्वतःलाही काही खात नाही, तर दुसऱ्याला काय घालणार? आम्ही तुमचे आईचे हयातीपर्यंत झोपडी ठेवणार, ती तेथे राहील. तुम्ही कुठेही घर बांधा व भेटीला येत जा. आता गाडगेबाबांची मुलगी म्हणून सांगू नकोस. धर्माने वागविले म्हणून मी बाबांचे नाव सांगतो असे म्हणा."

आलोका बाबांची मुलगी असली तरी किती कठोरपणे वागत हे दिसून येते. पत्रातील भाषा कठोर, विदारक व प्रखर आहे. अन्य पत्रात

आलोकास लिहिताना "संसाराला दुनियेतील वस्तू पुरत नाहीत. गोरक्षण काय पुरेल' असे लिहून मुलीला जीवनाचे तात्विक सारच सांगितले आहे.

बाबांचे निष्ठावंत अनुयायी श्री.अच्युतराव देशमुख उपाख्य दादा यांचेबरोबर त्यांचा मोठा भरपूर पत्रव्यवहार झालेला आहे. श्री गो.नी. दांडेकर यांनी त्या विषयी मार्मिक लिहिले आहे.

दि. ३० मार्च १९३५ च्या पत्रात बाबा अच्युतरावांना लिहितात, 'श्रीमंत अच्युतराव देशमुख यांना श्री गाडगेबाबांचे अनंतकोटी नमस्कार.

"माणसांवर देखरेख ठेवून काम करून घ्यावे. स्वयंपाक घरावर देखरेख ठेवा. कोणी बोलल्यास राग मानू नका. कोणाशीही बोलतांना त्यांना हात जोडून बोला." अशा पत्रातून बाबांची मार्गदर्शकाची भूमिका जाणवते. तशीच ते वागण्या बोलण्याचे कसे आदर्श आहेत हे मनावर ठसून जाते. कौशल्यपूर्ण कर्माच्या माध्यमातून ते योगी होते. तर वास्तुशास्त्र, शिल्पशास्त्र व परिसर सजावट तज्ञाजवळ असलेले सौंदर्याचे उपयोगितेचे आणि व्यावहारिकतेचे उत्तम ज्ञान बाबांजवळ होते.

देणगीदारांना पत्रे लिहून त्यांच्या दातृत्वाविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे बाबांचे नित्य कार्य होते. प्रसंगी त्यांची भेट घेऊन कार्याची ते माहिती देत. समाजातील दातृत्वास प्रोत्साहन देण्याचे बहुमोल कार्य बाबांनी केले. देणगीदाराकडून मिळालेली रक्कम त्याच कामावर खर्च केल्याची खात्री करून घेण्यासाठी ते देणगीदारांना आमंत्रित करीत. संस्था बघण्यास बोलावित. दानशूर व्यक्तींना पत्रे पाठवून ऋण व्यक्त करणे, त्याची खात्री करवून घेणे याविषयीचे नियम जन्मभर त्यांनी पाळले.

बाबांच्या मामांची जमीन हडप करणारे तिडके सावकाराच्या घराण्यातील मूर्तिजापूरचे भगवंतराव यांचेशी बाबांचे घनिष्ट संबंध होते. बाबांच्या प्रेरणेने १ जुलै १९५२ मध्ये ग्रामीण परिसरात त्यांनी शाळा काढून गरीब मुलामुलींची शिक्षणाची सोय केली. त्यातच पुढे वसतीगृह

व बालकमंदिरही काढले. बाबांना मनस्वी आनंद झाला. त्यांनी नाशिकवरून (१४/९/५६) भगवंतराव तिडकेंना पत्र लिहून समाधान व्यक्त केले. "आपण श्रीमंत आहात. श्रीमंताच्या कुळात जन्माला आले ही परमार्थी व सार्वजनिक कार्याची लाईन तुम्हाला लागूच नये पण लागली. शाळा, बोर्डिंग व बालकमंदिर आपण सुरू केले. त्यात यश आले. गरीबांची मुले शिकत आहेत. पुढे शिकतील हे सारे श्रेय आपणास आहे. गरीबाची मुले घरच्या भाकरीवर शिकली पाहिजेत."

संस्था काढल्यानंतर सार्वजनिक जीवनात त्या कशा चालवाव्यात. याबाबत बाबांचा निश्चित दृष्टीकोन होता. ट्रस्टीमंडळी कशी असावी. याबद्दल ते भगवंतरावांना एका पत्रात लिहितात, 'ट्रस्टी स्वार्थी नसले पाहिजेत. त्यांनी कपभर दुध तर नाहीच परंतु तांब्याभर पाणीही त्या संस्थेत घेऊ नये. तरच ते ट्रस्टी आणि हाती घेतलेले कार्य त्यांनी भरभराटीला आणून जगाचे समोर ठेवले पाहिजे. तुम्ही जिवंत आहात तोवर काम पहा पण स्वतःला जनतेचा मोठा सेवक समजा.' राजकारणाविषयी भगवंतरावांना लिहिताना बाबा म्हणतात 'राजकारण सोडा. राजकारणात जास्तीत जास्त काय व्हाल? मिनिस्टर व्हाल. एखाद्या संस्थेला दहा पंधरा हजार रुपये देणगी देण्यापलीकडे काय करू शकाल? राजकारणी मंडळी चांगल्यारीतीने संस्था चालवू शकत नाही असे त्यांना वाटत असावे. कारण संस्थेतही राजकारण आले की अफरातफर होण्याची व प्रसंगी संस्था रसातळाला जाण्याचे प्रसंग त्यांनी पाहिले होते. तद्वतच राजकारण्याचे संस्थेकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे ती सुरळीत चालू शकत नाही. म्हणून बाबांनी संस्थेत राजकारणी लोकांना फारसे स्थान दिलेले नव्हते.

●●●

## सेवीस

# समकालीन सन्मान्यांच्या सहवासात

गाडगेबाबा म्हणजे त्यांनी अंगिकारलेल्या कार्याचा एक वस्तुपाठ होते. त्यांच्या लोकसंग्राहक वृत्तीमुळे लहानथोर मंडळी त्यांच्या सान्निध्यात आली. बाबांशी ज्यांचा स्नेह जुळला त्यांच्यावर बाबांनी लोभ केला. बाबाचे कितीतरी अनुयायी निर्माण झाले. पण शिष्य म्हणून बाबांनी त्यांच्याशी जवळीक केली नाही, की स्वतःचा पंथ निर्माण करून भक्तगण गोळा केले नाही.

यामुळेच बाबांशी ज्या प्रमुख व्यक्तींचा संबंध आला त्याची थोडक्यात ओळख करून देण्यासाठी काही प्रसंग पुढे दिले आहेत.

**महात्मागांधी** - भारतीय स्वातंत्र्याचे अध्वर्यू महात्मा गांधीजीं भेट बाबांशी दोनदा झाल्याचे उल्लेख आढळतात. सेवाग्राम आश्रमात आणि फैजपूरच्या काँग्रेस अधिवेशनात. बाबांनी कसायाकडे जाणाऱ्या गाई अडवून त्यांची शुश्रूषा केली व गोरक्षण करणारा गोपाल ही पदवी सार्थ केली. हा महात्माजींचाच कार्यक्रम राबवून त्यांनी गाईचे संवर्धन केले. 'गाय करुण रसाची मूर्ती आहे.' असे बापू म्हणत, बाबांनीही गोसेवा करून गाईचे कारुण्य ओळखले होते. बापू आणि बाबा म्हणूनच भूतदयावादी संत होते.

गरीबांची व दुःखिताची नानापरीने मनोभावे सेवा करीत बाबांनी झाडूंचे तंत्र ह्या देशात रुजविले. कोणी म्हणतात झाडूचे तंत्र महात्माजींनी आणले. पण त्यापूर्वी डोक्यावर खापर व हातात खराटा घेऊन बाबा रस्ते साफ करीत फिरले. त्यांच्या जीवनाचे आणि सेवेचे तंत्रच असे होते की सकाळी गावातली घाण साफ करून रात्री कीर्तनातून गावकऱ्यांच्या डोक्यातली घाण साफ करीत. शिवाशिव, दारु, अहिंसा याबाबतचे गांधीजीचे सेवातंत्र गाडगेबाबांच्या जीवनामध्ये पहायला मिळते.

बाळासाहेब खेर - मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांची व गाडगेबाबांची पहिली भेट एक विचित्र योगायोग असला तरी त्याचे

पर्यावसान आदर आणि स्नेहभाव यांत झाले. पंढरपूरची मराठा धर्मशाळा बांधत असताना खेर पंढरपूरला मामाकडे गेले होते. एकदा सहज सायंकाळी फिरायला जाताना त्यांनी चिंध्या पांघरलेल्या एका माणसाला लोक नमस्कार करताना पाहून त्यांस राग आला. ते बाबाजवळ येऊन म्हणाले "का हो बुवा! ही काय ढोंगबाजी चालवली आहे?"

बाबांनी नम्रपणे खेरांची माफी मागितली व चुक सुधारून घेऊ असे सांगितले. तरुण खेरांना एका साधूची जिरवल्याचा आनंद झाला.

पुढे खेर सॉलिसिटर झाले. राजकारणात येऊन काँग्रेसचे नामवंत पुढारी झाले. मराठा धर्मशाळेचे काम पूर्ण झाल्यावर त्याच्या व्यवस्थेसाठी ती कायदेशीर पंचकमेटीच्या सुपूर्द करण्याचे ठरवून बाबा फोर्ट विभागातील खेरांच्या कार्यालयात गेले. दोघांनीही एकमेकांना ओळखले. कधीतरी यांना उणेदुणे बोलण्याचा खेरांना पश्चाताप झाला.' बाबांना घेऊन खेर स्वतःच्या बंगल्यावर गेले. तिथे रीतसर कागदपत्रे तयार झाली. त्या क्षणापासून त्यांची बाबांवर श्रद्धा जडली. बाळासाहेब खेर मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. गाडगेबाबांनी त्यांना सांगितलेले कोणतेही काम त्यांनी नकार न देता केलेली आहेत. असा त्यांचा बाबांविषयी आदरभाव होता.

नाशिकला पंचवटी परिसरात भूमिगत गटाराची व्यवस्थाही बाबांच्या सूचनेवरूनच अमलात आणली होती.

**प्र.के.अत्रे**

सुप्रसिद्ध विनोदी लेखक व 'मराठा' चे संपादक आचार्य अत्रे यांचा बाबांचा फार स्नेह होता. बाबा पुण्या-मुंबईत असले की अत्रे त्यांना बरेचदा भेटत असत.

अत्रे संयुक्त महाराष्ट्रात चळवळीचे नेते होते. एकदा बाबांना भेटून आदरयुक्त भीतीने ते म्हणाले "बाबा संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीविषयी लोकांना माहिती सांगा." भाषांवर प्रांतरचनेनंतर मराठी भाषा बोलणाऱ्या सर्वांचा एक प्रांत असावा यासाठी ही मंडळी आंदोलन करताहेत हे बाबांना माहित होते.

रात्री कीर्तन सुरू झाले. गोपाला गोपाला देवकीनंदन गोपालाचा गजर झाला आणि बाबांनी जनतेला आवाहन केले. 'मंडळी मी अडाणी माणूस, पण सध्या काही मंडळी संयुक्त महाराष्ट्रासाठी प्रयत्न करत आहेत. आपल्यापैकी कोणाला असा महाराष्ट्र पाहिजे आहे का?"

जनसमुदायातून 'हो' कार मिळाला. बाबा म्हणाले, "ज्यांना असा संयुक्त महाराष्ट्र पाहिजे असेल त्यांनी सरळ हात वर करा." नेहमीच्या पद्धतीने ते म्हणाले, "हे काम घरात राहून की कीर्तनात बसून होईल? उद्या सर्व मंडळीनी गव्हर्नर साहेबांना अर्ज केले पाहिजेत, किंवा आंदोलनात उतरले पाहिजे."

बाबांच्या कीर्तनाची जादू आंदोलकांना माहित होती. दुसऱ्या दिवसापासून आंदोलनाने अधिक वेग घेतला.

आचार्य अत्र्यांच्या खंडाळयाच्या बंगल्यावर बाबांचा मुक्काम होता. ठिकठिकाणचे गोळा केलेले कापडाचे तुकडे शिवण्यात बाबा व्यस्त होते. भीत भीतच आचार्य अत्रे बाबांना म्हणाले, 'बाबा एकवेळ या अंगरख्याला ठिगळं जोडून हा जाडाभरडा अंगरखा घालता, एका पायात सपाता व दुसऱ्या पायात कॅनव्हासचा फाटका जोडा घालता हे मी समजू शकतो. पण कोणत्याही कर्मकांडाला न मानणारे आपण कानात फुटकी कवडी घालता याचे रहस्य काय?"

बाबा थोडा वेळ स्तब्ध झाले, गहिवरून म्हणाले, "माझ्या लहानपणी मी जरा दांडगा होतो. उनाड होतो, खोडकर होतो. आपलं न चुकता कोणी बोललं तर चीड यायची. सावकार आमच्या घरावर सातत्याने अन्यायच करायचा. मी चिडून शिव्या देत असे. पण काही करता येत नव्हते. माझ्या अंगाची लाहीलाही व्हायची. तेव्हा माझी आई मला म्हणायची 'डेबू'! आपण फुटक्या नशिबाची कवडी मोलाची माणसं. असं वागून चालायचं नाही." आईच्या बोलण्याचा भाव कळला. आम्ही धोबी माणसं गरीब असल्याने समाजात कवडीमोलाची आहोत हा आईचा लाखमोलाचा संदेश मी कानात फुटकी कवडी बांधून जपून ठेवला आहे. यामुळे मला माझ्या अस्तित्वाची जाणीव होत असून मी आजवर कुठलेही अवडंबर केलेले नाही ते यामुळेच."

बाबा स्वतःविषयी क्वचितच बोलत. पण हे त्यांनी आचार्य अत्रेंना सांगून स्वतःविषयीचे रहस्य प्रकट केले.

अत्रे हे फर्डे वक्ते, हजरजबाबी असून व्यक्तीदुर्गुणांची गय न करता बोलत असत पण गाडगेबाबांच्या विशुद्ध आचरणाचा सेवाकार्याचा, लोकप्रियतेचा प्रभाव आचार्य अत्रेंवर शेवटपर्यंत कायम होता. बाबांच्या संगतीचा लाभ अत्रेंना बरेचदा मिळाल्याने बाबांचे सेवाकार्य त्यांनी जवळून पाहिले व महाराष्ट्राचा समाजवादी संत म्हणून त्यांची महती कथन केली.

**सेनापती बापट** :- सेनापती बापट हे सुद्धा कर्मयोगी पुरुष होते. लोकांची अंतःकरणे साफ करणाऱ्या सेनापतींवर गाडगेमहाराजांच्या झाडूतंत्राचा अत्यंत प्रभाव होता. त्या काळी वक्ते किंवा पुढारी फक्त स्टेजवरून भाषण ठोकून जात. उलट पाहुणा म्हणून ज्यांचा मानमरातब ठेवावा असे  बाबा स्वतःच कीर्तनाची जागा स्वतः झाडून स्वच्छ करीत हे पाहून सेनापती गहिवरत. सेनापती एक सुशिक्षित व स्वातंत्र्य लढ्यातील लढवय्ये पुरुष होते. त्यांच्यावर बाबांचे कार्याचा प्रभाव असल्याने स्नेह जुळला. सेनापती व बाबा दोघेही स्वतःच्या कार्यात दक्ष असून आपापली कामे स्वतः करीत असत. "झाडूतंत्र" हे दोघांचेही तत्वज्ञान होते.

**डॉ.आंबेडकर** :- गाडगेबाबा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे फार घनिष्ठ संबंध होते. अस्पृश्योद्धार, रंजलेगांजले त्यांच्या मनातील देवभोळेपणा कमी करण्याचा दोघांनीही प्रयत्न केला. एकाने देवदेवतांचे फोटो घराघरातून काढायला लावले तर दुसरा 'देव देव करिता शिणले माझे मन, पाणी आणि पाषाण जेथे तेथे' असा उपदेश करीत होता. अर्थात याबाबतीत दोघांच्याही कार्याची दिशा समान होती. अस्पृश्योद्धारा, विषयी दोघांनाही तळमळ होती.

एक गाडगे 'बाबा' होते तर दुसरे 'बाबा'साहेब होते. 'बाबां'च्या भूमिकेतून जनतेवर निरतिशय प्रेम दोन्ही बाबांनी आयुष्यभर केले.

डॉ.आंबेडकर कायदामंत्री असताना १४ जुलै १९४९ रोजी ठरल्याप्रमाणे गाडगेबाबा डॉ.आंबेडकरांना पंढरपूरची धर्मशाळा स्वाधीन

करणार होते. पण त्या दिवशी बाबांना भरपूर ताप चढला, महामंदस्वामी बाबांजवळ होते. त्यांनी आंबेडकरांना बाबा न येऊ शकण्याची कारणे सांगितली. आंबेडकरांना सायंकाळी दिल्लीला जायचे होते. रेल्वेस्टेशनवर सर्व तयारी झालेली होती. पण तूर्त थोडावेळ तयारी लांबवून आंबेडकर बाबांच्या भेटीसाठी स्वतः दादरला आले. त्याचवेळी तिथे कर्मवीर भाऊराव पाटील व दिवाण बहाद्दूर जगताप येऊन पोहचले. सर्वासमक्ष बाबांनी कागदावर आंगठा लावला आणि पंढरपूरची धर्मशाळा आंबेडकरांच्या स्वाधीन केली. धर्मशाळेत मुलांचे वसतीगृह राहणार होते. फक्त तीर्थयात्रेच्या वेळी येणाऱ्या मागासवर्गीयांची राहण्याची व्यवस्था फक्त तिथे करावी एवढी एकच विनंती बाबांनी केली. अशाप्रकारे शिक्षणाची सोय व तीर्थयात्रेला येणाऱ्यांची आबाळ होऊ नये अशी दुहेरी काळजी बाबांनी घेतली होती.

दोघांच्याही वारंवार भेटीगाठी होत. बाबा निरक्षर असले तरी बाबासाहेबांना त्यांच्या जनसेवेची जाणीव होती तर आंबेडकराच्या कार्याची बाबांना महती पटलेली होती. दोघांचेही एकच ध्येय होते. डॉ.आंबेडकरांनी काढलेल्या शाळा, कॉलेजसाठी बाबांनी भरघोस मदत केली होती. श्रमदान करून परिसर स्वच्छ केला तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले.

समाजातील चातुर्वर्ण्याला कंटाळून आंबेडकरांनी 'मी हिन्दू धर्मात जन्मलो पण हिंदू म्हणून मरणार नाही.' अशी सिंहगर्जना केली. नाईलाजाने निर्णय घेण्याची वेळ येऊन ठेपली. याप्रसंगी आंबेडकरांना गाडगेमहाराजांची आठवण झाली. बाबांना निरोप गेला. लगोलग बाबा कुलाब्यास पोचले. आंबेडकरांच्या अनुयायांची घनघोर चर्चा त्यांनी ऐकली.

आंबेडकर स्वतः येऊन बाबांना म्हणाले "आपल्याला त्रास झाला."

"आपून किती तरांस घेता? भारताची घटना बनवली. चहुकडे विद्येचा प्रकाश पाडला. दलितांसाठी रात्रंदिन खपून राहिले.'

डॉ.आंबेडकर हात जोडून म्हणाले, 'बाबा, आपण माझे गुरू आहात. एका बाबतीत मला आपला सल्ला पाहिजे.

"बोला' मला अडाऱ्याले उमगले ते सांगेन."

बाबासाहेब म्हणाले, 'खूप प्रयत्न केला. जन्मभर धक्के खात आलो. घटना बनविली म्हणून आपण माझे कौतुक करता. मी शिकलो तरी मला एवढा त्रास झाला मग माझा हा कोट्यावधी समाज - ज्यांना विद्या नाही, त्यांचेजवळ पैसा नाही, मानप्रतिष्ठा नाही त्यांना किती भोगावे लागत असेल.'

गाडगेबाबा गंभीर होऊन म्हणाले 'मग काय करायचं ठरवलं!'

"हिंदू धर्म सोडून दुसरा धर्म स्वीकारायचा मी निश्चय केला. आता कुठला धर्म स्वीकारू ते मला सांगा!"

'मला धर्माचे ज्ञान नाही' गाडगेबाबा नम्रपणे म्हणाले, पण एक सांगतो "सगळी पददलित जनता तुमच्या मांग आहे. तुमच्या एका शब्दावर हे लोकं जीव टाकतील. त्यांना भलत्या वाटेनं नेऊ नका."

आंबेडकरांनी खूप विचार केला. समाजबांधवाशी मसलत केली. बाबांची वाणी प्रमाण मानून त्यांनी भारतातीलच बौद्ध धर्माचा स्वीकार करून अस्पृश्य समाजाला मानवताधर्माची दीक्षा दिली.

**कर्मवीर भाऊराव पाटील** :- पश्चिम महाराष्ट्रात सर्वत्र शिक्षणाचे जाळे विणून ज्ञानप्रकाश पसरविणाऱ्या भाऊरावांचा आणि गाडगेमहाराजांचा स्नेह स्थायी स्वरुपाचा होता. शिक्षण क्षेत्रात पाचशेवर शाळा महाविद्यालये वसतीगृहे काढून शैक्षणिक क्रांती घडविणारे कर्मवीर व उपाशी राहा पण मुलांना शिकविल्याविना राहू नका म्हणणारे कर्मयोगी दोघेही महाराष्ट्राला ललामभूत ठरणारे व्यक्तिमत्व होते.

दोघांनाही बहुजनांच्या शिक्षणाचा कळवळा होता. काही अडचण पडली की भाऊरावांना बाबांची आठवण होई. दोघेही एकमेकांच्या शैक्षणिक अडीअडचणीत धावून जात. धर्मशाळेतील कार्यकर्त्यात मतभेद झाले की, गाडगेबाबा कर्मवीरांना पाठवून समझोता करण्यास सांगत. बाबांचा शब्द कर्मवीरांना आज्ञेसमान होता. साताऱ्याकडे बाबांचा कार्यक्रम असला की बाबा जाणून बुजून भाऊरावांची भेट घेत.

केवळ एक हरिजन विद्यार्थी घेऊन भाऊरावांनी श्री छत्रपती शाहू

वसतिगृह सुरु केले. त्यांच्या संस्थेत स्वावलंबन हा पाठ होता. 'कमवा व शिकवा' हा मंत्र त्यांच्यात होता. गाडगेबाबांचे त्यांच्या कार्याकडे बारीक लक्ष असे. भाऊरावांविषयी त्यांच्या मनात आपुलकी व श्रद्धा होती. १९३९ साली श्री सायाजीराव हायस्कूलचा कोनाशिला समारंभ झाला. रात्री बाबांचे कीर्तन होते. 'मुलांना निरक्षर ठेवणे पाप आहे. त्यांना शिकवा. कर्ज काढून सण करू नका. तीर्थक्षेत्री जाऊ नका. नशा करू नका. शिक्षणाच्या पवित्र कार्यात भाऊरावांची मदत करा.' असा संदेश देणारे बाबांचे कीर्तन ऐकून लोकांनी भाऊरावांना मदत केली. बाबांचे निस्सीम अनुयायी बंडोबा गोपाळ कदम यांनी कसूर जि.सातारा येथे बाबांच्या प्रेरणेने एक मंदिर बांधले. गोरगरिबांच्या अनाथ मुलांना शिकविणाऱ्या भाऊराव पाटलांच्या कार्याची त्यांनी प्रशंसा केली. पुढे याच कुसुरला श्री.कदम यांनी विद्यालय सुरु करून भाऊराव पाटलाच्या स्वाधीन केले. आर्थिक मदतही केली. या पाठीमागे बाबांची प्रेरणा व आशिर्वाद असल्याचे कदम यांनी मान्य केले.

भाऊरावांच्या शिक्षण कार्याचा गौरव करण्यासाठी १९४८ साली एका समारंभाचे आयोजन करण्यात आले असताना गांधीजी येणार नाहीत असे कळताच हा सत्कार गाडगेमहाराजांच्या हस्ते करवून गौरव निधीही अर्पण करण्यात आला. बाबांनी भाषण व कीर्तन यातून प्रचंड जनसमुदायापुढे भाऊरावांना शुभेच्छा दिल्या अश्या अनेक प्रसंगी दोघांचाही स्नेह वृद्धींगत होत गेला. १९५६ ला बाबांचे निधन झाले तेव्हा भाऊराव पाटील ढसाढसा रडले. मोठा भाऊ, एक मार्गदर्शक हरवल्याचे दुःख त्यांना झाले. कराडच्या सद्गुरु गाडगेमहाराज महाविद्यालयात झालेल्या शोकसभेत ते इतके भारावून गेले की डोळे पाणावल्याने एक शब्दही न बोलता खाली बसून गेले. बाबांच्या जाण्याने झालेल्या दुःखाचा आवेग भाऊराव रोखू शकले नाहीत.

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

गाडगेबाबा आणि तुकडोजी महाराज दोघेही विदर्भातील महान संत. एकाने देवकीनंदन गोपाळाचा जागर केला. दुसऱ्याने जयगुरुदेव हा मंत्र

दिला. दोघांचीही जन्मभूमी अमरावती जिल्हा. प्रसिद्धी मात्र भारतभूमीभर, तुकडोजींनी एक तप रानात तपश्चर्या करून सिद्धी मिळविली. गाडगेमहाराजांनी एक तप भ्रमंती करून जग पाहिले. दोघांनाही समाजसेवेची तळमळ लागली होती. दगडांचा टाळ करून भजनाची सुरुवात करणारे गाडगेबाबांनी व खंजरीच्या तालावर स्वतःचा आवाज देऊन कीर्तनाच्या माध्यमातून तुकडोजींनी जनजागृती केली. एक निरक्षर असून चपखल दाखले देणारा दुसरा शीघ्र कवित्वाचे गुण घेऊन जगणारा. दोघांनीही विदर्भाची मान उंचावली, शान राखली. दोघेही स्वयंप्रकाशी होते.

तुकडोजींनी सालबर्डीस यज्ञ केला. त्या कार्यक्रमात गाडगे महाराज उपस्थित राहिले. त्यांनी यात्रेकरूंची नीट व्यवस्था लावली. रात्री कीर्तन करून लोकांना उपदेश केला. सालबर्डीस दोघांचीही जवळून ओळख झाली. स्नेह जुळला.

वार्धक्यामुळे बाबांच्या प्रकृतीत चढउतार येऊ लागले. बरे वाटेल तोवर श्रम करीत एखादे कार्य तडीस नेण्याचे गाडगेबाबाचे तत्व होते. त्यासाठी शरीराचे लाडकोड त्यांनी कधी केले नाही. अशावेळी दोघात झालेला पत्रव्यवहार बोलका आहे. गाडगेबाबांना तब्येतीकडे लक्ष देण्यासाठी ते वारंवार विनवणी करीत. एका पत्रात तुकडोजी महाराज बाबांना लिहितात, "आपल्यासारख्या महान त्यागी, निःस्पृह व जनहितैषी सेवकांची आज भारताला अत्यंत जरुरी आहे. महाराज आमच्या मृत्युलोकांत तर काही अमर कीर्तीचे लोक असतील. त्यात आपली जागा महत्वाची आहे." 'समाजात तोंडाची विद्वता सांगणारे लोक बहुत आहेत. पण हातात खराटा घेऊन, लोकांच्या झोपड्यात हातावर भाकरी घेऊन, सडकेवर खाऊन लोकांचे हित जोपासणारे लोक बोटावर मोजण्याएवढेही नाहीत. तेव्हा आपण बिमार आहात असे कळले की मन दुःखी होते.

.....तेव्हा आपण अधिक दिवस मानवाची सेवा करावी व तसे उदंड आयुष्य ईश्वराने आपणास द्यावे अशी देवाजवळ प्रार्थना आहे."

ह्यावरुन तुकडोजी व बाबांचा स्नेह लक्षात येतो. पुढे तुकडोजी म्हणतात की, "आम्ही आपले शिष्य किंवा संप्रदायी नसलो तरी आपण

केलेल्या जनता जनार्दनाच्या सेवेचे जे आपल्यात तेज आहे, ओढ व कळकळ आहे त्याचे आम्ही दास आहोत."

निष्काम कर्मयोगी गाडगेबाबांचे लोकांवर फार उपकार आहेत. गाडगेबाबांविषयी  तुकडोजी म्हणतात की, "या सत्पुरुषांने लाखाची संपत्ती मिळविली पण गाडगे सोडले नाही, कवड्या टाकल्या नाहीत. चिंध्या फेकल्या नाही. हा होय खरा अनासक्ती योग. गाडगेबाबा म्हणजे त्यागाचे होमकुंड होते. धैर्याचा हिमालय होते."

नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यात गिरड नावाचे प्रसिद्ध तीर्थस्थळ असून तिथे बाबा फरीद यांचा दर्गा आहे. गिरडक्षेत्री कोंबड्या बकऱ्यांचे बलिदान होते हे बाबांना कळताच या महामानवाचा मोर्चा तिकडे वळला. रात्री कीर्तन झाले. 'पशुहत्या करू नका' हा उपदेश प्रत्येकांनी ऐकला.

पण दुसऱ्या दिवशी बकऱ्यांच्या रक्ताचे पाट वाहू लागले. संतहृदय द्रवले. बाबा आडवे आले, "इथे प्रथम मला बळी द्या. नंतर हे बकरे कोंबडे कापा." "हे पशुबळी देण्याऐवजी घरचा नरबळी कां देत नाही" असा बाबांचा संताप झाला. ते पडून राहिले. लोकांनी विनंती केली पण बाबा बधले नाही. ओढाताण होऊ लागली. वातावरण गंभीर झाले. गावात बातमी जाताच भक्तांनी बाबांची सोडवणूक केली.

राष्ट्रसंत तुकडोजींना हे कळताच ते रातोरात बाबांच्या मदतीसाठी गिरडला धावून गेले. म्हणाले "अन्याय कशास्तव झाला - हे पाहण्यासी दास आला." दोघांची भेट झाली. आलिंगन झाले. दोघेही मिळून मंदिरातील उत्सवाच्या रंगमंचावर गेले. गाडगेमहाराजाचे कीर्तन झालेलेच होते. बाबांचे चरित्रगायन व गुणगौरव करणारे राष्ट्रसंताचे घणाघाती व्याख्यान सुरू झाले. पशुबलिदान, पापपुण्य, जीवदया आणि यासाठी गाडगेमहाराजांनी केलेला त्याग, सेवाकार्य यांचा जनतेला उलगडा झाला.

जनसमुहावर तुकडोजींच्या भाषणाचा परिणाम दिसू लागला. पशुहत्त्येसंबंधी बाबांचे कीर्तन व प्रत्यक्ष आडवे होणे म्हणजे आचार विचारातील साम्यता जनतेच्या नजरेत  आलेली होतीच. टाळयांचा

कडकडाट झाला. जनतेने संकल्प केला. गिरड गांव पशुबलिदानातून मुक्त झाले. बाबा आणि तुकडोजी एका मोटारीतून निघून केले.

**शिवाजी पटवर्धन** :- शिवाजीराव पटवर्धन हे विदर्भातील अग्रणी समाजसेवक. कुष्ठरोग्यांची सेवा करण्यासाठी त्यांनी 'श्री जगदंबा कुष्ठ निवास' स्थापन करून अमरावतीस 'तपोवन' सुरु केले. महारोग्यांची संपूर्ण व्यवस्था ते जातीने पहात असत. सरकारी अनुदानाची फारसी पर्वा न करता त्यांनी बहिष्कृतांना आधार दिला.

शिवाजीराव व गाडगेबाबा यांची घनिष्ट मैत्री होती. आपल्या तपाच्या भ्रमंतीत बाबांनी तीर्थयात्रेत महारोग्यांचे थवे पाहिले, त्यांचे झडलेले हात, बोटं पाहिली, वाहत असलेल्या जखमांमुळे लोकांची तिरस्कार वृत्ती पाहिली. देवदर्शनाला जाणाऱ्या भाविकांचे त्यांच्याप्रती तुसडेपणाचे हिणकसपणाचे वागणे पाहिले. असे असतानाही कुष्ठरोग्याची मनोभावे सेवा करताना शिवाजीरावांना पाहून बाबांच्या मनात त्यांचेविषयी आदर उत्पन्न होत असे.

गाडगेबाबा अमरावतीत आले की वेळ काढून कुष्ठनिवासात जात.

शिवाजीराव पटवर्धन लिहितात "बाबांची अंतिम इच्छा कुष्ठरोग्यांची सेवा करावी अशी होती. त्यादृष्टीने ते आमच्या संस्थेत मधूनमधून येऊन कुष्ठरोग्यासमवेत काही काळ घालवित असत." गाडगेबाबांना कुष्ठरोग्यांविषयी सहानुभूती व कळवळा होता. म्हणूनच ते वर्ध्याजवळचे दत्तपूर, अचलपूर जवळचे कुष्ठकेंद्र व अहमदनगरचे मेहेरबाबा आश्रम यांना सवडीनुसार भेटी देत. आळंदीला गाडगेबाबांनी एक कुष्ठधामही सुरु केले होते.

एकदा गाडगेबाबा आळंदीस असताना इंद्रायणीहून धर्मशाळेकडे परतत होते. झाडाच्या आडोश्याला त्यांना कण्हत असलेला एक असहाय्य कुष्ठरोगी दिसला. बाबा त्याच्याजवळ गेले. मायेने विचारपूस केली. हात देऊन उठविले. नदीवर नेऊन त्याला आंघोळ घातली. त्याच्या खाण्याची व्यवस्था करून नंतरच ते धर्मशाळेकडे गेले.

आप्त स्वकीयांच्या प्रेमाला पारखा झालेला कुष्ठरोगी शिवाजीरावांच्या

तपोवनात निर्धास्त जीवन जगताना पाहून बाबा त्यांच्या कार्याची मुक्तकंठाने कीर्तनातून प्रशंसा करीत.

**डॉ.पंजाबराव देशमुख :-** कर्मवीर पाटलांच्या तोलामोलाचे शैक्षणिक कार्य विदर्भात पंजाबराव देशमुखानी केले आहे. विदर्भात कितीतरी शाळा, महाविद्यालये पंजाबरावांनी सुरु केली. गाडगेबाबांची पंजाबराव देशमुखावर फार मर्जी होती. दोघेही एकमेकांशी आदराने वागत.

अमरावतीत असताना बाबांना वेळ मिळाला की ते पंजाबरावांच्या एखाद्या शाळेत किंवा महाविद्यालयात जाऊन परिसर साफ, स्वच्छ करीत. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत. उच्चविद्या विभूषित असतानाही पंजाबरावांची निरक्षर बाबांशी दोस्ती होती. पंजाबराव केंद्रीय मंत्री होऊन अमरावतीस आले असताना बाबा स्वतः स्वागतास उपस्थित होते.

**'जनताजनार्दन'**

या बड्या मंडळीबरोबरच बाबांच्या सान्निध्यात अनेक नामवंत व्यक्तीही आल्या. त्यातील काही निवडक लोकांशी गाडगेबाबांच्या जीवन आठवणी निगडित आहेत.

जीवदया मंडळीचे प्रमुख ॲड.जयंतीलाल मानकर यांची बाबांवर फार श्रद्धा होती. व्यवसायाने वकील असलेल्या जयंतीलाल मानकरांनी मुक्या प्राण्यांची वकीली करण्यातच आयुष्य घालविले. पशुहत्या व बळी प्रथेविरुद्ध त्यांनी आयुष्यभर कार्य केले. मेसाईची कान्हूर यात्रा व वरवंडीचे यात्रेच्या वेळी बाबांबरोबर ते हिंसाबंदीचे कार्य करीत असत. बाबांच्या कार्याचा व जीवनप्रसाराचा वाढता व्याप पाहून त्यांनी गाडगेबाबांच्या भजनी मंडळीकरिता १९३५ साली जीवदया मंडळाकडून एक मोटार गाडी देवविली. दूरवर कराव्या लागणाऱ्या प्रवासाची गरज लक्षात घेऊन बाबांनी त्यांना नकार दिला नाही. नेहमी पायी, बैलगाडी किंवा रेल्वेने प्रवास करणाऱ्या बाबांनी जयंतीलाल मानकरांची आग्रहपूर्वक केलेली विनंती मान्य केली.

गाडगेबाबांच्या कार्याची ओळख व माहिती जनतेला व्हावी यासाठी

१९५२ साली दिवाळीच्या शुभपर्वावर 'जनताजनार्दन' नावाचे पाक्षिक सुरु करण्यात आले. यासाठी संपादक म्हणून बाबांचे विश्वासू सहकारी अच्युतराव दादा यांनी काम पाहिले. तर संपादनाची जबाबदारी कैकाडी महाराजावर सोपविण्यात येऊन त्यांचे नांव कार्यकारी संपादक म्हणून छापण्याचे निश्चित झाले.

असे असले तरी 'जनताजनार्दन' पाक्षिकाची संपूर्ण जबाबदारी प्रबोधनकार ठाकरे पहात असत. ठाकरे यांची वाणी तेज व तिखट होती. त्यांचे लिहिणेही मोठे मार्मिक आणि बोचकारे ओढणारे असायचे. सामाजिक अन्यायावर ते कडाडून हल्ला करीत. प्रबोधनकारांना बाबांच्या कार्यात बुवाबाजीचा लवलेशही सापडला नाही. त्यामुळेच ते बाबांचे व त्यांच्या कार्याचे निस्सिम समर्थक बनले व 'जनताजनार्दन' चे कार्य प्रेमाने व कसलाही मोबदला न होता त्यांनी पार पाडले.

प्रबोधनकार ठाकरे आणि गाडगेबाबा यांची ओळख अशी वृद्धिगंत होत गेल्याने ठाकरे यांनी 'जनताजनार्दना'च्या कार्यातून बाबांची जनतेला ओळख करून दिली. गाडगेबाबांना ते एक जिवंत चमत्कार म्हणत.

बाबांच्या भवती असलेल्या अनुयायाच्या योग्य-अयोग्य वागणुकीने त्यांना जे मनस्ताप सोसावे लागले. त्याविषयी प्रबोधनकार जनताजनार्दनमध्ये खंत प्रकट करुन प्रहार करीत असत. बाबांवर प्रबोधनकारांचा जीव जडला. पुढे त्यांनी बाबांच्या जीवनाचे मनन करून गाडगेबाबांचे उत्तम चरित्र लिहून प्रसिद्ध केले.

**डॉ.मधुकर आष्टीकर :-** गाडगेबाबांच्या कार्याची प्रचिती आजही विदर्भात व अन्यत्र दिसून येते. त्यांच्या जनसेवेच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन त्यांचे मिशन व कार्याचा वसा पुढे चालविण्यासाठी नागपूर परिसरात बऱ्याच संस्था अस्तित्वात आल्या. मुर्तिजापूर व नागरवाडी येथील गोरक्षण संस्था, अमरावतीचे गाडगेमहाराज ट्रस्ट, नागपूरचे गाडगे महाराज विश्वस्त धर्मशाळा, वरुड तालुक्यातील जरुड येथील गाडगेमहाराज संस्थान इ. संस्थाचे कार्य जोमाने सुरु आहे. श्री.अशोक सरस्वती जरुड यांनी

प्रत्यक्ष कार्याच्या माध्यमातून तर डॉ. मधुकर आष्टीकर यांनी लेखणीच्या आधारे बाबांचे कार्य पुढे चालवण्याचा जणू चंग बांधला आहे. डॉ.आष्टीकर दै. लोकमतमधून एक आठवडी सदर चालवून बाबांच्या कार्याची ओळख त्यांच्या जीवनातील एखादा प्रसंग, अनेक दाखले व उदाहरणाच्या सहाय्याने आपल्या खुसखुशीत भाषेत देतात बाबांच्या शैलीत ते रंगवितात, व सामान्य वाचकाला पटवून देण्याची पूर्ण दक्षता घेऊन डॉ.आष्टीकरांनी बाबांच्या विचारांचे खाद्य जनतेला पुरविले. बाबांसारख्या महान विभूतीचे स्मरण होण्यासाठी डॉ.आष्टीकरांनी केलेले कार्य मौलिक आहे. 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला!'

●●●

# सत्तावीस

# समारोप

गोपाला, गोपाला, देवकीनंदन गोपाला! हा गजर ऐकला की आमच्या पुढे उभे राहतात फक्त गाडगेबाबा! अंगावर चिंध्याचे वस्त्र पांघरलेले, हातात खराटा व गाडगे घेतलेले, मातीच्या गाडग्यासारखे जीवन क्षणभंगूर असले तरी असंख्य ठिगळाप्रमाणे ते विविध अंगानी जगता येते असा स्वच्छ जीवनादर्श ठेवणारे निष्काम कर्मयोगी!

महाराष्ट्रात साधुसंताची महान परंपरा असली तरी गाडगेबाबांचे कार्य आगळेवेगळे व ठाशीव आहे. ज्ञानेश्वरादि संतांनी बहुजन समाजाला परमार्थ व भक्तीची शिकवण देऊन अभंग, ओवी, श्लोक, काव्ये रचून स्वतःचे स्थान अमर केले. या संताप्रमाणे निरक्षर असलेल्या गाडगेबाबांनी स्वतःला शब्दजंजाळात अडकविणे शक्य नसल्याने सेवाधर्म अंगी बाळगून धर्मशाळा, वृद्धाश्रम, गोरक्षण, शाळा, महाविद्यालये सदावर्त काढून लोकोपयोगी कार्य केले. जनजागृती केली, कीर्तनातून जनमानस जिंकून उपदेश करीत असतानाच शिक्षण, आरोग्यसोयी व कुप्रथा, कर्मकांडाच्या विरोधात उभे राहून व्यापक संदर्भात समाजसेवेचा मार्ग चोखाळला. बाबांनी गरिबीचे चटके उपभोगले होते. आत्मनिरक्षणातून वाईट चालीरीतींचा अभ्यास व अवलोकन करून तो समाजापर्यंत पोहचवितांना अज्ञान, निरक्षरता पुसून काढण्यासाठी शाळांचे महत्व विशद केले. शाळा व महाविद्यालये काढण्यासाठी प्रोत्साहन देऊन स्वावलंबन व श्रमाचे महत्व विद्यार्थ्यांत पटवून दिले. बाबांच्या वसतिगृहातून मुले स्वतः काम करून शिकत असत. शिका-शिकवा आणि कमवा व शिका याचा वस्तुपाठ त्यांनी जनतेपुढे ठेवलेला होता.

गाडगेबाबा निरक्षर होते. शिकायच्या वयात त्यांना गुराखी नांगरगवठ्या म्हणून गाई-बैलांच्या पाठीमागे जावे लागले. शेतीची सर्व कामे करावी लागली. उत्तम शेती करतानाच भजनाचा छंद, परमेश्वराचा ध्यास लागला. ते नित्यनेमाने गांवाजवळील महादेवाच्या पिंडीजवळ जाऊन

आंतरिक भावनांना वाट मोकळी करून देत. मुदगलेश्वरांवर बाबांची श्रद्धा होती म्हणूनच त्यांनी ऋणमोचनचा उद्धार केला.

दारुपायी व खोट्या मानापमानामुळे वडील व मामाचा अंत झाला हे बाबांनी पाहिले होते. तरुणपणी त्यांनी ह्याचा अनुभव घेतला. हजारो ग्रंथात मिळणार नाही असे ज्ञान भ्रंमतीने संपादन करून मनुष्य स्वभावाचे बारकावे त्यांनी ओळखले. सामाजिक समस्यांचे चिंतन केल्याने मन प्रगल्भ बनले. बाबांनी उद्योगाला पुरुषार्थाचे साधन मानून आंतरिक शक्तीवर विजय मिळविला.

गाडगेबाबांचा देव देवळात कधीच नव्हता. ते दरवर्षी पंढरपूरला जात असत पण त्यांनी गाभाऱ्यात जाऊन देवदर्शन केले नाही. जनताजनार्दन आणि कर्मवादी लोकांत त्यांनी देव पाहिला. भुकेल्याला अन्न देणारा व तहानलेल्यांना पाणी पाजणारा, नग्न असलेल्यास वस्त्र देणाऱ्याला ते देव मानीत. माणसामाणसातील प्रेम, सहानुभूती, वर्गविहीन जातिमुक्त, समाजव्यवस्था, हुंडाविरोध, कर्जमुक्ती, स्त्री शिक्षण, व्यसनमुक्ती, सर्वधर्मसमभाव, भूतदया, ईश्वरावर श्रद्धा, वृक्षलागवड अशी समाजोपयोगी कार्य करण्याची तळमळ ही बाबांची देवकल्पना होती. म्हणूनच दीनदलितांसाठी आयुष्य वेचणाऱ्या आंबेडकरांना किंवा परदास्यातून मुक्ती देणाऱ्या गांधीजीला देव माना, त्यांच्यातील माणुसकीची पूजा करा असे लोकांना बाबा सांगत.

सामाजिक प्रतिष्ठा, आर्थिक स्वातंत्र्य आणि व्यक्ती-विकास साधण्यासाठी सर्वसामान्य माणसाचे शिक्षण व्हावे असे बाबांना वाटे. समाज दुबळा होण्याचे मुख्य कारण अविद्या असल्याचे त्यांनी ओळखले. शिक्षणामुळे मानवी विकास होतांना त्यांनी पाहिले. म्हणूनच शिक्षणप्रसार हा जनसेवेचा मार्ग बाबांनी चोखाळला. तत्कालीन समाजाच्या पारंपारिक रुढीचे थैमान थोपविण्यासाठी शिक्षणाबरोबरच मानव जातीच्या हिताचा विचार केला. दुष्ट रुढीतून मुक्तीसाठी आपल्या रांगडी मराठी भाषेत उपदेश देण्याचे कार्य सुरु केले. त्यांना यासाठी विविध अडथळयांना तोंड द्यावे लागले.

बाबांच्या डोक्यावर नेहमी खापराचा तुकडा असे. त्याचा उपयोग

जेवणासाठी व डोक्यावर सावली करण्यासाठी ते करीत म्हणून लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. महाराष्ट्रात बाबांना विविध प्रांतात वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाई. सातारा गोकर्णाकडे त्यांना चिंधेबुवा म्हणत, तर नागपूर मध्यप्रांतात खराटेबाबा, कोकणात गोधडे महाराज तर वऱ्हाडात डेबुजीबुवा किंवा वट्टीसाधू अशा नावांनी ते परिचित होते. यात त्यांच्या वेशाचा व जातीचा उल्लेख प्रामुख्याने दिसून येतो. फाटकी घोंगडी, फाटके कपडे हीच बाबांची संपत्ती होती. ते पूर्णतः निसंग, निरहंकारी, निर्मोही असंग्रहीवृत्तीचे असल्याने स्वतःचा संसार न करता जनतेचा प्रपंच उभारला.

या लोकोत्तर पुरुषाच्या सवयी अगदीं साध्या होत्या. वागणे मोठे सावध व वृत्ती कमालीची सजग होती. म्हणूनच आजूबाजूच्या जनतेला जवळ करूनही त्यांनी कोणाला गुरु केला नाही आणि माझा कोणी शिष्य नाही अशा वैरागी वृत्तीने ते बोलत व वागत. त्यांच्या वैराग्याने ओथंबलेल्या चेहेऱ्याकडे पाहिले की चरणी नतमस्तक व्हावेसे वाटे.

गांव हे मंदिराप्रमाणे स्वच्छ, पवित्र आणि निर्मळ असावे ही त्याची कळकळ ग्रामसफाईतून दिसून येते. गांवात शिरताच गांजा, दारु, विरुद्ध ते गप्पा करू लागत. बाबा स्पष्टवक्ते होते. कोणाचीही भीड मूर्वत न ठेवता त्यांना न पटणारा विषय तोंडावर बोलायला कमी करीत नसत. ते उत्तम लोकसंग्रहक व संघटक होते. तरीपण एखादा कामचोर अनुयायी असला तर त्याला क्षणात तोडायला त्यांनी कमी केले नाही. ज्यांच्या दारात भाकरी मागत त्यांच्या हातून थोडीशी जरी चुक झाली तरी त्याला खडसावून बोलायला बाबा मागेपुढे पहात नसत म्हणूनच त्यांना माणसे जोडायला व तोडायलाही वेळ लागत नसे. त्यांचा प्रभावच असा होता की लोक त्यांच्याकडे येतांना त्यांच्या शिकवणुकीचा पाठ गिरवूनच येत असत.

दुसऱ्यांचे दुःख पाहून बाबा कधी स्वस्थ बसले नाहीत. त्यासाठी अविरत प्रयत्न करीत असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली.

दीनदुबळयांचा, अपंगाचा दाता, दलितांचा कैवारी अनाथाचा नाथ,

अपंगाचा आधार सगळयांना सोडून निघून गेला. लाखो लोक हळहळले, देहाने जरी बाबा सोडून गेले तर त्यांचे भव्य दिव्य कार्य व दैदिप्यमान किर्ती आजही दुमदुमत आहे.

बाबांच्या कार्याचा महायज्ञ जवळपास ५० वर्षे अव्याहत सुरु होता. वयाच्या ८० व्या वर्षी त्यांनी देह ठेवला.

बाबा थकले होते. म्हातारपण व आयुष्यभर केलेली दगदग यामुळे प्रकृतीचे तोलामासा सुरु असल्याने त्यांना शेवटचा ध्यास लागला होता. राहिलेली कामे उरकणे, नंतरची व्यवस्था लावणे सुरू झाले. अनुयायांच्या आग्रहास्तव पुणे, मुंबई, अमरावती इ. ठिकाणच्या दवाखान्यातून त्यांचे औषधोपचार सुरु होते. महत्प्रयासाने त्यांनी ८ नोव्हे. १९५६ ला बांद्रे पोलीसांच्या आग्रहावरून कीर्तन केले. लगेच ते पंढरपूरला जाऊन तेथील नीट व्यवस्था लावली. मृत्यूची बाबांना चाहूल लागली असावी. सर्वांचा निरोप घेतांना बाबा म्हणाले 'आम्ही जातो आमुच्या गावा-आमुचा रामराम घ्यावा.' त्यानंतर दोन तीन दिवस बाबांना असह्य वेदना झाल्या. ग्लानी आली. तापाने ते फणफणले. शुद्धीवर येताच त्यांनी आपल्या अनुयायांना अमरावतीला चलण्याचा आग्रह केला.

बाबांची चेतन, अचेतन अवस्था सुरु झाली. उठून बसण्याचे त्राण संपले. अमरावतीवरून त्यांनी दिनांक १९ डिसें. ५६ ला नागरवाडीस जाण्यासंबंधी ईच्छा प्रदर्शित केली. अनुयायांना नाही म्हणवले नाही. त्यांच्या मोटारीने नागरवाडीचा रस्ता धरला. अमरावती सोडून वलगाव लागले. जवळच असलेल्या पेढी नदीवर गाडी आली. रात्रीचे १२ वाजून २० मिनिटे झाली होती. पुल ओलांडत असतानाच बाबांनी शेवटची उचकी दिली आणि आयुष्याचे सारे बंध तुटून पडले. अमरावतीला गाडी वापस आली. बाबा सोडून गेल्याचे डॉक्टरानी सांगताच सर्वांनी टाहो फोडला.

आपल्या ८० वर्षाच्या दीर्घायू धावपळीत या महापुरुषाने प्राणही धावत्या गाडीत त्यागून आपला कार्यसंदेश परमेश्वरांस पोहचविला.

बाबांनी आयुष्यभर सद्‌गुणांची कास धरून दुर्गुणांची निंदा केली. माणुसकीने वागण्याचा महामंत्र दिला, असे हे भक्तिपूर्ण मूर्तिमंत जीवन दि. २० डिसें. १९५६ ला काळाच्या पडद्याआड लपले, ते कायमचेच! अशा या महान कर्मयोग्याला कोटी कोटी प्रणाम!

प्रणाम शत शत महामानवा, गाडगेबाबाला

देवकीनंदन गोपाला।।

●●●

# संत गाडगेबाबांनी बांधलेल्या धर्मशाळा

| | |
|---|---|
| ऋणमोचन धर्मशाळा, घाट, मंदिर | १९०८ |
| मुर्तिजापूर गोरक्षण, धर्मशाळा, विद्यालय | १९०८ |
| पंढरपूर चोखामेळा (हरिजन) धर्मशाळा | १९२० |
| पंढरपूर मराठा धर्मशाळा | १९२० |
| पंढरपूर परीट धर्मशाळा | १९२५ |
| नाशिक धर्मशाळा | १९३० |
| आळंदी धर्मशाळा | १९३० |
| आळंदी परीट धर्मशाळा | १९३० |
| देहू धर्मशाळा | १९३० |
| त्र्यंबकेश्वर धर्मशाळा | १९४८ |
| पुणे आकुल धर्मशाळा | १९४० |
| त्र्यंबकेश्वर परीट धर्मशाळा | १९४० |
| जे.जे. हॉस्पिटल धर्मशाळा मुंबई | १९५५ |

●●●

# संत गाडगेबाबांनी बांधलेल्या आश्रमशाळा

१) श्री गाडगेमहाराज आदिवासी आश्रमशाळा राहुरी, जि. नगर

२) श्री गाडगेमहाराज आदिवासी अश्रमशाळा ओतूर जि. पुणे

३) भिल्ली, वज्रेश्वरी (ठाणे),

४) चालतवाड (ठाणे)

५) मानसवाई वासिंद (ठाणे)

६) नागरवाडी (अमरावती)

७) उभरी (यवतमाळ)

८) सीताखंडी (नांदेड) विमोचित जाती व भटक्या मुलांमुलीसाठी

९) श्री गाडगेमहाराज विमोचित जाती आश्रमशाळा गोंदवले (जि. सातारा)

१०) श्री गाडगेमहाराज भटक्या जाती आश्रमशाळा ब्रम्हपुरी.

●●●

## मुलांची वसतीगृहे

१) श्री गाडगेमहाराज विद्यार्थी वसतिगृह राहुरी

२) श्री गाडगेमहाराज विद्यार्थी वसतिगृह गोंदवले बुद्रुक (सातारा)

३) श्री गाडगेमहाराज विद्यार्थी वसतिगृह भुसावळ (जळगांव)

४) श्री गाडगेमहाराज विद्यार्थी वसतिगृह चौसाळा (बीड)

५) श्री गाडगेमहाराज विद्यार्थी वसतिगृह, सातारा

६) श्री गाडगेमहाराज विद्यार्थी वसतिगृह कुर्ला (मुंबई)

७) श्री गाडगेमहाराज विद्यार्थी वसतिगृह ओतुर (पुणे)

८) श्री गाडगेमहाराज विद्यार्थी वसतिगृह राजुरी (पुणे)

९) श्री गाडगेमहाराज विद्यार्थी वसतिगृह जुन्नर (पुणे)

●●●

## मुलींची वसतिगृहे

१) श्री गाडगेमहाराज कन्या छात्रालय, पंढरपूर

२) श्री गाडगेमहाराज कन्या छात्रालय, आतुर

३) श्री गाडगेमहाराज कन्या छात्रालय, जुन्नर

४) श्री गाडगेमहाराज कन्या छात्रालय, मिरज

# संत गाडगेबाबांचे जीवनवृत्त

| | |
|---|---|
| २३ फेब्रु. १८७६ | जन्म, शेडगांव, जि. अमरावती |
| १८७९ | वडील झिंगराजी यांचा मृत्यु (कोतेगांव) |
| १८७९ | मामाकडे दापुऱ्यास वास्तव्य. |
| १८९२ | कुंताबाईशी विवाह |
| १८९९ | प्रथम कन्या आलोकाचा जन्म |
| १९०४ | सद्‌गुरू भेट |
| १९०५ | गृहत्याग, गोविंदाचा जन्म |
| १९०६ | ऋणमोचन घाटावर दरड बांधणे |
| १९०७ | ऋणमोचन घाटावर सहभोजनाचा प्रारंभ |
| १९०८ | पूर्णा नदीवर पक्का घाट, मूर्तिजापूर गोरक्षण |
| १९१४ | ऋणमोचन परीट धर्मशाळा |
| १९१७ | चोखामेळा धर्मशाळा पंढरपूर |
| १९१९ | गोविंदाचा मुंबईत विवाह |
| १९२० | मराठा धर्मशाळा पंढरपूर |
| १९२१ | अधू पंगू सदावर्त पंढरपूर |
| १९२३ | सखुबाईचा अंत, गोविंदाचा मृत्यु |
| १९३० | नाशिक धर्मशाळा ट्रस्ट, आळंदी धर्मशाळा |
| १९३१ | ऋणमोचनला दोन घाट, हिंसाबंदी सुरवात |
| १९३२ | अधू पंगू सदावर्त - नाशिक |
| १९३५ | सालबर्डीस तुकडोजीसोबत भेट |
| २७ नोव्हें १९३५ | म. गांधींसोबत सेवाग्राम येथे भेट |

| | |
|---|---|
| १९३७ | काटेपूर्णा नदीवर दोन घाटांची बांधणी |
| ७ जुलै १९३८ | बाळासाहेब खेराशी पंढरपूरला भेट |
| १९४० | आकुलधर्मशाळा पुणे, त्र्यंबवेश्वर धर्मशाळा |
| १९४८ | दारुबंदी व्यसनमुक्ती प्रसारासाठी सरकारी गाडी |
| १९४८ | कर्मवीर भाऊराव पाटलांचा सत्कार |
| १४ जुलै १९४९ | डॉ. आंबेडकरांच्या स्वाधीन चोखामेळा धर्मशाळा |
| १९५२ | गाडगेमहाराज मिशन मुंबई. नागरवाडी गोरक्षण |
| १९५५ | जे.जे. हॉस्पिटल मुंबई धर्मशाळा |
| २० डिसें.५६ | बाबाचे निर्वाण - वलगांव पेढी नदीवर |
| २१ डिसें. ५६ | अग्निसंस्कार (गाडगेनगर-अमरावती) |

●●●

# वृद्धाश्रम

१) श्री गाडगेबाबा परमधाम वृद्धाश्रम वलगांव (अमरावती)

●●●

# संस्कारकेंद्र

१) श्री गाडगेमहाराज संस्कार केंद्र, शहादा

२) श्री गाडगेमहाराज संस्कार केंद्र, ओतूर

३) श्री गाडगेमहाराज बालवाडी, राजुरी

●●●

# संदर्भ


| | | |
|---|---|---|
| गाडगे महाराज अल्प परिचय | - | कै. स.सी. बानुबाकोडे |
| श्री गाडगेबाबांचे चरित्र | - | सखाराम सावंत |
| श्री गाडगेबाबा | - | कै. प्रबोधनकार ठाकरे |
| श्री गाडगेमहाराज | - | अमरेंद्र गाडगीळ |
| कर्मयोगी संत गाडगेबाबा | - | हिराजी पाटील |
| श्री गाडगेबाबा | - | राम पाथरकर |
| श्री गाडगेबाबा यांचे विचार | - | प्राचार्य रा.तु. भगत |
| श्री गाडगे महाराज | - | गोपाल नीलकंठ दांडेकर |
| कर्मयोगी गाडगेमहाराज | - | मनोज तायडे |
| गाडगेबाबा (स्मरणिका) | - | मुख्यसंपादक - डॉ. अनिल वऱ्हाडे |